म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. १७३८
५९८६
REFBK-0016627

9632

# व्यासकुसुमें

श्रीमद्भागवताच्या अंतरंगसौंदर्याचें
दर्शन घडविणारे ललित लेख

क्र. १६६२७
REFBK-0016627

ग. वि. अकोलकर

मूल्य साडेतीन रुपये

पुष्पक प्रकाशन, पुणें

□ प्रकाशक
ह. ल. निपुणगे
पुष्पक प्रकाशन,
४१३ ब, शनिवार पेठ, पुणें २

□ © सौ. इंदिरा अकोलकर

□ प्रथमावृत्ति
१४ जानेवारी १९६८

□ मुखपृष्ठ
सागर आर्ट स्टुडिओ, पुणें २

□ मुद्रक
वि. नी. पटवर्धन
साधना प्रेस,
४३०/३१ शनिवार पेठ, पुणें २

प्रिय सौ. इंदिरेस

# पुष्पें समर्पितांना

आज ही ' व्यासकुसुमां 'ची ओंजळ मराठी रसिकांच्या स्वाधीन करतांना मन निश्चिन्त आणि प्रसन्न होत आहे.

श्रीव्यासांच्या दिव्य प्रतिभेंतून फुललेला श्रीमद्भागवत हा भक्तीचा कल्पवृक्ष आहे. त्यावर नाना तत्त्वांचीं व कथांचीं, नवविध रंगांचीं व रसांचीं फुलें उमललेलीं आहेत. त्यांतील कांहीं कुसुमांतील संजीवक सुधाबिंदु मधुकरवृत्तीनें ग्रहण केले आहेत. ' श्रीमद्भागवत : कथासार व शिकवण ' तयार करीत असतांनाच अनेक कथांत व आख्यानांत उदात्त मूल्यांच्या छटा आढळल्या; अनेक भावनोत्कट प्रसंग अत्यंत संयमानें रेखाटलेले आढळले. मन त्यांवर रेंगाळलें व गुंगलें. त्यांतून जो ' आनंद-बोध ' लाभला, तो कधीं ' इंद्रायणीं 'तून, कधीं ' गोकुळ ' मधून, कधीं ' अमृत ' मधून प्रकट केला होता. त्या पूर्वप्रकाशित लेखांत आणखी तेवढ्याच लेखांची नव्यानें भर घालून हा ' कुसुम-गुच्छ ' आज एकत्र गुंफला जात आहे.

पुराणग्रंथांकडे बघण्याचे दृष्टिकोन अनेक आहेत. प्राचीन काव्यांचा रसास्वाद घेण्याची एक नवी दृष्टि विश्वकवि रवीन्द्रनाथ यांनीं आपल्या ' प्राचीन साहित्य ' या छोट्याशा ग्रंथांत दिली आहे. महाराष्ट्रांत तशी दृष्टि थोर प्रतिभावंत श्री. शि. म. परांजपे यांनीं ' शाकुंतल ' व ' भास ' इत्यादि लेखांमधून दिली होती. श्रीमती दुर्गा भागवत यांचें ' व्यासपर्व ' व डॉ. इरावती कर्वे यांचा ' युगान्त ' यांचें स्वरूप भिन्न असलें, तरी प्रकृति ही एकच आहे. त्या दोघींनींहि व्यक्तींना केंद्रस्थानीं ठेवून, त्यांचे जीवन-धागे उलगडून त्यांच्या अंतरंगाचा व चारित्र्याचा ठाव घेण्याचा प्रयत्न केला आहे. श्री. ढेरे यांचीं ' अमृतकन्या ' व ' इंद्रायणी ' याच जातींतलीं. व्यासकुसुमांचें स्वरूप मात्र रसिकांनीं ठरवावयाचें आहे. व्यक्तीचें व समाजाचें जीवन उन्नत व विशाल, ज्ञानमय व आनंदमय होण्यासाठीं, सत्य-शिव-सुंदर बनवण्यासाठीं आवश्यक त्या मूल्यांचें श्रीमद्भागवत-कथांत जें भावगर्भ दर्शन घडलें, त्याकडे अंगुलिनिर्देश करणें आणि स्वतःला आकळलेला रस-सौरभ वाचकांपर्यंत पोचविणें, एवढाच माझा हेतु आहे.

श्रीमद्भागवतकथांतील गोडी मला केव्हां व कुणीं लावली, याचा उल्लेख 'श्रीमद्भागवत: कथाभाग व शिकवण' या पुस्तकाच्या मनोगतांत केला आहे. वडिलांच्या ऋणाबरोबरच माझ्या आजीच्याहि ऋणाचा निर्देश करायला हवा होता. माझ्या बालपणांतील अनेक आजारपणांत माझें संगोपन तिनेंच केलें. गल्लींतल्या देवीच्या मंदिरांत दरवर्षी होणाऱ्या भागवतसप्ताहांतील व रोज ऐकलेल्या पुराणांतील कथा ती मला सांगत असे. 'श्रीकृष्ण गोविंद हरे मुरारे' हें भजन वडिलांच्या जिव्हेवर नित्य असे; म्हणून तें नित्य कानांवर पडे. विद्यार्थिदशेपासूनच श्रीकृष्णचिंतनाचा छंद मनाला जडलेला आहे. माझे दिवंगत श्वशुर यांच्याहि गीता-भागवत-ज्ञानेश्वरीच्या अध्ययनाचा व त्यासंबंधींच्या चर्चेचा मला लाभ झालेला आहे.

कॉलेज-जीवनांत श्रीमद्भगवद्गीतेचा अभ्यास करण्याची संधि मिळाली. तो जेवढा करतां येईल तेवढा केला. श्रीअरविंदांचीं व्याख्यानेंहि—कळो न कळो—वाचलीं. भगवद्गीतेचा "स्थितप्रज्ञ हा निर्मोह, जितसंग, व 'समः शत्रौ च मित्रे च' असतो," हें वाचून मन गोंधळे. ज्ञानी होणें म्हणजे जर भावनाशून्य होणें असेल, भावना थंडगार होणें असा त्याचा अर्थ असेल, तर जीवन नीरस नि शुष्क नाहीं का होणार? मग कर्माला प्रेरणा कोठून?—असा प्रश्न मनाला व्यग्र करी. श्रीमद्भागवत वाचीत असतांना त्याचें उत्तर मिळालें. 'स्थितप्रज्ञ' हा 'सर्वभूतसुहृद्' व 'सर्वभूतहिते रतः' असावा लागतो, हें समजलें. ज्ञानी माणसाच्या कर्माची प्रेरणा या 'करुणें'त आहे, हें कळलें. गीता समजण्यासाठीं भागवत वाचलें पाहिजे, ह्या विनोबांच्या वचनाचा अनुभव आला.

मी संशोधक नव्हे वा ललितसाहित्यिकहि नव्हे; पण संशोधन व ललितसाहित्य या दोहोंचाहि 'जिज्ञासू भक्त' आहे. हें पुस्तक पुढें आणतांना हें साहस करावें कीं न करावें, असा प्रश्न पडलाच. साहस करावें, याची प्रेरणा श्रीज्ञानेशांच्या—

> **राजहंसाचें चालणें । भूतळीं जालिया शहाणें ।**
> **आणिक काय कोणें । चालावेचिना ॥**

या ओवीनें मिळाली आणि पुस्तकाला काय नांव द्यावें याचें उत्तर —

> **परी गीता-ईश्वरु भोळा । ले व्यासोक्तिकुसुममाळा ।**

या श्रीज्ञानेश्वरांच्याच ओवीनें सुचवलें.

पुस्तक पुरें करण्याबद्दल मला निकड लावली ती माझे बंधुतुल्य स्नेही व रसिक-पंडित श्री. रा. चिं. ढेरे यांनीं. संपादन, मुद्रण-शोधन व प्रकाशन यांची जबाबदारीहि त्यांनीं आनंदानें स्वीकारली. त्यांच्यासारखा साक्षेपी रसिक दायित्वाला लाभला, हें एक भाग्य आहे.

ग्रंथलेखनासाठीं अनेक संदर्भग्रंथहि लागतात. माझे स्नेही श्री. मु. शं. औरंगाबादकर, सार्वजनिक वाचनालयाचे प्रमुख कार्यवाह, यांनीं पुस्तकांची उणीव कधींच भासूं दिली नाहीं. मुरबाडचे श्री. के. ना. भातखंडे यांच्या संग्रहीं गीता प्रेसनें छापलेली एक हिंदी ‘ रासपंचाध्यायी ’ अनपेक्षितपणें पाहावयास मिळाली आणि श्री. क. द. पुराणिक यांच्या संग्रहीं श्रीमद्भागवतावरील एक दुर्मिळ टीका आहे, ती वाचण्याचा लाभ मिळाला. या सर्व स्नेह्यांना द्यावे तेवढे धन्यवाद थोडेच. श्रीएकनाथ व श्रीकृष्णदयार्णव यांचें ऋण कसें व्यक्त करणार ?

श्री. निपुणगे यांनीं पुस्तक प्रकाशांत आणण्याची मनीषा व्यक्त केली. छपाई, सजावट ह्या बाबतींतली हौस त्यांचीच. साधना मुद्रणालयाचे चालक श्री. वि. नी. पटवर्धन आणि तेथील कामगारबंधु यांचे आभार मानावयास हवेतच.

कुसुमांचें स्वागत कसें करावें, हें चतुर रसिक जाणतातच. त्यांना आनंद वाटला, तर माझाहि आनंद द्विगुणित होईल, हें उगीच कशाला लपवूं !

ज्ञानेश्वर-पुण्यतिथि :<br>
कार्तिक व. १३, शके १८८९

**ग. वि. अकोलकर**

## अनुक्रम


१ माता द्रौपदी ९

२ महात्मा ध्रुवाची मातृभक्ति १६

३ अजामिलकथेंतील भक्तितत्त्व २०

४ प्रल्हादाख्यानांतील सौंदर्य-बोध २८

५ श्रीलक्ष्मीचें स्वयंवर ३७

६ बलिकथेंतील चिरंतन संघर्ष ४७

७ हतभागी कल्माषपाद ५९

८ रासक्रीडा—स्वरूप आणि रहस्य ६४

९ गृहस्थ झाला भगवंत ७६

१० अवधूताचे चोवीस गुरु ८४

११ भागवताचें रसमाधुर्य ९१

तीन परिशिष्टें

आद्य विवाह १०३

श्रीलक्ष्मी १०५

संस्कृत कवींच्या लक्ष्मीविषयक कल्पना ११३

स्वाध्याय १२१

संदर्भ-साहित्य १२८

१६६२७

# १ : माता द्रौपदी

भारतीय पुराणांनीं नारीजीवनाचे अनेक आदर्श रेखाटले आहेत. त्यांतील कांहींना प्रातःस्मरणीय पुण्यश्लोकांच्या नामावलींत स्थान प्राप्त झालें आहे. त्यापैकींच द्रौपदी एक आहे. यमधर्माच्या संहारक पाशांतून पतीचे पंचप्राण परत मिळविणाऱ्या सावित्रीचें नांव उच्चारलें जातें, तें फक्त ‘ जन्मसावित्री हो, ’ या आशीर्वादाच्या वेळींच. पण द्रौपदीला स्थान आहे तें प्रतिदिनीं प्रातःकाळीं स्मरावयाच्या पंच-कन्यांच्या मालिकेंत. अहल्या, सीता, तारा व मंदोदरी यांच्या मालिकेंत द्रौपदीचें नामसुमन गुंफतांना कवीला कोणतें साम्य अभिप्रेत होतें, हें सांगणें कठीण आहे. पातिव्रत्य हा एकच निकष, मानदंड वापरला, पण त्याचा कोणता पैलू त्याला मोहक वाटला, हें त्या कवीनें स्पष्ट केलें नाहीं. पतीवरील अमर्याद, अथांग प्रेमा-मुळें संकटांच्या अनेक अग्निदिव्यांतून पार पडून आपल्या पतिभक्तीचें सुवर्ण बावनकशी असल्याचें त्यांनीं सिद्ध केलें, एवढा निकष त्याला पुरेसा होता.

‘ अनेक प्रलोभनें असतांहि जें अविचल राहतें तेंच खरें प्रेम, ’ अशी एका आंग्ल कवीनें प्रेमाची व्याख्या केली आहे. या दृष्टीनेंहि पंचपतिव्रतांच्या प्रेमाचा कस लागला होता. पण प्रलोभनांचें स्वरूप प्रत्येकीच्या बाबतींत भिन्न होतें. तपोनिष्ठ ऋषि-मुनींच्या व्रतांची अभंगता व अविचल निष्ठा पाहण्यासाठीं इंद्रादींनीं जीं मोहसाधनें वापरलीं, त्यांत ऊर्वशी आदि ‘ सुकुमार प्रहरणें ’ होतीं ! पण प्रकृति-पेशल, निसर्गकोमल अशा नारीजनांच्या पतिपरायणतेची परीक्षा झाली, ती मात्र वेगळ्या रीतीनें ! सुख-समृद्ध प्रासादांतून त्यांना बाहेर काढून प्रकृतीच्या रौद्र-भयानक स्वरूपाचें नि मानवांतील राक्षसी क्रूरतेचें त्यांना दर्शन घडवून त्यांचें शौर्य, शांति नि निष्ठा यांची पारख करण्यांत आली. पण पतिसहवासांत व पति-चिंतनांत असें दिव्य सामर्थ्य आहे कीं, त्यामुळें कांट्याकुट्यांचें रूपांतर प्राजक्ता-च्या मृदु पुष्पांत होतें, हें या सतींनीं जगाला दाखवून दिलें. आध्यात्मिक जीवनाच्या क्षेत्रांत या सतींचें हें महान संशोधनकार्यच आहे.

द्रौपदीला ' सतीं ' च्या मालिकेंत स्थान असलें, तरी ती पुराणकथांच्या जगाला ' मानिनी–कामिनी–स्वामिनी ' या त्रिविध भूमिकांतूनच अधिक परिचित आहे. तेजस्विता नि अभिमानिता यांच्या रसायनानेंच जणूं तिची जीवनवेल जोपासली आहे. ' यज्ञासाठीं भूमि नांगरितां ' सीतेची प्राप्ति जनकाला झाली. तीहि अग्नि-दुहिताच. पण यजनभूमीची केवळ पावनता घेऊनच सीता जन्माला आली; तर द्रौपदी साक्षात् यज्ञसंभवा आहे; जणुं स्वतः दहनशील असलेली दाहक अग्निशिखा आहे. अपमानाचा बदला घेण्यासाठीं पुत्रकामनेनें द्रुपदानें जो यज्ञ केला, त्या यज्ञांतून द्रौपदी द्रुपदाला लाभली आणि अग्नीची दाहकता घेऊनच ती भूमीवर अवतरली. द्रौपदीनें जगावर पहिला नेत्रकटाक्ष फेकला, तेव्हांच भारतीय युद्धाची ठिणगी पडली होती.

द्रौपदी तेजस्विनी होती, म्हणूनच ती ' गुणलुब्धा ' होती. स्त्रिया पुरुषांच्या गुणांना, विक्रमाला वरतात. त्या रूपावर भाळत नाहींत. अजाण बालिकांच्या बाबतींतच ' कन्या वरयते रूपम् ' हें सुभाषित खरें असेल; द्रौपदीसारख्या बुद्धिमतींना तें लागू नाहीं, हें तिनें जगाला दाखविलें होतें. ' नको क्षुद्र शृंगार तो दुर्बलांचा ' या भावनेनेंच तिनें ' वीर्यशुल्का ' व्हावयाचें ठरविलें. सीतेच्या स्वयंवरांत केवळ धनुष्य वांकवून त्याला प्रत्यंचा लावण्याचाच पण होता, तर द्रौपदीच्या पणांत धनुष्मंताच्या असीम कौशल्याची कसोटी लागावयाची होती. फिरत्या चक्राच्या वर टांगलेल्या मत्स्याच्या नेत्राचा भेद खालीं तेलाच्या कढईत त्याचें प्रतिबिंब पाहून करावयाचा! हा पण शोधून काढण्यांतच केवढी कल्पकता होती. बुद्धीची असामान्य झेप होती, भेदकता होती. पांच बाणांत अचूक शरसंधान साधणारा वीरच आपल्या हृदयावर ' पंचबाणा 'चें–मदनाचें–शरसंधान करूं शकेल, या शरसंधानांत चित्ताची एकाग्रता साधणारा वीरच प्रेमाच्या अनन्यभावाची ग्वाही देऊं शकेल, असें तर द्रौपदीला सुचवावयाचें नसेल? कीं हा पण योजतांना तिला भविष्याचें स्फुरण झालें होतें? आपल्याला लाभलेल्या चिरयौवनामुळें व असीम लावण्यामुळें दीपज्योतीवर झेप घेणाऱ्या मूढ पतंगाप्रमाणें काममूढ जनांच्या नजरा आपल्यावर सदा वळलेल्या असणार, याची कल्पना येऊनच पतिपराक्रमाचें संरक्षक कवच ती शोधीत होती काय? कांहींहि असो, त्या तेजस्विनीचा ' पण ' असामान्य वीर्याचा, असाधारण

कौशल्याचा वेध घेणारा होता. ती अशा वीर्यवंताचीच मानिनी–कामिनी होऊं इच्छीत होती.

पांडव द्रौपदीस्वयंवरास आले ते लाक्षागृहांतून निसटून ब्राह्मणांच्या वेशांत– जणूं लाक्षागृह जाळणाऱ्या अग्नीच्या तेजानें अधिक तेजस्वी बनून, दग्ध लाक्षागृहाच्या विभूतिलेपनानें आपल्या क्षात्रतेजाला ब्रह्मतेजाची जोड देऊन ! नि कर्ण-कौरव आले होते, ते त्या अग्नीच्या धुराची काळोखी तोंडाला फासून ! पण सत्यानें जगांत अज्ञातांत वावरावें नि असत्यानें व दंभानें नसत्या पराक्रमाचा डांगोरा पिटीत उजळ माथ्यानें वावरावें, असा जणूं जगाचा नियम आहे ! अर्जुनाचा ब्राह्मणवेश केवळ जीवितरक्षणासाठीं घेतलेला नव्हता. त्या वेशाचा तो अधिकारी होता. तो तपःपूत होता, म्हणूनच द्रोणाचार्यांकडून अत्यंत दुर्लभ अशा ब्रह्मास्त्राची प्राप्ति त्याला झाली होती. 'इदं ब्राह्मं, इदं क्षात्रम्' अशा तेजोबलानें अर्जुन मंडित आहे, हें पाहूनच त्या सव्यसाचीला यज्ञसंभवा द्रुपदकन्येनें विश्रब्धपणें, अत्यंत विश्वासानें सर्वस्व समर्पण केलें.

द्रौपदी पांडवांची गृहस्वामिनी व हृदयस्वामिनीहि बनली. युवतींना गृहिणीपदावर नेऊन बसविणारा 'शुश्रूषस्व गुरून् कुरु प्रियसखीवृत्तिं सपत्नीजने' (वडिलधाऱ्यांची विनीतभावानें सेवा कर आणि सवतींना सख्यांप्रमाणें वागवून त्यांचीं मनें जिंकून घे) हा आदर्श कवि-कुलगुरूला द्रौपदीच्या जीवनावरून सुचला असेल काय ? पण सुचण्यासारखें तिचें वर्तन होतें खास ! नि म्हणूनच पतीला मुठींत कसें ठेवावयाचें, याचे पाठ आपल्या रूपगौरवानें गर्वित झालेल्या सत्यभामेला द्रौपदीच्या चरणांशीं बसून घ्यावे लागले ! पण पतीच्या सुखदुःखांत केवळ समरस होण्यानेंच गृहिणी त्यांची हृदयस्वामिनी होऊं शकत नाहीं. सेवेमुळें जसें स्वामित्व चालत येतें, तसें सेवेच्या अतिरेकानें आत्मविलोपहि होतो. सीतेनें रामाच्या जीवनांत हा आत्मविलोप करून घेतला. 'सीताराम' या पदानें तिनें अमरत्व मिळवलें असलें, तरी तें रामाच्या जीवनांत अभिन्नत्व साधून, त्याच्या जीवनांत 'अद्वैत' प्राप्त करून ! स्वामिनी म्हणून मिरवण्याची तिची आकांक्षाच नव्हती. कारण ब्रह्मवेत्त्या जनकाची ती दुहिता होती. द्रौपदीची गोष्ट भिन्न होती. क्षात्रतेज तिच्या नसानसांत होतें. सीता सात्त्विकतेची मूर्ति होती, तर द्रौपदी राजस गुणांची प्रतिमा होती. सीतेच्या जीवनांत दुःखाचे प्रसंग अनंत

आले, पण अन्यायाचा प्रसंग एकच आला आणि त्या क्षणींच काय ती क्षात्रतेजाची एक सुवर्णशलाका तिनें प्रगट केली. पण एकदांच, रामानें अन्यायानें त्याग करतांच हृदयांतला सारा सात्त्विक संताप एकवटून ' वाच्यस्त्वया मद्वचनात् स राजा–' ( भावोजी, त्या तुमच्या ' राजा 'ला –आर्य पतीला नव्हे– माझा निरोप सांगा ) असा कठोर उद्गार कठोरगर्भा रघुस्नुषेच्या तोंडून बाहेर पडला. द्रौपदीचें सारें जीवन मानहानीच्या नि मानभंगाच्या दुःखांनीं कांठोकांठ भरलेलें. त्यामुळें संतापाचा नि सूडाचा अग्नि सतत हृदयांत धगधगलेला. त्यामुळेंच जणूं तिचें व्यक्तित्व सदैव सतेज नि दैदीप्यमान राहिलें. गृहिणी व स्वामिनी या नात्यानें तिला आणखी एक जबाबदारी यशस्विपणें पार पाडतां आली, ती म्हणजे आपल्या पतींच्या पराक्रमाचा स्फुलिंग सतत प्रज्वलित ठेवण्याची. वनवासांतील कष्ट, ऋषिमुनींचा शांतिपाठ नि अज्ञातवासांतील आत्मविस्मृति यांमुळें पांडव ' षंढ ' बनतील कीं काय, याची तिला सदैव भीति वाटे. आणि म्हणून ' व्रजन्ति ते मूढधियः पराभवं, भवन्ति मायाविषु ये न मायिनः । ' ( जे कपटी लोकांशीं कपटानें वागत नाहींत, त्या मूर्खांचा पराभवच होतो ) असें पतींना बजावून त्या ' द्वैत ' वनांत ती पतींची ' मन्युदीपिनी '–क्रोध-ज्योति बनली व त्यांच्या स्वाभिमानाची व क्रोधाची ज्योति सतत जागती ठेवण्याची कामगिरी तिनें बजावली. द्रौपदीच्या स्वामिनीपदाचें रहस्य या तिच्या तेजस्वितेंत होतें.

पण स्त्रीजीवनाची सांगता, परिपूर्ति तिच्या मातृत्वांत असते. धरणीच्या कठोर पाषाणमय हृदयांतून पयोधारा स्रवते, तेव्हां ती ' सुजला माता ' बनते; तिला लोक धरित्री म्हणूं लागतात. फळाची गोडी परिपक्वतेमुळें येणाऱ्या स्निग्धतेंत आहे. परिणत यौवनाच्या कठोर वक्षःस्थलांतून जेव्हां वात्सल्याच्या दुग्धधारा स्रवतात, तेव्हांच तितिक्षा, दया, क्षमा नि परदुःखाची जाणीव, इत्यादि भावनांचा परिपोष होऊन आत्मविकास होतो. दिवसाच्या कठोर तापाचें पर्यवसान ज्योत्स्ना-पुलकित रमणीय रात्रींत व्हावें, त्याप्रमाणें अहंकार नि अभिमान यांचा दाहक ज्वर उतरून शीतल स्निग्धतेंत जीवनाची अखेरी होते. मांगल्याची प्रशान्त प्रभा तेव्हांच उदित होते नि जीवनमंदिरावर उदात्ततेचा कळस तेव्हांच झळकूं लागतो. द्रौपदीच्या जीवनांतहि हा क्षण आलाच. श्रीकृष्णानेंच तो आणला. तिचें

जीवनपुष्प अर्धविकसित रहावें, हें त्या कृष्ण सख्याला–तिच्या सत्त्वसंरक्षकाला कसें सहन व्हावें ?

दुर्योधनाचा गदायुद्धांत पराभव झाला; द्यूतहरणाच्या प्रसंगीं पांडवांनीं केलेल्या साऱ्या प्रतिज्ञांची परिपूर्ति झाली नि भारतीय युद्ध परिसमाप्त झालें. यशःश्री पांडवांनीं शक्ति-युक्तीनें हस्तगत केली. योगेश्वर कृष्ण नि धनुर्धर पार्थ यांच्या संगमस्थानीं विजयलक्ष्मी नि वैभवलक्ष्मी वास्तव्यास आल्या. पांडवकुमार भावी सुखाच्या स्वप्नांत दंग झाले. त्या संहारक संग्रामांत पांडवांनींहि कांहीं कमी गमावलें नव्हतें. त्यांना गड मिळाला असला, तरी अभिमन्यूसारखा सिंहाचा छावा ते हरपून बसले होते. मिळालेल्या विजयाच्या आनंदांत हें हानीचें दुःख पांडव बुडवीत होते. आज पांडवशिबिरांत सुटकेचा निःश्वास सोडून उद्यांच्या सोनेरी स्वप्नांत सर्व पांडवकुमार निद्रिस्त झाले होते.

पण शिल्लक उरलेला रोग नि मागें राहिलेलें वैर वर येण्याची धडपड करतेंच ! त्या रात्रीं सूडाच्या व्यथेनें तळमळणारा एक अशांत आत्मा असाच तळमळत पांडवांच्या शिबिराभोवतीं फिरत होता. धर्मयुद्धाचे नीतिनियम त्याच्या क्रोधाग्नींत जळून खाक झाले होते. पराभवाच्या तीव्रतेनें, आघातानें तो आतां आततायीच बनला होता. आपल्या धन्याचें, दुर्योधनाचें प्राणोत्क्रमण होण्यापूर्वी त्याचें कांहीं प्रिय करावें नि त्याच्या आत्म्याला संतोष द्यावा, हीच एक कामना त्याच्या हृदयांत होती. पण अश्वत्थाम्या, तूं इतका रे कसा वेडा ? गांधारीपुत्र कितीहि ‘दुर्योधन’ असला, तरी नीतीची अंतिम मर्यादा ओलांडलेली त्याला तरी खपेल का ? अपांडवीय पृथ्वी करण्याची त्याची मनीषा असली, तरी कुरुकुलाचा संहार करून कुरुकुलाची वंशवेल समूळ उच्छेदून टाकण्याइतका तो अविवेकी असेल, असें तुला कसें वाटलें ?

पण आततायी अश्वत्थाम्यानें तें नृशंस, भीषण कर्म केलेंच. मध्यरात्रींच्या सुमारास पांडवांच्या शिबिरांत शिरून झोपेंत असलेल्या धृष्टद्युम्नादि अनेक पांडवपुत्रांचा त्यानें भीषण संहार केला. कधीं कधीं नियतीला असा क्रूर खेळ खेळण्याची लहर येतेच. अमाप कष्टांनंतर सुखाचा ठेवा मानवाच्या हातीं देतांनाहि ती त्यांतील सारें सत्त्व काढूनच तो त्याच्या हवालीं करते. अश्वत्थाम्याच्या या भ्याड कृत्यानें पांडवविजयाची हीच गत झाली. विजयच पराभूत झाला.

पुत्रवधाच्या वार्तेनें पांडवांच्या अंतःपुरांत आकांत माजला. ज्यांच्यासाठीं सारा राज्यप्रपंच, ते पुत्रच हरपल्यानंतर जीवनांत काय राम वाटणार? अर्जुनानें पुन्हा एक भीषण प्रतिज्ञा केली– " त्या अश्वत्थाम्याचें मस्तक कापून आणीन, त्यावर द्रौपदीला बसवून स्नान घालीन नि सुतनिधनाच्या सुतकांतून तिला मुक्त करीन. "

अर्जुन-अश्वत्थाम्यांच्या प्रचंड युद्धांत अश्वत्थाम्याचा पराभव होऊन तो बंदी झाला. अर्जुनानें त्याला द्रौपदीसमोर आणून उभें केलें. यज्ञांत बळी द्यावयाच्या पशूसारखी त्याची दीन अवस्था झाली होती. अर्जुन, कृष्ण, द्रौपदी यांच्याकडे वर मान करून पाहण्याचें त्याला धैर्य होईना. द्रौपदीचे तर त्यानें सहस्र अपराध केले होते. तो आतां अर्धमेला होऊन उभा होता. त्याचा शिरच्छेद करण्याचा आदेश श्रीकृष्णानें तर केव्हांच दिला होता. आतां फक्त द्रौपदीच्या भृकुटी-भंगाचा काय तो अवकाश...अर्जुनाच्या खड्गानें त्याला कंठस्नान घातलें असतें. अर्जुनाचा पण पुरा झाला असता.

श्रीमद्भागवतकारांनीं या क्षणींच द्रौपदीचें चित्र मोठें उदात्त रंगविलें आहे. स्त्रीहृदयांतला जो पवित्रम रस–वात्सल्य–त्याचा तिच्या हृदयांतला आविष्कार दाखवून स्त्रीधर्माचें उच्चतम सिंहासन जें मातृत्व, त्यावर तिला त्यांनीं नेऊन बसविलें आहे.

द्रौपदीनें अश्वत्थाम्याकडे करुणापूर्ण नजरेनें पाहिलें आणि तिला पतींचा पराक्रमहि आठवला. " अरे हा ब्राह्मणपुत्र, पण त्याहिपेक्षां आचार्य द्रोणांचा हा पुत्र. ज्या गुरुचरणांपासून अर्जुन शस्त्रास्त्रविद्या संपादून 'जगदेकवीर' पदवी पावला, त्या कृपावंत द्रोणाचार्यांचा हा पुत्र. पुत्राच्या रूपानें मनुष्याचा आत्माच जन्म घेतो, अशी श्रुति आहे नव्हे! याच्या रूपानें द्रोणांचा आत्माच वावरतो आहे ना? मग त्याचा वध करावयाचा?" तिची विचारमालिका येथेंच संपली नाहीं; ती जोरानें चालू असावी. कुठल्या तरी अभूतपूर्व उदारतेनें तिचें मन भरून आलें. ती अर्जुनास म्हणाली—

" द्या सोडून याला. पुत्रनिधनाचें दुःख काय असतें, तें मला ठाऊक आहे. त्या अशमनीय व्यथा मी अनुभवीत आहें तेवढें पुरे! याच्या मातेच्या वांट्याला त्या न येवोत!"

वात्सल्यानें द्वेषावर, प्रेमानें हिंसेवर विजय मिळविला! करुणामयी कुंती स्नुषा त्या क्षणीं करुणामूर्तीची-कृष्णाची-सखी म्हणून जेवढी शोभली असेल, तेवढी अन्यथा क्वचितच असेल. जीवनाची अक्षयता चिरंजीव करणाऱ्या मातृत्वाच्या महान् विजयानें द्रौपदी त्या क्षणीं सुमंडित झाली होती.

* * *

86068
9638
2019

# २ : महात्मा ध्रुवाची मातृभक्ति

सापत्न मातेच्या अहंकारामुळें आणि असूयेमुळें ज्यांचीं जीवनें उजळून निघालीं, अशा दोन वीरांच्या कथा भारतीयांना प्रेरक व प्रिय ठरल्या आहेत. दोन्ही वीर सूर्यवंशांतले आहेत, हें त्यांचें आणखी एक वैशिष्ट्य. त्यांतील एक आहे बालवीर ध्रुव आणि दुसरा त्रैलोक्यवीर रामचंद्र. दोघे सारखेच तेजस्वी, क्षात्रतेजाच्या साक्षात् मूर्ति.

आबालवृद्धांस ध्रुवाची कथा ठाऊक आहे, ती त्याच्या बालवयांतली–सापत्न मातेच्या वाग्बाणांनीं विद्ध झालेल्या पांचसहा वर्षांच्या बालध्रुवानें भगवान् विष्णूंना प्रसन्न करून घेतलें आणि अक्षय्यपदाची प्राप्ति करून घेतली, एवढीच. हा भाग श्रीमद्भागवताच्या चौथ्या स्कंधांत आठव्या व नवव्या अध्यायांत श्रीव्यासांनीं वर्णिला आहे. पण ध्रुवकथेचा प्रवाह तेथेंच संपला नाहीं. श्रीव्यासांनीं ध्रुवकथेसाठीं आणखी तीन अध्याय दिले आहेत आणि महात्मा ध्रुवाच्या संपूर्ण व्यक्तिमत्त्वाचें, त्याच्या शौर्याचें आणि कोमलतेचें दर्शन त्यांत घडविलें आहे. बालध्रुवाचा आदर्श बालकांसमोर ठेवला जातो, तो त्याच्या निश्चयीपणासाठीं व परमेश्वरावरील दृढ निष्ठेसाठीं. पण बालकांमधील मानवता व मातृभक्ति यांची जपणूक करण्यासाठीं त्यांना समग्र कथा सांगायला हवी आहे. ध्रुवाची विष्णुभक्ति, ध्रुवाला नारदमुनींकडून मिळालेल्या ' ॐ नमो भगवते वासुदेवाय ' या मंत्राची प्राप्ति आणि त्याला त्या मंत्रांतून लाभलेली मनोरथसिद्धि या गोष्टी बालध्रुवाच्या कथेंतून भागवतांना पाहावयास मिळून समाधान लाभतें, हें खरें. पण श्रीव्यासांच्या प्रतिभेचा एक नवा पैलू दृग्गोचर होतो, तो पुढील कथाभागांतून. ध्रुव हा मातृभक्तीचा एक आदर्श होता. श्रीरामचंद्रांप्रमाणेंच सापत्न मातेबद्दल त्याच्या तोंडून अनुदार उद्गार निघाला नाहीं. त्याची माता सुनीति हिच्यावरील गाढ भक्तीचें उत्कट स्वरूप त्याच्या जीवनाच्या अंतिम क्षणीं प्रकर्षानें प्रकटलें आहे.

ध्रुवाचा पिंड खराखुरा क्षात्रतेजाचा होता. सावत्र आईनें त्याचा केलेला अवमान हा त्याच्या जिव्हारीं लागला. काष्ठपाषाणांच्या क्रीडनकाशीं खेळण्याच्या वयांत त्या अपमानानें त्याचा स्वाभिमान डिवचलेल्या नागाप्रमाणें उफाळून उठला होता. ('श्वसन् रुषा दण्डहतो यथाहिः।' ४.८.१४) त्या अल्पवयांतील त्याचा तो मानीपणा पाहून नारदांनीं कौतुकानें उद्गार काढला होता.

अहो तेजः क्षत्रियाणां मानभङ्गममृष्यताम्। ४. ८. २६

असा हा तेजस्वी कुमार सिंहासनावर आल्यावर एखादा अन्याय सहन करील, हें कसें शक्य होतें?

ध्रुवाचा भाऊ उत्तम यानें विवाह केला नव्हता. मृगया आणि क्रीडा यांतच तो रममाण होई. एकदां तो असाच शिकारीस गेला असतां हिमालयांतील पुण्यजन नांवाच्या प्रदेशांत शिरला. तो प्रदेश रुद्राच्या गुह्यक-यक्षादि अनुचरांचा होता. त्यांनीं शिकारीस आलेल्या उत्तमाचीच शिकार केली आणि त्याची माता सुरुचि हिनें पुत्रशोकानें प्राण सोडला. नियतीचा न्याय किती विचित्र! जिनें एके काळीं ध्रुवाला राजाच्या अंकावरून मातींत ढकललें होतें, तिचेंच सर्वस्व हरण होऊन ती आज धुळीस मिळाली होती!

राजा ध्रुवाला हें कळलें मात्र, तो भावाच्या मृत्यूचा बदला घेण्यासाठीं उत्तरेकडे निघाला. गुह्यकांच्या नगरीपाशीं येऊन त्यानें शंख फुंकला आणि त्यानें यक्ष-किन्नरांना युद्धास आव्हान दिलें. तेथें मोठें घनघोर युद्ध झालें. ऋषिजन ध्रुवाच्या पाठीशीं होते. त्यांनीं त्याला नारायणास्त्राची प्राप्ति करून दिली. आसुरी मायेनें लढणाऱ्या त्या गुह्यक-यक्षांची पीछेहाट होऊं लागली. केवळ पीछेहाट नव्हे, तर त्यांचा भयानक संहारहि सुरू झाला. राजा ध्रुवाला आतां मागें फिरवायचें कोणीं?

शेवटीं ध्रुवाचा पितामह भगवान् मनु यालाच पाचारण करण्यांत आलें. मनूनें ध्रुवाला उपदेश केला—

"ध्रुवा, सर्व भूतांच्या ठायीं वास करणाऱ्या हरीला तूं प्रसन्न करून घेतलेंस. मग हा भूतमात्राचा वध तुला शोभतो काय? हा वैष्णवांचा पंथ नव्हे. ('नायं मार्गो हि साधूनां हृषीकेशानुवर्तिनाम्।') एकाच्या अपराधासाठीं अनेकांची हत्या करणें उचित नव्हे. भगवंताला प्रसन्न करावयाचा मार्ग म्हणजे तितिक्षा, करुणा,

मैत्री व सर्वांच्या ठिकाणीं समत्वबुद्धि हा होय ! मनूच्या उपदेशानें ध्रुवाचा क्रोध शमला. गुह्यकराज कुबेर व ध्रुव यांच्यांत मित्रभाव निर्माण झाला. कुबेरानें ध्रुवाला वर देऊं केला. हरिपदीं मति स्थिर राहो, ( 'हरौ स वव्रेऽचलितां स्मृतिम् । ' ) हाच वर त्यानें मागितला.

ध्रुवानें दीर्घकाळ राज्य केलें. त्याची धर्मशीलता, चारित्र्यसंपन्नता, न्यायबुद्धि व प्रजावात्सल्य यांमुळें सर्व प्रजा त्याला पिताच मानूं लागली.

अखेर इहलोकींचा निरोप घेण्याचा अंतिम क्षण येऊन ठेपला. विष्णुदूत त्याच्यासाठीं दैदीप्यमान विमान घेऊन उपस्थित झाले होते. आकाशांत जणूं पौर्णिमेचा चंद्र शीतल प्रकाशानें विलसावा; तसें तें विमान शांत स्निग्ध तेजानें प्रकाशत होतें. वानप्रस्थाश्रमी राजा ध्रुव पद्मासन घालून हरिचिंतनांत मग्न होऊन बसला होता. हृदयांत भक्तीचा व नेत्रांतून आनंदाश्रूंचा पूर लोटला होता. 'ॐ नमो भगवते वासुदेवाय ' या मंत्राच्या प्रत्येक अक्षराबरोबर शरीर रोमांचांनीं पुलकित होत होतें. विमान थांबलें. विमानाचें सारथ्य करणारे दोन किरीटकुंडलधारी, श्यामवर्ण किशोर सुनंद व नंद पुढें आले. ध्रुवाला त्यांनीं आपला परिचय करून दिला. ते त्याला म्हणाले, " आम्ही भगवंताचे पार्षद. वयाच्या पांचव्या-सहाव्या वर्षींच तूं भगवंताकडून अढळपदाचें वरदान मिळवलें होतेंस. तुला आठवतच असेल. तेथें तुला नेण्यासाठीं आम्ही आलों आहोंत. "

ध्रुवानें त्यांना विनम्रभावानें वंदन केलें. नित्याचीं अभिषेकादि कर्में उरकलीं. ऋषिमुनींना अभिवादन करून त्यांचे आशीर्वाद घेतले. त्या कनकमय विमानाची पूजा करून त्याला प्रदक्षिणा घातली. देवांच्या दुंदुभी वाजत होत्या. गंधर्वांकडून पुष्पवृष्टि होत होती. मृत्यूच्या माथां पाय देऊन ध्रुवमहाराजांची स्वारी नक्षत्रतारा-सुशोभित आकाशमंडळांत ज्योतिश्चक्रामध्यें चिरस्थानीं विराजमान होण्यासाठीं निघाली होती. आतां फक्त विमानांत पाऊल टाकायला कांहीं पळा-विपळांचाच अवकाश होता. महात्मा ध्रुव एक पाऊल मागें सरला.

" माता सुनीति-माझ्या मातेला घेतल्याविना मी स्वर्गांत येऊं ? छे, छे ! तें माझ्यानें होणार नाहीं "—ध्रुवाची निश्चयी वाणी बाहेर पडली.

एके वेळीं त्यानें विष्णुपदासाठीं पृथ्वीचें साम्राज्य झिडकारलें होतें. आज मातृप्रीतीस्तव विष्णुलोकींचें सिंहासन अव्हेरावयास तो तयार होता. देवदूतांनीं त्याचा तो निश्चय ओळखला. सस्मित वदनानें त्यांनीं गगनमंडळाकडे अंगुलीनिर्देश केला. सुनीतीचें विमान दिव्यलोकाकडे वाटचाल करीत होतें. यक्ष-गंधर्वांच्या पुष्पवृष्टींत झाकून गेलें होतें. महात्मा ध्रुवानें तें धन्यतेनें पाहिलें आणि मगच त्याच्यासाठीं आलेल्या स्वर्गीय यानाला अभिवादन करून त्यांत पाऊल ठेवलें.

* * *

# ३ : अजामिल कथेंतील भक्तितत्त्व

' श्लोकार्धेन प्रवक्ष्यामि यदुक्तं कोटिविस्तरैः । ' ही आमच्या पुराणकारांची प्रतिज्ञा असली, तरी ते ती क्वचितच पाळताच. पण पुराणांतील कथा जेव्हां लोकभाषेंत येतात, तेव्हां मात्र या उक्तीचें नकळत पालन झालेलें दिसतें. निदान मराठींत तरी भागवतांतील जीं आख्यानें रंगविलीं आहेत, त्यांच्या बाबतींत तसें झालें आहे. यामुळें मूळ श्रीमद्भागवतांतील कथा सर्वांसमोर येत नाहीं व शंका-कुशंकांना जागा होते. मराठींतील ध्रुवाख्यानाचा शेवट पहा; प्रल्हादकथेचा शेवट पहा. बाल ध्रुवाला श्रीविष्णूंनीं प्रसन्न होऊन दर्शन दिलें व त्याला अढळ स्थानाची प्राप्ति झाली, येथें कथेचा शेवट होतो. हिरण्यकशिपूचा अंत होतांच प्रल्हादाला वैकुंठलोकाची प्राप्ति झाली, अशी कथा कथा-कीर्तनकार सांगून मोकळे होतात. कदाचित् सामान्य, प्राकृत मनाला फलश्रुतीचें आकर्षण अधिक वाटतें म्हणून म्हणा, भक्तीच्या महिम्याचा ठसा बिंबवण्यासाठीं तेथेंच थांबणें इष्ट वाटत असल्यानें म्हणा वा कलात्मकतेच्या दृष्टीनें कथेंतील उत्कर्षबिंदूवर शेवट करणें उचित वाटत असल्यानें म्हणा, कवि व कीर्तनकार कथा येथेंच सोडतात. पण श्रीमद्भागवतकारांना भक्तिप्रसाराबरोबरच लोकशिक्षणाचें व समाजधारणेचें महत्त्व वाटत असावें. त्यामुळें परमेश्वरप्राप्तीनंतर ध्रुवानें पृथ्वीतळावर न्यायनीतीनें अनंत वर्षें कसें राज्य केलें व प्रल्हादानेंहि वैकुंठपतीच्या दर्शनानंतर चातुर्वर्ण्यादि धर्म व गृहस्थाश्रमादींतील कर्तव्यें कशीं समजून घेतलीं, हें सांगायला ते विसरत नाहींत.

अजामिलकथेबाबत तेंच झालें आहे. अजामिल हा महापापी; केवळ स्त्रीलंपटच नव्हे, तर सुलक्षणी गृहलक्ष्मीचा त्याग करून दासीपति बनलेला. यमदूतांचे पाश गळ्याभोवतीं पडतांच भयविव्हल होऊन ' नारायण ' म्हणून आपल्या लाडक्या कनिष्ठ पुत्रास हाका मारतो काय आणि ही हाक, हा धावा आपला स्वामी वैकुंठेश्वर याचा आहे असें वाटून श्रीविष्णूचे दूत त्याची सुटका करतात काय ! पण नामाचा अगाध महिमा भाविकांवर ठसविण्यासाठीं एवढाच कथाभाग रंगवून

सांगितला जातो. भाविकांचें समाधान त्यानें होवो; 'न बुद्धिभेदं जनयेत् अज्ञानाम्'—या दृष्टीनें कविकथाकारांशीं आमचें भांडणहि नाहीं. पण यांत कांहींतरी अंधश्रद्धेची जपणूक होते व श्रीमद्भागवतकारांनाहि अन्याय होतो, असें वाटतें. म्हणून मुळांतील त्या कथेचें स्वरूप व त्यामागील विचारसरणी स्पष्ट व्हावी, असें वाटतें.

'अन्ते मतिः सा गतिः ।' हें सूत्र आपण समजूं शकतों. मृत्यूचा क्षण म्हणजे इहलोकींचें सर्वस्व गमावण्याचा क्षण. अशा वेळीं सर्व जीवनभर जें उराशीं बाळगलें असेल, प्राणपणानें जपलें असेल, ज्याचा सतत ध्यास घेतला असेल, नित्याच्या हजारों उलाढालींच्या फापटपसाऱ्यामागें जें स्थिरत्वानें मनांत दडलें असेल, त्याचीच आठवण अशा वेळीं होणार. स्वभावमूल बनलेल्या वासनेंत वा भावनेंत मन गुंतणार आणि त्या वासनाबीजांतून पुनः पुढील जन्माचा संसारवृक्ष अवतरणार, हें पुनर्जन्म मानणारांना एक वेळ समजूं शकेल. पण सर्व जन्म पापाच्या चिखलांत लोळत पडलेला देह, मृत्यूच्या क्षणीं अभावितपणें मुखांतून ईशनाम बाहेर पडतांच, सुवर्णाचा व्हावा नि भगवंताच्या चरणकमलांतील अमृत-बिंदूचें पान करण्याचें सद्भाग्य लाभावें, ही घटना केवळ अतर्क्यच नव्हे, तर तर्कविसंगतहि वाटते.

पाप आणि पुण्य या कल्पना कुणाला खुळचट वाटतील. स्वर्ग-नरकाशीं त्यांची सांगड घातल्यानें तशी त्यांची अवस्था झाली आहे खरी. पण 'कर्माचा कायदा' तर सर्वांना मान्य आहे. शुभ कर्मांचीं फलें शुभ मिळावींत, अशुभांचीं अशुभ मिळावींत, यांत न्याय आहे. जगांत सत्य व न्याय हीं असावींत—निदान स्वतःला तरी लाभावींत, असें प्रत्येक बालबुद्धीच्या माणसाला व बालकालाहि वाटतें. सत्-कृत्याला व सज्जनांना अपयश आलें कीं सामान्य माणसेंहि हळहळतात तीं यामुळेंच. कर्म, अकर्म, विकर्म यांचे वेदान्तांतील अर्थ कांहींहि असोत, कर्म म्हणजे जगण्या-साठीं करावयाचें समाजमान्य कर्तव्यकर्म, अकर्म म्हणजे आळशीपणा व समाज-विद्रोह आणि विकर्म म्हणजे विशेष तऱ्हेचें समाजपोषक, सेवाभावमूलक परोप-कारकृत्य—अशी कर्मांची त्रिविध मांडणी सामान्यांना परिचित असते. या कर्मांचीं फळें कर्त्याला तशींच मिळावींत, आळशाला व समाजविद्रोह्याला दंड मिळावा, समाजमान्य जीवनपोषक कर्में करणारांची इहयात्रा सुखानें पार पडावी व समाज-सेवकांची समाजांत प्रतिष्ठा वाढून कीर्तिरूपानें त्यांचें नांव, त्यांचा आदर्श राहावा—

परलोक असला तर तेथें त्यांची बूज व्हावी, हा न्याय आहे. समाज–मग तो शिक्षितांचा असो, अशिक्षितांचा असो–हा कुठल्या तरी 'न्याय'-पद्धतीवरच चालतो. निसर्गांतील न्यायतत्त्व (नॅचरल लॉ) सुसंस्कृत समाजांत अधिक परिणत स्वरूपांत विधिनिषेधांच्या व कायदा, निर्बंध इत्यादींच्या द्वारां व्यक्त होत असतें. अवैध, बेकायदा कृत्याला शासन, दंड, प्रायश्चित्त मिळालेंच पाहिजे, असें सामान्य माणसेंहि अपेक्षितात. तरच धर्मपालन, धर्मरक्षण होईल; समाजांतील न्यायावरचा विश्वास अढळ राहून समाजधारणा होईल, हा त्यामागें विचार आहे. पण परमेश्वराच्या क्षणिक व अभावित नामोच्चारानें जर पापांच्या राशी जळून जात असतील, तर परमेश्वराच्या दरबारींहि वशिलेबाजी व लांच-लुचपत आहे, असें मानण्यास जागा निर्माण होईल. परमेश्वराचें नांव म्हणजे 'राजाज्ञेचीं अक्षरें' असें ज्ञानेश्वर म्हणतात. तीं चामड्यावर उमटलीं तरी 'तेणें विकतीं आघवीं' (ज्ञा. ९·४५४) असा त्यांचा प्रभाव ते सांगतात. वाटेल तेवढें पाप जन्मभर करावें व अंतीं ईश्वराचें नांव घेऊन त्याची निष्कृति करावी, ही रीत समाजाला खास हितावह नाहीं–नव्हे घातुकच आहे. युरोपांत अशी अंधश्रद्धा एके काळीं बळावली होती. पोप 'पापमुक्ततेचे पास' प्रेतांच्या गळ्यांत बांधूं लागले होते. मार्टिन ल्यूथरला या प्रथेविरुद्ध बंड करावें लागलें. 'बी' कवींनीं ज्ञानेश्वरांचा उल्लेख 'बंडवाल्यांतील पहिला' असा केला आहे. भक्तितत्त्वाचा प्रसार करतांना या बंडवाल्यानें या कर्मांच्या न्यायाची कांहीं दखल घेतली आहे काय? अजामिळाची कथा आणि तत्सदृश अन्य कथा या तऱ्हेचे प्रश्न आपल्यासमोर निर्माण करतात.

गीतेंतील आणि भागवतांतील कांहीं श्लोक या शंकांना पुष्टिच देतात. गीतेंतील श्लोक ९. ३० 'अपि चेत् सुदुराचारो' हा आहे. पुढील श्लोकांत तो दुराचारी 'क्षिप्रं भवति धर्मात्मा' असें सांगितलें आहे. ३२ व्या श्लोकांत 'पापयोनयः' देखील 'परां गतिं यान्ति' असें आश्वासन आहे. श्रीमद्भागवतांतील श्लोक असा आहे :

म्रियमाणो हरेर्नाम गृणन् पुत्रोपचारितम् ।
अजामिलोऽप्यगाद्धाम किं पुनः श्रद्धया गृणन् ॥ ६. २. ४९

असा आहे. 'किं पुनः श्रद्धया गृणन्'–या चरणावरून श्रद्धेचें सामर्थ्य व फल सांगण्यासाठीं अजामिलाची कथा केवळ 'अर्थवादात्मक' तर नव्हे, अशीहि

8100108 9636 ...2.9.1994

क्षणभर शंका येते. पण संपूर्ण कथा, मागील-पुढील संदर्भ व गीता-श्लोकावरील श्रीज्ञानदेवांचें भाष्य पाहिल्यावर यांत कांहीं वेगळाच आशय असल्याची खात्री पटते.

अजामिलाची कथा श्रीमद्भागवताच्या सहाव्या स्कंधांतील पहिल्या तीन अध्यायांत आहे. या कथेची मांडणीहि इतर अनेक कथांप्रमाणें नाट्यपूर्ण आहे. नरकवास व त्यांतील यातना टाळावयाचा खुला मार्ग कोणता, अशी राजा परीक्षिताची श्रीशुकमुनींपाशीं पृच्छा आहे. माणसें पापक्षालनार्थ प्रायश्चित्त घेतात नि पुनः–

कर्मणा कर्मनिर्हारो न ह्यात्यन्तिक इष्यते ।
अविद्वदधिकारित्वात् प्रायश्चित्तं विमर्शनम् ॥ ६. १. ११

प्रायश्चित्तरूप कर्मानें सर्व पातकांचा निरास होत नाहीं. प्रायश्चित्तानें अज्ञान नाहींसें होत नाहीं. पूर्वपातकाचे संस्कार अज्ञानी माणसाला पुनः पापकर्मास प्रवृत्त करतात.

तेव्हां अज्ञान समूळ नष्ट होणें हीच खरी गरज. त्यासाठीं यमनियमांचा मार्ग 'क्षेमाय कल्पते ।' कारण तप, शम, दम, ब्रह्मचर्य आदींमुळें व्यक्ति हळूहळू ज्ञानी, विवेकी होते व मग गीतेंत म्हटल्याप्रमाणें ज्ञानाग्नि सर्व कर्मांचा, पातकांचा निरास करूं शकतो. पण हा मार्गहि दुष्कर व दूरचा. त्यापेक्षां जवळचा रस्ता भक्तीचा. श्रीशुकमुनि म्हणतात :

केचित् केवलया भक्त्या वासुदेवपरायणाः ।
अघं धुन्वन्ति कार्त्स्न्येन नीहारमिव भास्करः ॥ ६.१.१५

एका मोठ्या सुरेख उपमेनें शुकमुनि सांगतात, सूर्यकिरणांनीं धुकें विलय पावावें, अशा तऱ्हेनें वासुदेवपरायण माणसें केवळ भक्तीच्या जोरावर सर्व पाप नाहींसें करतात. पुढें श्लोक १८ मध्यें पुनः एका उपमेनें सांगितलें आहे कीं, मद्यपात्रें नदींत कितीहि प्रक्षालन केलीं तरी तीं पवित्र होत नाहींत. तद्वत् मन नारायणाभिमुख नसेल तर प्रायश्चित्तांनीं तें शुद्ध होत नाहीं. 'वासुदेवैकशरणता' हाच खरा मार्ग आणि तो सिद्ध करण्यासाठीं कान्यकुब्ज देशांतील दासीपति अजामिलाची कथा श्रीशुकाचार्य सांगत आहेत. मलयपर्वतावर अगस्त्यमुनींकडून त्यांना ती अवगत झाली, असें त्यांनीं अखेरीस सांगितलें आहे ( ६·३·३५ ).

या कथेंतील नायकाचें नांव 'अजा-मिल' हें मोठें सार्थ वाटतें. उग्र मदोन्मत्त बोकडासारखें त्याचें आचरण आहे. मदनाची तो शिकार बनला.

सदाचार सोडून वेश्यारत झाला व तिला संतुष्ट राखण्यासाठीं द्यूत, लूटमार यांचाहि आश्रय करता झाला. आणि एक दिवस अन्तकाल येऊन ठेपला. यमदूतांस बघून त्यानें लाडक्या नारायणास भीतीनें साद घातली. त्यामळें विष्णुदूत तेथें उपस्थित झाले. सर्वपरिचित कथा येथेंच संपते. पण श्रीमद्‌भागवतांतील कथा येथें सुरू होते. खरा नाट्यमय प्रसंग आहे तो पुढेंच.

धर्मराज यमाचे दूत व भक्तवत्सल विष्णूचे दूत यांच्यांत संवाद सुरू होतो. या संवादांतून अजामिलाचें पूर्वचरित्र आपणांस समजतें. अजामिल मोठा श्रुतसंपन्न, शीलवृत्त, साधु, सेवाशील असा ब्राह्मण होता. पित्राज्ञेनें वनांतून समिधा-फुलें आणीत असतां एक कामोत्तेजक दृश्य त्यानें पाहिलें. कुणीतरी आचारभ्रष्ट मनुष्य पिऊन उन्मत्त झालेल्या एका वारयोषितेबरोबर नाना कामचेष्टा करतांना त्यानें पाहिला. तिचें लावण्य व शृंगारचेष्टा यांनीं अजामिलाचा विवेक सुटला. प्रयत्न करूनहि त्याला मन आवरतां आलें नाहीं. तिचाच त्याला ध्यास लागला व प्रथम तिनें त्याचा व अखेरीस त्यानें तिचा कबजा घेतला. समाजांत कामोत्तेजक क्रीडा-कथा उघडपणें स्वैरतेनें वावरूं लागल्या, तर सत्यव्रत व शुचि माणसेंहि कशीं अधःपतित होतात, याचें अजामिल हें उदाहरण. भागवतकारांना या घटनेंतूनहि कांहीं सुचवायचें नसेल कशावरून ?

अशा पतित, स्खलित माणसावर यमदूतांनीं आपला अधिकार सांगितला तर नवल नव्हे. पण विष्णुदूतांनीं त्याला हरकत घेतली. 'न कळतां पद अग्निवरी पडे', तरी परिणाम ठरलेला. तद्‌वत् यानें 'नारायण' नांव मुखांतून उच्चारलें, त्यामुळें याचें पाप नष्ट झालें, असा त्यांचा दावा.

अजामिल मृतवत् अवस्थेंत पडलेला आहे. त्याचा लिंगदेह जराजर्जर शरीराचा त्याग करण्याच्या तयारींत आहे. आणि इकडे त्याला न्यावयाचें कुणीं, असा यम-विष्णूच्या दूतांत वाद निर्माण झाला आहे. मोठी नाट्यपूर्ण घटना आहे ही ! वादाचा येथेंच निर्णय लागून कुणा तरी दूतांनीं पाशांत वा पालखींत अजामिलाचा जीव नेला असता, तर कथा येथेंच संपली असती आणि पाप्यांना जन्मभर पाप करून अंतीं फक्त देवसदृश नाम उच्चारून स्वर्गांत जाण्याचा परवाना लाभला असता. पण भागवतकारांनीं कथेला येथें नवलाईची कलाटणी दिली आहे व तिच्या द्वारां भक्तियोगाचें रहस्य प्रकट केलें आहे. ती कलाटणी अशी :

विष्णुदूतांच्या भाषणानें हतबल होऊन यमदूत यमधर्माकडे 'आपण भूतलावर वागावें कसें ?' हें विचारण्यासाठीं परतले. यमपाशांतून त्याची सुटका झाली. पण विष्णुदूतांनीं त्याला हात लावला नाहीं. स्वप्नांतून जागें व्हावें, तसा अजामिल शुद्धीवर आला. त्या दोन देव-दूतांतला संवाद त्याला अंधुक आठवत होता. दिव्य, सौम्य हरिरूपधारी दूतांना वंदन करून तो कांहीं विचारणार, तोंच ते तिरोधान पावले. पण ही घटना अजामिलाच्या जीवनांत क्रांतिकारक ठरली. विष्णुदूतांच्या मुखांतून भागवत-रहस्य ऐकायला मिळालें व त्याचबरोबर आपल्या अधःपतित जीवनाची त्याला आठवण झाली.

**क्व चाहं कितवः पापो ब्रह्मघ्नो निरपत्रपः ।**
**क्व च नारायणेत्येतद् भगवन्नाम मंगलम् ॥ ६. २. ३४**

हा विरोध दृष्टीसमोर उभा राहिला. 'धिङ्मां' म्हणून त्यानें स्वतःचा धिक्कार केला. वृद्ध मातापितरांचा व तरुण पतिव्रता सहधर्मचारिणीचा आपण त्याग केला, याबद्दल त्याचें मन खेदानें, पश्चात्तापानें भरून आलें. क्रीडामृगाप्रमाणें जारिणीशीं सुखोपभोग भोगण्यांत आयुष्य बरबाद केलें, त्याबद्दल त्याला स्वतःचीच किळस आली.

**सर्वभूतसुहृद् शान्तो मैत्रः करुण आत्मवान् । ६. २. ३६**

असा मी बनेन, असा त्यानें शुभसंकल्प केला. श्रीशुक म्हणतात, क्षणभर घडलेल्या साधुसहवासानें तो 'जातनिर्वेद'—अत्यंत वैराग्यशील—बनला आणि गंगाद्वारीं जाऊन त्यानें आपलें मन आत्मस्वरूपीं लावलें. भगवत्स्वरूपीं बुद्धि स्थिर झाल्यावरच यथाकाल 'हैम विमान' त्याला नेण्यास आलें आणि वैकुंठलोकीं त्याचें गमन झालें.

अजामिलकथेंतलें रहस्य असेल तर तें हें कीं, अंतःकरणांत भक्तीची भावना स्फुरली कीं जीवनांत क्रांति होते. केवळ हृदयपरिवर्तन नव्हे, तर सर्व व्यक्तिमत्त्वाची पुनर्रचना ( रिबिल्डिंग ऑफ पर्सनॅलिटी ). अशा तऱ्हेची व्यक्तिमत्त्वाची नवसंघटना अजामिलाच्या बाबतींत झाली. त्यामुळें त्याचा सारा जीवनक्रम बदलला, जीवनाचीं उद्दिष्टेंच बदललीं. भावजीवनांत उलथापालथ झाली कीं व्यक्तिमत्त्वाची नवसंघटना होऊं शकते, हें तत्त्व आधुनिक मानसशास्त्र मान्य करतें. आपल्या पुत्राचें नांव 'नारायण' ठेवावें व त्यालाच अंतकाळीं बाहावें, ही बुद्धि त्याच्या

पूर्वसुकृताचा परिणाम होता काय ? असेलहि. पण तो क्षण, ती हाक मुक्तीची घटका ठरली ती अंतिम मुक्तीच्या दृष्टीनें नव्हे तर पापी, अधःपतित, वासनायुक्त आचारांतून मुक्तीच्या दृष्टीनें वर उद्धृत केलेल्या ( ६. १. १५ ) श्लोकांत भक्तीला 'भास्करा 'ची उपमा दिली आहे, तिचें मर्म येथें उलगडतें. भक्तीच्या प्रकाशानें नवा आलोक दृष्टीसमोर उभा रहातो, जीवनाकडे बघण्याची नवी दृष्टीच प्राप्त होते. संसाराचें मिथ्यात्व पटलें न पटलें, तरी ' ही ईश्वरी लीला ' हा भाव दृढ होतो व ' वासुदेवः सर्वं इति ' या भावनेनें तदर्पणबुद्धीनें कर्में होऊं लागतात. अजामिल एकदांच नामस्मरण करून मुक्त झालेला नाहीं. त्या एका हाकेनें फक्त त्याला नवजीवनाची संधि मिळाली.

अजामिलाचें आख्यान व सहाव्या स्कंधांतील १ ते ३ अध्याय हें एक प्रकारें भगवद्गीतेच्या नवव्या अध्यायावर सोदाहरण भाष्यच आहे. ' त्रैविद्या मां सोमपाः पूतपापाः । ' (गी. ९. २० ) या श्लोकाची छटा ' त्रय्यां जडीकृतमतिर्मधुपुष्पितायां ' ( भा. ६. ३. २५ ) श्लोकांत स्पष्ट दिसते. आणि ज्ञानयज्ञादिकापेक्षां ' सततं कीर्तयन्तो मां यतन्तश्च दृढव्रताः । ' मलाच येऊन मिळतात, हें दोहोंचेंहि प्रतिपाद्य आहे. गीतेंत ' अपि चेत् सुदुराचारो ' म्हणून जो उल्लेख आहे, त्याचें अजामिल हें ढळढळीत उदाहरण. पण हा दुराचारी ' क्षिप्रं भवति धर्मात्मा ' हें खरें नाहीं. खुद्द गीतेंतच या श्लोकांत ' भजते मामनन्यभाक् '–तनमनधनानें तो ईश्वरभक्ति करूं लागेल तर–ही त्यासाठीं अट आहे.अशी भक्ति करणारा दुराचारी राहीलच कसा ? तो ' धर्मात्मा ' च होतो–याचाच अर्थ त्याच्या आंतरजीवनांत महान् स्वरूप-परिवर्तन होतें. असे भक्त ' अनन्याश्चिन्तयन्तः ' असावे लागतात, असें गीता म्हणते. एक ईशचिन्तनाचा ध्यास. त्याचें संकीर्तन सुरू झालें कीं विषयसंगाला अवसरच कुठें ? दुरात्म्याच्या आंतरजीवनाचें हें परिवर्तन झाल्यावर त्याचें स्वरूप कसें बनतें, हें ' अपि चेत् सुदुराचारो ' या श्लोकावरील श्रीज्ञानेश्वरांच्या समर्थ भाष्यांत पाहण्याजोगें आहे :

ते पापयोनि मूढ । मूर्ख ऐसे जे दगड ।
परी माझ्या ठायीं दृढ । सर्व भावें ॥
जयांचिये वाचे माझे आलाप । दृष्टी भोगी माझेंच रूप ।
जयांचें मन संकल्प । माझाचि वाहे ॥

माझिया कीर्तीविण । जयांचे रिते नाहीं श्रवण ।
जया सर्वांगीं भूषण । माझी सेवा ॥
जयांचें ज्ञान विषा नेणे । जाणीव मजचि एकातें जाणे ।
जया ऐसें लाभे तरी जिणें । एऱ्हवीं मरण ॥ ज्ञा. ९. ४४३-४७

अशा रीतीनें केवळ वाङ्मनःकायांनींच नव्हे,तर आंतर जाणिवेनेंहि ते परमेश्वरमय होतात. हरिनाम, हरिसंकीर्तन, हरिसेवा या वातावरणाचा लाभ म्हणजेच जीवन, ही दृढव्रत, 'सम्यग्व्यवसित' साधु बनलेल्यांची अवस्था आहे. कर्मांचा कायदा चुकवण्याचा मार्ग गीता, भागवत व ज्ञानेश्वरी कुणीच सांगत नाहीं. सांगत असतील तर जीवनाची कळाकांति वाढविणारें सर्व जग ईश्वरमयतेनें नटल्यामुळें त्याकडे शुभ-सुभग दृष्टीनें पहावयास शिकवणारें व सर्वत्र ईश्वरत्व असल्यानें सर्वांशीं सम-भावानें वागून–'जाति अप्रमाण' मानून माणुसकीचें महत्त्व सांगणारें भक्तीचें महाकाव्यच सांगतात.

* * *

# ४ : प्रल्हादाख्यानांतील सौंदर्य-बोध

श्रीमद्भागवतांतील प्रल्हादाचें आख्यान सामान्य जनतेंत दोन कारणांनीं प्रसिद्ध आहे : एक प्रल्हादाच्या अचल भक्तीसाठीं व दुसरें श्रीविष्णूच्या अद्भुत नृसिंहावतारासाठीं. बाल-बुद्धीच्या वाचकांना प्रल्हादाचा अमानुष छळ, नृसिंहाचा स्तंभांतून अवतार, त्याचें ना मानवी ना पाशवी असें रूप आणि प्रचंड हिरण्यकशिपूचा भीषण संहार या अद्भुत घटनांचें आकर्षण वाटावें, हें स्वाभाविक आहे. या अद्भुत, अतिमानवी व अतर्क्य घटनांतून ईश्वराच्या सर्वसाक्षित्वाची व भक्तवत्सलतेची कल्पना ' बाळां 'ना यावी व त्यांच्यांत ईश्वर-भक्तीचें बीजारोपण व्हावें, अशी ही योजना दिसते. पण अधिक विवेकी व भाविक जन प्रल्हादाच्या प्रगाढ भक्तीलाच प्राधान्य देतात, हें लक्षांत घेतलें पाहिजे. म. गांधी भक्त प्रल्हादाला ' सत्याग्रही पुरुषा ' चा आदर्श मानीत, याचें या ठिकाणीं स्मरण होतें. सर्वसामान्य जनतेंत या आख्यानांतील स्थूल व ढोबळ घटनांचेंच ज्ञान आहे. पण श्रीमद्भागवताच्या सप्तम स्कंधांतील हें आख्यान कथानकाची मांडणी, व्यक्तिरेखा, काव्यमयता व तत्त्वज्ञान या सर्वच दृष्टींनीं सरस आहे. त्यांतील या पैलूंपैकीं कांहींचा येथें परामर्श घेण्याचें योजिलें आहे.

सातव्या स्कंधांतील दहा अध्यायांत वर्णिलेल्या या कथेचा प्रारंभ परीक्षिताच्या एका मार्मिक प्रश्नानें झालेला आहे, हें लक्षांत घेण्याजोगें आहे. परीक्षिताची ही चिकित्सक वृत्ति कदाचित् कांहीं कर्मठ जन नास्तिकभावांत गणतील, पण श्रीशुकांनीं त्या चिकित्सक प्रश्नाचें स्वागत केलें आहे. परीक्षिताचा प्रश्न असा आहे : " भगवान् जर ' समः प्रियः सुहृत्...भूतानां ' असा आहे, सर्वच प्राणिमात्रांचें हित करणारा, त्यांच्याकडे समदृष्टीनें पाहणारा असा आहे, तर त्यानें इंद्राचा कैवार घेऊन दैत्यांचा निःपात कां करावा ? " ' वैषम्य-नैर्घृण्य-प्रसंग ' म्हणून जो ब्रह्मसूत्रांत आक्षेप उभा करून त्याला उत्तर दिलें आहे, तसाच हा प्रसंग आहे. पण अशा तऱ्हेची शंका घेणारा परीक्षित हा पहिला नव्हे.

त्याचा आजा युधिष्ठिर यानें हा प्रश्न पूर्वीं नारदमहर्षींना, राजसूय यज्ञाच्या अखेरीस शिशुपालाचा वध श्रीकृष्णानें केला व चैद्य शिशुपालाला तत्क्षणीं सायुज्य-मुक्ति लाभली तेव्हां केला होता. नारदमुनींचें उत्तर व श्रीशुकाचार्यांचें उत्तर जवळ जवळ एकच आहे. गीतेंतहि तें येऊन गेलें आहे. त्याचा विचार नंतर करावयाचा आहे. तत्पूर्वीं मुख्य कथाभागांतील सौंदर्यस्थळें पाहूं.

हिरण्यकशिपु व प्रल्हाद यांची कथा नारदमुनींच्या तोंडून वदवली आहे. आजकाल बोलपट-नाटकांत फ्लॅश बॅक पद्धतीचें तंत्र अवलंबिण्यांत येतें. तें एक नावीन्यपूर्ण तंत्र म्हणून सुरुवातीस समजलें गेलें. पण श्रीमद्भागवतकारांनींहि त्याच तंत्राचा अवलंब केला आहे. शिशुपालाच्या पूर्वजन्मकथनाच्या ओघांत हिरण्यकशिपूनें स्वपुत्र प्रल्हादाच्या हत्येसाठीं नाना उपाय योजले, हें सांगून टाकलें आहे. कथा एकदम मध्यावर सुरू केली आणि 'प्रिय पुत्राचा विद्वेष हिरण्यकशिपूनें कां करावा ?' अशी युधिष्ठिराची जिज्ञासा व्यक्तवून पुढें सर्व कथा निवेदन केली आहे.

हिरण्याक्ष व हिरण्यकशिपु हे दोघे बंधु. दोघे 'हिरण्या'चे म्हणजे सुवर्णाचे—भौतिक विभवाचे उपासक होते, हें भागवतकारांनीं त्यांच्या नांवांतून सुचवलें आहे. हिरण्याक्षाचा वध श्रीहरीनें वराहरूप घेऊन केला व म्हणून त्याचा सूड घेण्याची भीषण प्रतिज्ञा हिरण्यकशिपूनें केली. आपल्या शूलानें श्रीहरीचा कंठ चिरून त्याच्या रक्तानें भावाला तर्पण करण्याचा त्यानें विडा उचलला. देवसमूह श्रीहरीच्या आधारावर बलवत्तर; तेव्हां मुळावरच घाव घातला कीं, फांद्या आपोआप गळून पडतील, ('...कृत्तमूले वनस्पतौ, विटपा इव शुष्यन्ति।') असा त्यानें खोलवर विचार केला. वर्णाश्रम, विहितकर्में व यज्ञयाग यांचा या विष्णूला आधार; म्हणून त्यांचा उच्छेद करण्याचा आदेश हयग्रीव, पुलोमी इत्यादि दानवांना त्यानें दिला. एका बाजूस आर्यांची यज्ञसंस्था, आश्रमव्यवस्था व वर्णाश्रमपद्धति आणि दुसऱ्या बाजूला तदितर अन्य संस्कृति यांचा हा संघर्ष असावा, अशी शंका स्वाभाविकच येते.

या कथेंतील मुख्य व्यक्ति दोनच : एक हिरण्यकशिपु व दुसरा प्रल्हाद. दोघेहि एक प्रकारें 'वेदान्ती' आहेत, हें लक्षांत घेण्याजोगें आहे. आपल्या बंधूच्या वधाचा सूड घेत यावा म्हणून तीव्र तपश्चर्येनें अ-मानवी व दैवी असें

अतुलनीय व अधर्षणीय सामर्थ्य प्राप्त करून घेण्यासाठीं हिरण्यकशिपु तपश्चर्येस जावयास निघाला. जाण्यापूर्वीं आपली माता, बंधु व बंधुपत्नी यांचें सांत्वन त्यानें ज्या प्रकारें केलें आहे तें पाहिलें म्हणजे हिरण्यकशिपुहि ज्ञानी होता, याची प्रचीति येते. ‘ रिपोरभिमुखे श्लाघ्यः शूराणां वध ईप्सितः ’ – शत्रूला तोंड देत धारातीर्थीं देह ठेवणें हें शूरांना भूषणावह, हें तर तो सांगतोच, पण मृत्युलोकीं माता-पुत्र इत्यादींचा सहवास हा ‘ संवासः प्रपायामिव ’–पाणपोईंत, सराईंत एकत्र आलेल्या प्रवाशांच्या सहनिवासाप्रमाणें आहे, हेंहि तो सांगतो. भालीं लिहिलेलें मरण चुकत नाहीं, हें सांगण्यासाठीं सर्वपरिरिचित सुभाषित भागवतांत हिरण्यकशिपूच्या मुखीं आहे. तें म्हणजे—

> पथि च्युतं तिष्ठति दिष्टरक्षितं गृहे स्थितं तद्विहतं विनश्यति ।
> जीवत्यनाथोऽपि तदीक्षितो वने गृहेऽपि गुप्तोऽस्य हतो न जीवति ।। ७. २. ४०

दैवानें राखली तर रस्त्यांत पडलेली वस्तुहि सुरक्षित राहते, पण दैवाचें संरक्षण नसेल तर घरांत सुरक्षित ठेवलेली वस्तुहि नष्ट होते. तीच गोष्ट माणसाची. त्याची मेहेरनजर असेल तर रानांत निराधार असलेलाहि माणूस सुखरूप राहतो. दैव कोपलें तर घरांत जपला जात असूनहि तो मरण पावतो.

तेव्हां या जगांत कुणी कुणाकरितां शोक करूं नये. आपण व परके हा भेद अज्ञानजनित आहे. वस्तुतः सर्व आपण एकच. ‘ क आत्मा कः परो वाऽत्र स्वीयः पारक्य एव वा । ’ अशा आत्मज्ञानाच्या गोष्टी हिरण्यकशिपु बोलतो.

इतक्या ज्ञानी माणसानें प्रल्हादासारख्या पुत्राचा द्वेष, छळ व त्याग करण्यास उद्युक्त व्हावें, ही घटना विस्मयदायक आहे. पण त्याचें कारण हिरण्यकशिपु हा प्राधान्येन देहवादी व भोगवादी आहे. आपल्या उग्र तपश्चर्येनें ब्रह्मदेवापासून त्यानें वर मिळवला तो ‘ अप्रतिद्वंद्वता युद्धे, ऐकपत्यं च देहिनाम् । ’ तपोयोग-प्रभावानें नाश न पावणारें अणिमादि ऐश्वर्य त्यानें पितामहापासून मागून घेतलें. ‘ भूतेभ्यस्त्वद्‌विसृष्टेभ्यो मृत्युर्माभूत् मम ’ ही त्याची वरयाचना! अमृतत्वाची आंस खरी, पण ती या नाशवंत देहांत व सृष्टींत! त्याचें सर्व तत्त्वज्ञान आत्यंतिक प्रवृत्तीचें आहे. ‘ ईश्वरोऽहमहंभोगी सिद्धोऽहं बलवान् सुखी । ’ ‘ कोऽन्योऽस्ति सदृशं मया । ’ या गीतोक्त आसुरी संपदेचा तो साक्षात् पुतळा

झाला होता. ' दंभो दर्पोऽभिमानश्च क्रोधः पारुष्यमेव च । ' हीं आसुरी संपदेचीं लक्षणें त्याच्या प्रल्हादाशीं वागण्यांत क्षणोक्षणीं प्रकटत होतीं.

याउलट प्रल्हादाची विचारसरणी. हिरण्यकशिपूचे गुरुपुत्र शंडामर्क यांनीं त्याला पढविलेला ' प्रवृत्तिवाद ' प्रल्हादाला मानवत नव्हता. साऱ्या दंडनीतीचा, राजनीतीचा व व्यवहारमार्गाचा आधार म्हणजे ' हा मी आणि हा दुसरा ' हा भेदभाव. परंतु प्रल्हादाच्या मतें ' स्वः परश्च इति असद्ग्रहः ' हा मिथ्या अभिमान, अशी त्याची ' स्थिरमति ' झाली होती, आणि वृत्ति ' मैत्रः करुण एव च ' अशी बनली होती. मानुष जन्म दुर्लभ आहे व म्हणून कुमारवयापासूनच भागवत-धर्मांचें आचरण करावें ( ७. ६. १ ), असें त्याचें ठाम मत होतें. विशेष लक्षांत घेण्यासारखी आणि सामान्य लोकांना माहीत नसलेली गोष्ट म्हणजे प्रल्हादानें आपला ठाम सिद्धान्त, आपली निष्ठा स्वतःपाशींच ठेवली नाहीं. स्वतःला पटलेल्या विचाराचा तो प्रसार करूं लागला. खरे तत्त्ववेत्ते, सत्यशोधक हेंच करतात. भागवतकारांनीं प्रल्हादाला ' बंडखोर आत्मा ' म्हणून आपल्यापुढें उभा केला आहे. प्रल्हादानें सर्व दानवकुमार गोळा केले य आपलें तत्त्वज्ञान त्यांच्या गळीं उतरवलें. दैत्यलोक ' कामपरायण ' आहेत, ' विहारक्रीडामृग ' आहेत, म्हणून त्यांचा त्याग करून ' नारायणा 'ला शरण जा, कारण तोच ' सर्वभूतानां प्रिय आत्मेश्वरः सुहृत् ' आहे, असा त्यांना त्यानें उपदेश केला आहे. सर्व सहावा अध्याय प्रल्हादाकरवीं दैत्यकुमारांचें बुद्धि-हृदय-परिवर्तन करण्यांत भागवतकारांनीं खर्ची घातला आहे.

अशा तऱ्हेनें हिरण्यकशिपु व प्रल्हाद यांचा संघर्ष हा दोन विचारसरणींचा संघर्ष आहे. एका बाजूला सर्व पाशवी, दानवी, यौगिक सामर्थ्य उभें आहे. दुसऱ्या बाजूला संयम, सत्यनिष्ठा, विनीतभाव, तितिक्षा यांच्या रूपानें आध्यात्मिक सामर्थ्य खडें आहे. ज्याला वैरी मानला, ज्याच्या वधाची प्रतिज्ञा केली, त्याचेंच गुणगान स्वतःच्या घरीं होऊं लागलें, त्याच्या पंथाचा प्रचार स्वतःच्या घरापासून सुरू आला, हें हिरण्यकशिपूला कसें सहन व्हावें ? त्याच्या व्यवहारी दृष्टीनें प्रल्हाद ' पंचमस्तंभी 'च होता. त्याची विचारसरणी अशी होती :

> परोऽप्यपत्यं हितकृद्यथौषधं, स्वदेहजोऽप्यामयवत्सुतोऽहितः ।
> छिन्द्यात्तदङ्गं यदुतात्मनोऽहितं शेषं सुखं जीवति यद्विवर्जनात् ॥ ७.५.३७

—औषधाप्रमाणेंच जर परकीयहि उपकारक ठरत असेल, तर स्वपुत्राप्रमाणें लेखावा; आणि पोटचें पोरहि विरुद्ध जात असेल, तर रोगाप्रमाणें त्याला मानावें आणि शरीराचा व्याधिग्रस्त अवयव कापून टाकतात त्याप्रमाणें त्याचा वध करून मोकळें व्हावें, म्हणजे मग सुखानें जगतां येतें. ही आहे हिरण्यकशिपूची नीति! त्याच्या दृष्टीनें प्रल्हाद 'कुलांगार' होता. 'दुर्विनीत, मन्दात्मन्, कुलभेदकर' हीं विशेषणें भागवतकारांनीं हिरण्यकशिपूच्या मुखीं योजलीं आहेत. सारें त्रैलोक्य आपल्या क्रोधानें चळचळां कांपतें, पण हें चिरमुडें पोर आपल्यासमोर निर्भयपणें उभें राहावें, इतकेंच नव्हे, तर त्यानें आपणांस 'दुरुत्तर' करावें, शहाणपणाच्या गोष्टी सांगाव्या, हें हिरण्यकशिपूला कसें सहन व्हावें? त्याचा अहंकार दुखावला गेला. प्रल्हादाची विचारसरणी व वागणूक म्हणजे त्याच्या 'अस्मिते'ला प्रचण्ड आव्हान होतें! त्यानें प्रल्हादाचा कसा अनन्वित छळ केला, हें महशूर आहे. पण प्रल्हाद डगमगला नाहीं. 'सत्य न मरतें दळभारें,' हें तो जाणत होता, हें जितकें खरें, तितकेंच विवेकाचें वैराग्य त्याच्या ठिकाणीं बाणलें होतें हेंहि खरें. 'आत्मौपम्येन सर्वत्र सर्वभूतात्मनीश्वरे' भक्ति करा (७·७·५३), असा दैत्यकुमारांना त्यानें उपदेश केला होता व तो आचरून दाखविण्याची त्याला संधि मिळत होती.

प्रल्हादकथेच्या निमित्तानें म्हणा वा ओघांत म्हण, भागवतधर्माचें विवरण भागवतकारांनीं केलें आहे. त्याकडे वळण्यापूर्वी या कथेंतील दोन हृद्य प्रसंगांचा निर्देश आवर्जून केला पाहिजे. स्तंभांतून नारसिंहमूर्ति प्रगट झाली. हिरण्यकशिपूचा वध झाला. ब्रह्मदेव, इंद्र, सिद्ध, गंधर्व, यक्ष व चारण यांनीं नृसिंहाची अपरंपार स्तुति केली. पण महाविष्णूचें तें उग्र रूप शांत झालें नाहीं. हताश व चिंताग्रस्त देवांनीं श्रीलक्ष्मीला भगवंतांना शान्त करण्याविषयीं विनविलें; पण तो 'नारसिंहावतार' तिलाहि अपूर्व, अदृष्टपूर्व होता. तीहि भयानें दूर उभी राहिली. शेवटीं बाळ प्रल्हादालाच ब्रह्मदेवांनीं पुढें केलें. जें कार्य स्तुतीला करतां आलें नाहीं, जेथें पतिप्रीति मागें सरली, तेथें वात्सल्याचा विजय झाला. 'स्वपादमूले पतितं तमर्भकं विलोक्य' प्रभूचें अंतःकरण सद्गदित झालें! वर्डस्वर्थच्या 'She did not weep' या कवितेची येथें कुणालाहि आठवण होईल. भागवतकारांच्या सहृदय प्रतिभेची ही कोमल साक्ष आहे!

या आख्यानांतील दुसरा भव्योदात्त प्रसंग म्हणजे प्रल्हादाच्या वरयाचनेचा. पापी आपल्या कर्मानें मरत असतो. पण महात्म्यांच्या दयेचा व वीरोचित क्षमाशीलतेचा प्रत्यय याच ठिकाणीं येतो. ‘ देवा यांना क्षमा कर; ते अज्ञानी आहेत; आपण काय करतों तें त्यांना समजत नाहीं ! ’ या भगवान् ख्रिस्ताच्या वचनाची साक्ष युगांतून कधीं तरी पटते. पण या उदंड क्षमाशीलतेचे आदर्श आपल्या पुराणांत अनेक आहेत. आपल्या पित्याला क्षमा करावी, इतकेंच नव्हे तर त्याचा उद्धार करावा, अशी नम्रतापूर्वक प्रार्थना प्रल्हादानें केली आणि त्या अनंतहस्त कमलावरानें ‘ तुझा पिता एकवीस पूर्वजांसह पवित्र झाला, ’ असें त्याला आश्वासन दिलें. पण त्याचें श्रेय भगवान् स्वतःकडे घेत नाहींत. उलट ‘ यत्साधोऽस्य गृहे जातो भवान् वै कुलपावनः । ’ म्हणून त्याचीच भलावणी करतात ! प्रल्हादानें स्वतःसाठीं कांहींहि मागावयाचें साफ नाकारलें. त्याला भक्तीचा सौदा करावयाचा नव्हता. तो ‘ निष्काम ’ भक्त होता. ‘ मला या मोहांत पाडूं नका, माझी कसोटी पाहूं नका, ’ असें भगवंतांना विनम्रभावें विनवून तो म्हणतो :

**यस्त आशिष आशास्ते न स भृत्यः स वै वणिक् । ७. १०. ४**

—आपणांपासून जो वराची, विषयसुखाची अपेक्षा करतो, तो भक्त नसून व्यापारी होय !

या संदर्भांत भागवतकारांनीं आदर्श स्वामि-सेवक-भावाचें स्वरूप सांगून टाकलें आहे. ते म्हणतात :

**आशासानो न वै भृत्यः स्वामिन्याशिष आत्मनः ।**
**न स्वामी भृत्यतः स्वाम्यमिच्छन्यो राति चाशिषः । ७. १०. ५**

“ धन्याकडून आपले मनोरथ पूर्ण व्हावे, ही कामना बाळगणारा खरा सेवक नव्हे; आणि आपलें कार्य, मनोरथ पूर्ण करून घेण्यासाठीं सेवकांना जो धन देतो, तो खरा धनी नव्हे ! ”

सेवा उभयपक्षीं निरपेक्ष व प्रेममूलकच असावी, मानवी संबंध प्रेमाधिष्ठित व तत्त्वाधिष्ठित असावेत, हा उदात्त आशय यांत सुंदर रीतीनें सुचविला आहे. शेवटीं प्रल्हादानें भगवंताकडे मागितलेलें मागणें कुंतीच्या मागण्यासारखें अपूर्व आहे :

कामानां हृद्यसंरोहं भवतस्तु वृणे वरम् । ७. १०. ७

" माझ्या हृदयांतील वासनांचीं बीजें—वर मागण्याची वासनाच नष्ट होवो, हा वर मी मागतों ! " कांट्यानें कांटा काढण्याचा हा अद्‌भुत प्रकार !

आणखी एक गमतीचा, नर्मविनोदाचा छोटासा प्रसंग. भागवतकारांनीं ब्रह्मदेवाला ' कानपिचक्या ' देण्याची संधि दवडली नाहीं. श्रीविष्णूंनीं ' घेशाभ्यासजड ' ब्रह्मदेवाला शेवटीं सांगितलें :

मैवं वरोऽसुराणां ते प्रदेयः पद्मसंभव ।
वरः क्रूरनिसर्गाणामहीनाममृतं यथा ॥ ७. १०. ३०

कमलोद्‌भवा, अशा प्रकारें असुरांना वर देत जाऊं नको. क्रूर स्वभावाच्या माणसांना असें वरदान म्हणजे सापांना केवळ दुग्धपान नव्हे, तर अमृतपानच !

भागवतकारांनीं हिरण्यकशिपु व प्रल्हाद यांच्या संभाषणाच्या ओघांत ' नवविधा भक्ती 'चीं लक्षणें ( ७·५·२३ ) प्रल्हादाच्या तोंडून वाचकांना सांगितलीं आहेत—नव्हे, एवढेंच आपण शिकलों, असें तो वडिलांना सांगत आहे. तसेंच, ही भक्ति पांच प्रकारांनीं—रीतींनीं करतां येते वा घडते, असेंहि स्पष्ट केलें आहे. ते पांच मार्ग म्हणजे, परमेश्वराशीं वैर, परमेश्वराची अनन्यभावानें भक्ति, परमेश्वरासंबंधीं भय वाटून त्याचें केलेलें पूजन, त्याच्याशीं स्नेहसंबंध जोडून वा प्रियकर-भावानें त्याच्यावर प्रेम करून. हिरण्यकशिपु, रावण हे ईश्वराचे विरोधी भक्त; तर नारदादि अव्यभिचारी निष्ठेचे भक्त; कंस भीतिग्रस्त भक्त, तर अर्जुनादि स्नेहबंधनानें बद्ध भक्त आणि गोपी या उदात्त कामभावानें सर्वस्व समर्पण करणाऱ्या सखीभक्तीच्या मूर्ति ( ७. १ २५, २९ ) परमेश्वराच्या पूजेसाठीं द्विजत्वादि जाति, दान, तप, यागादि आचार व सद्वर्तन, विद्वत्त्व हे मानसिक गुण पुरे पडत नाहींत केवळ निष्काम भक्तीच्या योगेंच हरि संतुष्ट होतो—बाकी सारें अवडंबर वा सोंग ! ' प्रीयतेऽमलया भक्त्या हरिरन्यद् विडम्बनम् । ' ( ७. ७. ५२ ) असेंहि प्रल्हाद सांगतो. ती भक्ति आत्मानात्मविवेकावर आधारलेली आहे. वैराग्यांत तिचीं मुळें आणि विश्वकुटुंबक वृत्तींत तिचीं फळें आहेत, हें भक्तराज प्रल्हादाच्या आचरणावरून व उद्गारांतून स्पष्ट केलें आहे. प्रल्हाद कुमारवयांत असला, तरी गीतेच्या भाषेंत ' ज्ञानी भक्त ' आहे.

या आख्यानांत भागवतकारांची काव्यप्रतिभा ठिकठिकाणीं आपला विलास दाखविते. चौथ्या अध्यायांतील महेन्द्रभवनाचें वर्णन ( श्लोक ८–११ ), क्रुद्ध हिरण्यकशिपूचें आठव्या अध्यायांतील रौद्रस्वरूप, नृसिंहाचें अद्‌भुतस्वरूपवर्णन, त्या उभयतांच्या प्रलयंकर युद्धाचें वर्णन, हीं स्थळें काव्यदृष्ट्या उल्लेखनीय आहेत. देव, ऋषि, पितर, यक्ष, गंधर्व यांनीं नृसिंहाची जी स्तुति केली आहे, तींत त्या प्रत्येकाचे स्वभावधर्म व आकांक्षा भागवतकारांनीं कौशल्यानें गुंफल्या आहेत, तर प्रल्हादाची प्रार्थना शांत, गंभीर व उदात्त आहे. अनेक ठिकाणच्या उपमा मोठ्या हृद्य आहेत. वाऱ्यानें दीपज्योत दोलायमान व्हावी, तशी माझी संशयाकुल बुद्धि भ्रमत आहे, असें युधिष्ठिर म्हणतो; तर ' हा प्रल्हाद म्हणजे दैत्यरूपी चंदनवनांत बाभळीचें रोप आहे, ' असें हिरण्यकशिपूला वाटतें.

शेवटीं, आरंभीं उल्लेखिलेल्या परीक्षिताच्या शंकेचें निरसन कसें केलें आहे, तें पाहून हा रसास्वाद पुरा करूं.

भागवतकारांनीं श्रीशुक-मुखांतून त्या शंकेला दिलेलें उत्तर प्रामुख्यानें अध्यात्माच्या वा वेदान्ताच्या दृष्टिकोनांतून आहे. पण त्याला ऐहिक-लौकिकहि बाजू आहे, असें आम्हांला वाटतें. आध्यात्मिक उत्तर भगवद्गीतेंत श्रीकृष्णानें म्हटलें आहे, त्याशीं सुसंगत आहे, ' न मे कर्माणि लिम्पन्ति न मे कर्मफले स्पृहा । ' ( भ. गी ४ १४ ) असें श्रीकृष्णांनीं सांगितलें असून ' गुणा गुणेषु वर्तन्त इति मत्वा न सज्जते । ' ( भ. गी. ३.२८ ) या न्यायानें कर्म करूनहि आपण अकर्ता आहोंत, हें स्पष्ट केलें आहे. श्रीशुकमुनींचें उत्तर याच प्रकारचें आहे. दुष्टांना दंडन करण्याचें कार्य ईश्वर करतो, परब्रह्म नव्हे. जन्मादिगुणरहित असें निष्कलंक ब्रह्म मायेच्या आश्रयानें ईश्वररूप पावतें आणि मग सृष्टीच्या निर्मितीची प्रक्रिया सुरू झाल्यानें न्याय-प्रस्थापना, धर्म-संस्थापन, दुष्ट-निर्दालन हीं कामें त्या सगुण, उपाधिधारी ईश्वरास करणें प्राप्तच होतें. ' स्वमायागुणमाविश्य बाध्य-बाधकतां गतः । ' ( भा.७.१.६ ). देहादिकाविषयीं अभिमानबुद्धीच ईश्वराच्या ठायीं नसल्यानें दुष्टांच्या वधाचें त्याला पातक लागत नाहीं. शिवाय, हा दुष्टांचा वध त्यांच्या हितास्तवच असतो ( भा.७.१.२४ ). गीतेंतहि भगवंतांनीं अर्जुनाला निरहंकार, निर्भय, मन्मना, मद्याजी व सर्वभूतहितेरत बनून कर्म कर, म्हणजे हिंसेचें पातक तुला लागणार नाहीं, असें आश्वासन दिलें आहे.

या आध्यात्मिक विचारसरणींतून दोन निष्कर्ष स्पष्ट निघतात : हिंसाहिंसेचा विवेक करण्याचा निकष त्यांतून मिळतो, हा एक निष्कर्ष आणि निर्वैर, निर्लेप परमेश्वरानें एकदां सृष्टि, निर्मिति, रचना अशीं कार्यें अंगावर घेतलीं कीं, शासन-व्यवस्थापनासाठीं हिंसात्मक वाटणारीं कार्यें त्याला चुकत नाहींत, हा दुसरा निष्कर्ष. हा बोध भारताच्या आजच्या विचार-संकुल परिस्थितींत महत्त्वाचा नाहीं काय ?

* * *

# ५ : श्रीलक्ष्मीचें स्वयंवर

प्राचीन भारतीय संस्कृतींत सामाजिक जीवनाचा आनंद व रमणीयता वाढविणाऱ्या आचारप्रणालींच्या द्योतक ज्या संज्ञा आज आढळतात, त्यांत ' स्वयंवर ' ही संज्ञा व तिच्यांतील आशय हीं दोन्ही हृद्य आहेत. समाजजीवन आणि व्यक्तिजीवन हीं कोणत्या स्तरावर होतीं, याची ही संज्ञा निदर्शक तर आहेच, पण सुसंस्कृत जीवनांतील काव्यात्मतेचा प्रत्ययहि त्या कल्पनेंतून प्रगट होत आहे. स्वयंवराचा सोहळा विदग्ध मनाला—त्या सोहळयांतील विविध भावच्छटांमुळें—मोहवितो. म्हणूनच अनेक कवि-महाकवींनीं आपल्या प्रतिभेचें भांडार स्वयंवराची शोभा वाढविण्यासाठीं खुलें केलें आहे. या सोहळयाच्या वर्णनाच्या मोहांतून वीतरागी शुकमुनिहि सुटले नाहींत. जगन्माता, त्रिभुवन-सुंदरी, आह्लादमयी लक्ष्मी सागरमंथनांतून निर्माण झाल्यावर तिनें जें स्वयंवर केलें, त्याचें वर्णन अत्यंत संयमानें, अत्यंत सूचकतेनें, पण भव्योदात्ततेनें श्रीमद्‌भागवताच्या आठव्या स्कंधांत त्यांनीं केलें आहे.

स्वयंवराची कल्पना समाजाच्या उच्च संस्कृतीचें व अभिरुचीचें लक्षण मानली पाहिजे. स्वयंवर ही एक विवाहपद्धति, एवढेंच तिचें महत्त्व नाहीं. समाज-जीवनाला स्थिरता आणणाऱ्या गृहस्थाश्रमाचा पाया म्हणजे विवाहसंस्था. पण ही संस्था क्रमशः विकसित झाली आहे, हें विवाहाचे जे आठ प्रकार धर्मशास्त्रकारांनीं सांगितले आहेत, त्यावरून स्पष्ट दिसतें ( मनु. ३·२१ ). रानटी व भटक्या समाजांत विवाह ' आसुरी ' व ' पैशाच ' असाच असणार, बला-त्कारानें अपहरण हाच जंगलचा कायदा प्रचारांत असणार; ' विवाह ' व ' परिणय ' या शब्दांतून वधूंना ' घेऊन जाण्याची ' कल्पना वाच्यार्थानें प्रगट होत असली, तरी त्यांत परस्पर-संमतीचा, हेतुपूर्वक आदान-प्रदानाचा भाग उत्तरोत्तर येत गेला आणि त्या मानानें समाजाची सभ्यता व संस्कारिता वरच्या पातळीवर चढत गेली, हें तर उघडच आहे. म्हणून ' परिणय ' कल्पनेपासून

'पाणिग्रहण' कल्पनेपर्यंतचा वा 'स्वयंवरा'पर्यंतचा प्रवास भारतीय मनाच्या व समाजाच्या विकासाचा बोधक आहे, असें म्हणावयास हरकत नाहीं. कारण 'स्वयंवर' म्हणजे एक प्रकारें 'निर्णयाचें स्वातंत्र्य'. जीवनाचा सहप्रवासी निवडण्याचा वयांत आलेल्या युवतींचा अधिकार समाजानें मान्य केला, असा त्याचा अर्थ आहे. 'न स्त्री स्वातंत्र्यमर्हति' या वचनाकडे अंगुलिनिर्देश करून ज्या भारतीय संस्कृतीला प्रतिगामी समजण्यांत येते, त्याच संस्कृतींत 'स्वयंवरा'ची एक रम्य कल्पना व प्रथा आढळते आणि त्या संस्कृतींतील कवि-महाकवि त्या प्रसंगाचीं रसिकमनोहारि वर्णनें करतात, हें लक्षांत घेण्याजोगें आहे.

स्वयंवरकल्पनेचा विचार करूं लागतांच पौर्वात्य व पाश्चिमात्य संस्कृतींतील व जीवनपद्धतींतील भेद चटकन् लक्षांत आल्यावांचून राहत नाहीं. मध्ययुगांत युरोपमध्यें 'स्त्री-दाक्षिण्याचें युग' (एज् ऑफ शिव्हल्री) सुरू झालें. त्या कालांत सरदार-वीर कमनीय व काम्य युवतीच्या भ्रूविलासाच्या तालावर नाचत असत. तिच्या आकांक्षांसाठीं प्राणांची कुर्बानी करायला सिद्ध असत किंवा आपल्या पराक्रमाचें प्रदर्शन घडवून आपल्या चित्तचंद्रिकेला रिझवीत असत. वीरतेचा वशीकरणमंत्र ते आचरीत. त्या प्रथेचा वारसा आधुनिक युगाला मिळाला तो 'प्रियाराधना' च्या (कोर्टिंगच्या) रूपानें. पाश्चात्यांच्या समाजरचनेंत या प्रणयाराधनाला वा प्रियानुनयाला विशिष्ट स्थान आहे. प्रियाप्रसाद ही तिकडे संसाराची नांदी समजली जाते. वर वर पाहतां त्यांत सुसंस्कृततेचा व स्त्रीस्वातंत्र्याचा भाग पुष्कळ दिसतो. (अमेरिकेंत गेल्यावर प्रथमदर्शनीं श्रीविवेकानंदांचीहि तशीच समजूत झाली. हे लोक 'शक्तीचे पूजक आहेत,' असा त्यांनीं गौरवोद्गारहि काढला.) पण त्यांत यौवनसुलभ विकारवशतेचाच भाग अधिक असल्याचें प्रत्ययास येतें. प्रियाराधनेंत पुरुषानें स्त्रीला वश करण्याची कल्पना आहे. त्यामुळें मानवेतर योनींत नर जसा रूपानें, शक्तीनें, सुस्वर आलापानें त्यांच्यांतील 'स्त्री-जनां'ना मोहिनी घालतो, तसा प्रकार मानवयोनींतहि तिकडे सुरू आहे. आणि आजच्या शास्त्रीय युगांत प्रसाधनांची विविधता व विपुलता बाह्य सौंदर्य नटवून व वाढवून संमोहनाचें सामर्थ्य वाढवावयास त्यांना साहाय्यच करीत आहे.

पुरुषानें स्त्रीची मनधरणी करावयाची (वैवाहिक जीवनांतील कृतककोपाचे भावमधुर प्रसंग अर्थात् वगळून), हा प्रकार भारतीय मनाला कसासाच वाटणारा

आहे. ‘ गृहलक्ष्मी ही घरीं आपण होऊन चालत यावी ’ हीच सर्वसाधारण अपेक्षा. मग ती स्वेच्छेनें येवो कीं वडीलधाऱ्यांच्या सल्ल्यानें येवो. ‘ वृणुते...गुणलुब्धाः स्वयमेव संपदः । ’ हें संपत्तीच्या बाबतींतील सूत्र संसाराच्या ‘ श्री ’बाबतहि ते लागू करतात. ‘ मागणें ’ घालायची चाल भारतांत नव्हतीच वा नाहीं असें नाहीं ( धृतराष्ट्रासाठीं भीष्मांनीं जाऊन गांधारीला मागणीच घातली होती ). पण तींत दोन कुटुंबांतील स्नेहबंधनें दृढ करण्याचीच इच्छा प्रबल असे. समाजांतील संश्लिष्टता ( चिकटपणा- ‘ कोहेजन ’ ) त्यामुळें वाढण्यासच मदत होई. एकंदरींत, वेलीनेंच वृक्षाचा आधार शोधावा, कवितेनें रसिकांना धुंडीत जावें, सुकुमारतेनें पौरुषाचा आसरा घ्यावा व प्रकृतीनें पुरुषांत विलीन व्हावें, अशी भारतीय मनाची धारणा आहे.

भारतीय आर्यांत प्रायः प्रौढविवाह असल्यानें स्वयंवराला स्थान मिळालें, यांत नवल नाहीं. म्हणूनच भारतीय पुराणांत व काव्यांत स्वयंवराचीं वैभवशाली व हृदयंगम वर्णनें आढळतात. रामायण आणि महाभारत या दोन्ही राष्ट्रीय महाकाव्यांतील नायिकांचीं–सीता-द्रौपदीचीं–स्वयंवरें, हा त्या महाकाव्यांचा एक अविच्छिन्न भाग आहे. त्या महाकाव्यांत जे केंद्रभूत समरप्रसंग आहेत– रामरावण-युद्ध व कौरवपांडव-युद्ध–त्यांचा पाया जणुं या स्वयंवरमंडपांतच घातला गेला आहे. कुशिकपुत्र विश्वामित्रानें काकपक्षधर रामचंद्राला मिथिलेस नेलेंच नसतें, तर रामायण होतें ना ! यज्ञसंभवा द्रौपदीनें कुलशीलाचा प्रश्न उपस्थित न करतां सूतपुत्र राधेयाच्या कंठांत वरमाला घातली असती, तर यमुनेचें काळें पाणी रक्ताच्या पाटांनीं रंगतें ना ! सती सावित्रीचेंहि एक प्रकारें स्वयंवरच होतें, पण त्यांत तपोधनांना साजेसा साधेपणा होता; जीवनोपभोगापेक्षां मृत्यूवर विजय मिळविण्याची मंगल कामनाच अधिक होती. पुढील काळांत कविकुलगुरूनें इंदुमतीचें व श्रीहर्षानें दमयंतीचें स्वयंवर रसिक हृदयाला आल्हादक होईल अशा पद्धतीनें वर्णिलें आहे. भारताच्या सुवर्णयुगांतील या रचना व त्यांच्या नायिका त्या कवींच्या प्रतिभालंकारांनीं खूप वाकून गेल्या आहेत. विदग्ध मनाची चतुरता व रसिकता यांचा सुंदर मिलाफहि त्यांत आढळतो.

स्वयंवराच्या कल्पनेंत एक सुसंस्कृतपणा आहे व रुचिर काव्यात्मता आहे. त्यामागील भारतीय संस्कृतीची मनोवृत्तीहि विलोभनीय आहे. स्वयंवर म्हणजे

एक प्रकारचा स्वयंनिर्णय. आपल्या जीवनांतील महान् परिवर्तनाचा निर्णय स्वतःच्या हिमतीवर व जबाबदारीवर घेणें हीं लहानसहान गोष्ट नव्हे. त्यासाठीं केवढा डोळसपणा हवा, बुद्धीची प्रगल्भता हवी, व्यवहारांतील चतुराई हवी. सप्तपदींचीं सात पावलें टाकण्यापूर्वी आपला भावी पति –

कुलं च शीलं च सनाथता च विद्या च वित्तं च वपुर्वयश्च ।

या सात गुणांनीं मंडित आहे काय, याचा विचार केला जाई. रुक्मिणीची प्रणय-पत्रिका घेऊन आलेला ब्राह्मणहि द्वारकाधीशावर रुक्मिणी कां आकृष्ट झाली, हें सांगतांना म्हणतो –

का त्वा मुकुंद महती कुलशीलरूपविद्यावयोद्रविणधामभिरात्मतुल्यम् ।
धीरा पतिं कुलवती न वृणीत कन्या काले नृसिंह नरलोकमनोभिरामम् ॥

१०. ५२. ३८

कुलवंतांच्या विचारशील कन्यका केवळ रूपावर भाळत नसत. ‘ कन्या वरयते रूपम् ’ हें सुभाषित तितकेंसें खरें नाहीं.

स्वतःच्या जबाबदारीर निर्णय घेणें व त्याला चिकटून राहणें याला नीति-शास्त्राच्या दृष्टीनें मोठीच किंमत दिली जाते. पण त्यासाठीं मन-बुद्धि-भावनांना एक परिपक्वता यावी लागते. ही परिपक्वतेची पायरी भारतीय कुमारी गांठीत, गांठण्याला त्यांना अवसर असे व ‘ स्वयंवर प्रथा ’ हा त्याचा पुरावा होय. समाज प्रत्येक व्यक्तीची अस्मिता आदरावयास सिद्ध होतो, तेव्हांच ही संधि मिळते. स्त्री ही केवळ उपभोगसाधन व धनिकतेचें लक्षण मानणारा समाज ( आणि व्यक्तिहि ) संस्कृतीच्या खालच्या पायरीवर असतो, हें सांगावयास नकोच.जेथें स्त्रीमनाच्या स्वतंत्र अस्तित्वाचीच कल्पना नाहीं, तेथें ‘मनोमीलना’च्या माधुरीची कल्पना तरी कशी असणार ? अशा ठिकाणीं स्त्री ही पुरुषाच्या जीवनाची अंगभूत कला, त्याची ‘ चित्कला ’ न बनतां, अन्य हिरेजडित अलंकारांप्रमाणें एक बाह्य अलंकारच बनणार ! पण भारतीय संस्कृतीनें सहधर्मचारिणी व अर्धांगी हे शब्द वधूसाठीं वापरून त्यांचा जीवनांतील आदर्श व स्थान हीं उंचाविलीं आहेत.

स्वयंवरकल्पनेंत भारतीय संस्कृतीची एक जीवनदृष्टीहि व्यक्त होते. संसारांत स्त्रीपुरुषांची जर समान भागीदारी असली, तर तिचा खरा अर्थ काय ?

स्त्री-पुरुषांच्या जीवनप्रवृत्ति खरेच समान आहेत काय? एकाच कार्यासाठीं निसर्गानें त्यांना निर्माण केलें आहे काय? अस्थिरता, आकांक्षांची अगणितता, सदैव गतिमानता, नावीन्याची ओढ, नवस्वप्नांची निर्मिति ही पुरुष-प्रवृत्ति; तर स्थिरता, समाधान, संगोपन व वास्तवता या गुणांची स्त्री ही साकार मूर्ति. जीवनांतील या विरोधी वाटणाऱ्या प्रवृत्ति परस्परपोषक आहेत. स्त्री व पुरुष दोघेंहि महत्त्वाकांक्षी व म्हणून विचरणशील झालीं, तर घराला प्रवासी-निवासस्थानाचें स्वरूप येतें. स्त्री व पुरुष दोघेंहि घरकोंबडीं बनलीं, तर जीवनप्रवाह स्थगित होतो. शेवाळानें आच्छादलेल्या डबक्यासारखी त्याची अवस्था होते. म्हणून एकानें हिंडावें, धडपडावें, मिळवावें, निर्माण करावें आणि दुसऱ्यानें जतन करावें, संगोपावें, ही श्रमविभागाची दिशा आहे. नव्या निर्मितीलाहि कांहीं संचय आधाराला हवा असतो. गगन आक्रमणाऱ्या पंखांनाहि विसाव्यासाठीं मऊ पिसांची ऊब देणाऱ्या घरट्याची गरज असते. पुरुष आपल्या कल्पकतेनें व पराक्रमानें कांहीं वेगळी निर्मिति करतात, तिच्यांत सूर्यकिरणांची उज्ज्वलता अधिक असते. स्त्रीची सर्जनशीलता कमी नाहीं. पण तिच्यांत शारदीय चंद्रकिरणांची कोवळीक असते. या दोहोंचा संगम होतो, तेव्हांच संसारांत मृदु मुलायम सोनेरी किरणांची प्रभा पसरते. ही सोनेरी प्रभा निर्मळ होण्यासाठीं स्त्रीनें पुढें यावें, ही स्वयंवराची कल्पना असावी. त्यांत आत्मसमर्पणाची वृत्ति आहे. पण त्या आत्मसमर्पणांतून स्वामित्वपद चालत येतें. पुरुष गृह निर्माण करतो, चालवतो; पण ‘ गृहिणी ’ म्हणून उल्लेख होतो स्त्रीचा. गृहिणी-घरधनिणीवरून घर ओळखलें जातें. संसारांत दिलेल्या आत्माहुतीमुळेंच त्यांना हा अमृतत्वाचा कुंभ लाभतो. कविकुलगुरूनें लाडक्या शकुंतलेला पतिगृहीं पाळावयाच्या आचारधर्माचा जो उपदेश केला आहे, त्यांत विनम्र आत्मसमर्पणाचाच उपदेश आहे. पण त्याची फलश्रुति सांगितली आहे ती ‘ यान्त्येवं गृहिणीपदं युवतयः ’ ही. स्वयंवर करणाऱ्या राजकुमारीच राज्याच्या सिंहासनावर पट्टराणी म्हणून व सम्राटाच्या हृदयसिंहासनावर सम्राज्ञी म्हणून अधिकार मिळवीत आल्या आहेत. पुरुषाचें हृदयसिंहासन आपल्या अस्तित्वानें भूषवून, उजळून व सुगंधित करून पुरुषाचें चारित्र्य, कर्तृत्व व कीर्ति वाढविणें हें स्वयंवराचें थोर रहस्य असावें, म्हणूनच शुकादिकांना तें वर्णन करण्याचा मोह टाळतां आला नसावा. शुकाचार्यांनीं परीक्षिताला सांगितलेली लक्ष्मीस्वयंवराची कथा आपण श्रवण करूं या.

क्षीरसागराच्या तीरावर चाललेलें सागरमंथनाचें कार्य त्या क्षणीं अचानक थांबलें. वासुकीची देहरज्जु देवदानवांच्या हातीं तशीच होती. इतकेंच नव्हे, तर तो घुसळ-दोर ओढतांना आपल्या शरीराला ताण देऊन मागें वाकले होते, ते तसेच होते. पुढें कलून आपल्या देहाचा तोल सांभाळीत होते, तेहि तसेच राहिले. सुरासुरांच्या कंठांतून निघणाऱ्या आवेशयुक्त आरोळ्या क्षणांत निमाल्या. सारे चित्र-वत् तटस्थ झाले. कारण तसेंच महान् विंदान घडलें होतें. आकाशांत वीज लवावी तसें तेज सागराच्या फेनधवल लहरींवर क्षणार्धांत चमकलें. दुग्धवर्ण सागराच्या कल्लोळांवर सहस्रावधि इंद्रधनुष्यें क्षणांत फुललीं. मंथनोद्युक्त देवदानवांचा आपल्या नजरेवर विश्वास बसेना. फेनराशींतून उदित होणाऱ्या लावण्यराशीवर त्यांची नजर ठरेना.

कांहीं कालापूर्वींच क्षीरसागरांतून नवनीतरूप पारिजात वर आला होता. त्याच्या मंद सुगंधानें आसमंत अजून दरवळलेला होता. त्याचीं सहस्रावधि पुष्पें गगनमंडळांत स्थिरावून तारकांशीं हितगूज करीत होतीं. भूतलावर पडलेलीं फुलें रमणींच्या नखाग्रांत केव्हांच जाऊन दडलीं होतीं. पारिजात आला होता तो अप्सरांच्या आगमनाचें आल्हादक वृत्त सांगण्यासाठींच. कारण त्याच्यामागोमाग पारिजाताचा नाजुकपणा नि कान्ति धारण करणाऱ्या, आपल्या निःश्वसितांनीं वातावरण धुंद करणाऱ्या, मादक कटाक्षांनीं ऋषिमुनींनाहि उन्मत्त बनविणाऱ्या, गतिविभ्रमांनीं हंसांना लाजविणाऱ्या, मोहक स्मितांनीं देहभान विसरावयास लावणाऱ्या, क्रीडैकजीवितमया अशा उर्वशी, तिलोत्तमा, इत्यादि अप्सरा त्या जलनिधींतून वर आल्या होत्या. पारिजात नि अप्सरा यांच्या दर्शनानें नि स्पर्शनानें सुरासुरांचा श्रमपरिहार झाला होता. नव्या जोमानें ते पुनः अमृतप्राप्तीसाठीं सागरमंथन करूं लागले होते. पुनः एकवार अद्भुत नि देदीप्यमान ललनारत्न क्षीरसागराकडून भेट मिळेल, अशी त्यांची अपेक्षा नव्हती. पण अनपेक्षित घडलें होतें. मेघांनीं व्याप्त अशा नभोमंडळांत सौदामिनी अकस्मात् झळकावी आणि तिच्या लखलखाटानें दशदिशा सहस्र सुवर्णधारांच्या लोटानें धुऊन निघाल्याप्रमाणें दीप्तिमान् व्हाव्यात, तसा मेरु-मंदारांचा आसमंत उजळून निघाला आणि देव-दानवांचे कार्यमग्न हात नि चिंतामग्न चित्त एकदम विसावलें.

विस्मयाचा पहिला भर ओसरला नि विचक्षणा सुरू झाली! काय ही अंगकान्ति! गुलाबपुष्पांच्या मृदु पाकळ्यांनीं हिची देहलता निर्मिली आहे काय? हिच्या

रूपाशीं सदृश आजवर त्रैलोक्यांत तर कधीं पाहण्यांत नाहीं, मग हिला उपमा तरी द्यावयाची कुणाची? या सुकुमारतेला जोड नाहीं, सौंदर्याला सीमा नाहीं! आणि ...आणि हें दिव्य सौंदर्य, हें योषितरत्न कुणाचें भाग्य उजळविणार बरें! रसिकाची भूमिका संपली नि स्वामित्वभावना उदय पावली. केवळ देवांच्याच नव्हे, दानवांच्याच नव्हे, तर मानवांच्या मनांतहि त्या सौंदर्यदेवतेबद्दल अभिलाषा उत्पन्न झाली. त्या लालसेनें मन काळवंडून जाण्यापूर्वीच हृदयांतील संस्कारिता जागी झाली. शिष्टाचार पुढें धावला. नवागताचें यथोचित स्वागत झालें पाहिजे. अतिथीचें पूजन झालें पाहिजे. स्वस्त्ययन-समर्पण करावयालाच हवें. महेन्द्रानें पुढें होऊन मूल्यवान् आसन सादर केलें. 'इदं आसनं अलंक्रियतां भवत्या' असें इंद्रानेंच स्वतः म्हटल्यावर मग काय विचारतां! इतरांमध्यें अहमहमिका सुरू झाली. सप्तसरितांनीं सुवर्णघट आपल्या कटिखांद्यांवर वाहून आणले. वसुंधरेनें विविध वनौषधींचीं तेल-उटणीं समर्पण केलीं. पंचामृताचे घट घेऊन गो-कुलें उभीं राहिलीं. आपली सुमनसंपदा वाहून आणतांना ऋतुराज वसंत थकला, म्हणून त्यानें मधुमाधवांना सहाय्यास घेतलें आणि ऋषिजनांनीं समंत्रक अभिषेकविधि सुरू केला.

त्या अभिषेक-सोहळ्याचें वर्णन किती करावें? गंधर्व गात होते. नर्तिका नृत्य करीत होत्या. मेघांनीं त्यांना साथ दिली होती. वीणा, वेणु, आदि वाद्यांच्या मधुर स्वरांनीं सारा परिसर उत्फुल्ल झाला होता. ऋषिजन ज्या वेळीं श्रीसूक्त गात होते, त्या वेळींच जलाभिषेकाची संतत धार श्रीमूर्तीवर धरण्याचें कार्य चार गजांनीं आपल्याकडे घेतलें होतें.

अभिषेक संपला. सरित्पति सागरानें सुवर्णपीत रेशमी वस्त्राची जोडी पुढें ठेवली. वरुणानें वैजयन्तीमाला पुढें केली. विश्वकर्म्यानें विविध रत्नहार नजर केले. वाग्देवता सरस्वतीनें सच्छास्त्रांचे सुमनहार तिच्या कंठांत घातले. नागानें आपल्या फण्यांतील बहुमोल मणि तिच्या कर्णभूषणांसाठीं दिले आणि प्रजापतीनें कमलपुष्प तिच्या हातीं दिलें.

त्या दिव्य रमणीनें त्या उपहारांचा आदरपूर्वक स्वीकार केला. तिनें हातांत कमलमाला घेतली आणि सलज्ज स्मितानें आपल्या सौंदर्याची कला पावलोपावलीं

वाढवीत ती चारुगात्री चन्द्रमुखी सुर-असुर-मानव यांच्या समूहांतून चालूं लागली. तिची दृष्टि काय बरें शोधीत होती? शुकमुनींचें उत्तर आहे :

**विलोकयन्ती निरवद्यमात्मनः पदं ध्रुवं चाव्यभिचारि सद्गुणम् ।**

ती आपलें स्थान शोधीत होती— जें एकदां लाभलें कीं तें तिचें शाश्वत होणारें होतें. तें स्थान निर्दोष हवें होतें. विकारांनीं तें मलिन, अमंगल असलेलें तिला खपणारें नव्हतें. आणि सद्गुणांचें सांनिध्य तिला अखंड लाभणार होतें. कारण त्या स्थानीं सद्गुण हे अंतर्यामाच्या सौंदर्याची कान्ति म्हणून विलसत होते. ती सद्गुणांची उसनी ऐट नव्हती. तो दंभ नव्हता. सुजनतेचें कंचुक तेथें परिधान केलेलें नव्हतें. असें एखादें स्थान कुठें मिळतें कां, असा गुणमंडित पुरुष-वल्लभ भेटतो का, म्हणून देहाचे नयन करून ती न्याहाळीत होती. तिच्या पावलांतील नूपुरांचा रुमझुम स्वर उमटत होता. हातीं घेतलेल्या कमलमालेवर रुंजी घालणाऱ्या भ्रमरांचा गुंजारव त्यांत मिसळत होता. पण त्याकडे तिचें लक्ष नव्हतें.

ती एकाकी पुढें सरकत होती. तिला मार्गदर्शन करायला कालिदासाच्या इन्दुमतीच्या सखीप्रमाणें कुणी मातृसखी तिच्यासमवेत नव्हती. येथें खरी परीक्षा एकाकी हृदयानेंच करावयाची होती. हृदयाची साक्ष नि प्रतीति हीच अखेर आपली सहचरी असते.

ती पुढें सरकत होती. पाहणारांच्या डोळ्यांचें पारणें फिटत होतें, पण हृदयें उपाशी राहत होतीं. आपल्या सुधाधवल स्मितांतून केवळ सलज्ज सौजन्याची बरसात करीत ती सौंदर्यशालिनी पुढें जात होती. इन्दुमतीच्या स्वयंवरांत ज्याप्रमाणें—

**संचारिणी दीपशिखेव रात्रौ यं यं व्यतीयाय पतिंवरा सा ।**
**नरेन्द्र-मार्गाट्ट इव प्रपेदे विवर्णभावं स स भूमिपालः ॥ रघु. ६.६७**

अशी स्थिति झाली—ती ज्योतिष्मती पुढें निघून जातांच, दीपज्योति निघून गेल्यावर राजमार्गांतील उच्च सौध जसा पांढुरका होतो, तसे ते नरेंद्र पांढरेफटक पडले—तशीच येथें झाली असेल काय? बहुधा तसें झालें नसावें. तेथें जमलेली मंडळी ज्ञानी होती, तपोनिष्ठ होती, जितेंद्रिय होती. सागर-मंथनाचें जगड्व्याळ कार्य शिरावर घेतलेली ती मंडळी काय सामान्य असणार? आणि ज्ञानी माणसाला आपल्या सामर्थ्याची मर्यादा कळते. आपल्यासाठीं हें सौंदर्यधन नव्हे, अशी—

त्याच्याबद्दल कामना उत्पन्न होऊनहि—त्यांच्या चित्ताची आत्मसंशोधनानें खात्री झालेली असणार ! आणि म्हणून ती रमणी पुढें सरकतांच विषयाऐवजीं सुटकेच्या प्रसादानें त्यांचीं मनें भरून गेलीं असतील आणि त्या रमणीचें वरणचातुर्य बघायला सोत्कंठ प्रेक्षकांची भूमिका त्यांनीं घेतली असेल.

खरें म्हटलें तर त्या सुरासुरमानव-समुदायांत कोण नव्हते ? अति मेधावी होते, अति तपस्वी होते, अतित्यागी होते नि दानी होते, क्षमाशील वीरहि होते नि शरणागत-जीवन करुणासिंधुहि होते. कर्मनिष्ठ होते नि धर्मनिष्ठ होते. आपापल्या परीनें सारेच मोठे होते. तरी पण ' नासौ न काम्यो न च वेद सम्यक् द्रष्टुं न सा, भिन्नरुचिर्हि लोकः । ' अशी येथें परिस्थिति नव्हती. तें स्वयंवर लौकिक राजकुमारीचें नव्हतें. एका अलौकिक दिव्य रमणीचें तें स्वयंवर होतें. येथें ' भिन्नरुचित्वा 'चा सवाल नव्हता. हृदयींचा आत्माराम भेटण्याचा हा प्रश्न होता. सर्व सद्गुणांचें मंगलमय निधान असलेला, सर्व मांगल्याचें माहेर असणारा, सर्वदा निरुपम स्वातंत्र्यसुखांत विहरणारा, निरपेक्ष नि तटस्थ वृत्तीनें पण क्रीडाशीलतेनें या सर्व विश्वनाट्यांतील रस लुटणारा असा पुरुषोत्तम तिला हवा होता. शुकमुनि सांगतात, " तेथें महान् तपस्वी होते, त्यांनीं क्रोध जिंकला नव्हता; कुणी महान् ज्ञानी होते, पण त्यांना वासनाजय साधला नव्हता. कोणी धर्मनिष्ठ होते, पण त्यांच्यांत भूतदया नव्हती. कोणी दानाची परमसीमा गांठली होती, पण तेवढें भांडवल मुक्तीला पुरेसें नव्हतें. कुणी सदैव समाधिसुखांत निमग्न होते, त्यांना संसारांत गोडी नव्हती. कुणी दीर्घायुषी होते, तर त्यांच्या शीलाबद्दल संशय होता. कोठें कांहीं कमतरता होती, न्यून होतें. " ( श्रीमद्भागवत ८.८.२०-२२ ) शुकांचा मोठेपणा असा कीं, त्यांनीं कुणाहि ऋषिमुनींचा, देवदानवश्रेष्ठांचा नामोल्लेख केलेला नाहीं.

पण अखेर तिला हवा होता तो पुरुषोत्तम गवसला :

> एवं विमृश्याव्यभिचारि सद्गुणैर्वरं निजैकाश्रयतयागुणाश्रयम् ।
> वव्रे वरं सर्वगुणैरपेक्षितं रमा मुकुन्दं निरपेक्षमीप्सितम् ॥ ८.८.२३

शान्त, दांत असा कांत तिला अखेर आढळला. कामक्रोधादि विकारांवर त्यानें जय मिळविला होता. धर्माचें जणूं तो उत्पत्तिस्थानच होता. ' सर्वभूतहितेरत ' अशी त्याची वृत्ति होती. आणि एवढेंहि करून तो निर्मम, निरंहकार, अनासक्त व

त्रिगुणातीत होता. कशाचीच अपेक्षा नसल्यानें व आत्मतृप्त असल्यानें तो स्वतंत्र होता आणि म्हणून खऱ्या अर्थानें ईश्वर होता. त्या परमपुरुषाच्या–महाविष्णूच्या कंठांत लक्ष्मीनें कमलमाला अर्पण केली आणि ज्या वक्षावर ती रुळत होती तेथें आपल्याला आसरा मिळतो का, हें पाहण्यासाठीं अनिमिष लोचनांनीं प्रभूच्या वक्षावर तिनें नजर खिळवली. ‘ न मागे तयाची ’ रमा दासी बनली होती.

त्या त्रिभुवनसुंदरानेंहि त्या मालेसह कमलेचा स्वीकार केला आणि हृदयेश्वरीचें व जगन्मातेचें पद लक्ष्मीला अर्पण केलें.

बाणभट्टानें आपल्या कादंबरींत लक्ष्मीच्या दुश्चरित्राचें चित्र रेखाटलें आहे. पण तें या लक्ष्मीचें नव्हे. कुटिल राजनीतीच्या हातांत साधन बनलेल्या, राजसत्तेशीं संगनमत करणाऱ्या राज्यलक्ष्मीचा तो महिमा असावा ! जगन्नायकाच्या आश्रयानें राहणारी व ‘ रमा ’–पदवी प्राप्त झालेली लक्ष्मी निष्करुण कशी असेल? मग ती जगज्जननीपद कसें धारण करूं शकेल ? श्रीविष्णूच्या हृदयांत स्थान लाभतांच आपली जगज्जननीपदाची जबाबदारी लक्ष्मीला कळली, असें श्रीशुकांनीं मोठ्या मार्मिकपणें सुचवलें आहे. कारण ते वर्णन करतात :

**श्रीः स्वाः प्रजाः सकरुणेन निरीक्षणेन ।**
**यत्र स्थितैधयत साधिपतींस्त्रिलोकान् ॥ ८. ८. २५**

श्रीनारायणाच्या हृदयांत सुप्रतिष्ठित होतांच लक्ष्मीनें आपल्या प्रजेकडे, लोकपालांकडे व त्रैलोक्याकडे कृपादृष्टीनें पाहिलें व त्यांचा गौरव केला. आणि ती दृष्टि समर्थाच्या, राजराजेश्वराच्या कान्तेची असल्यानें—

**श्रिया विलोकिता देवाः सप्रजापतयः प्रजाः ।**
**शीलादिगुणसंपन्ना लेभिरे निर्वृतिं पराम् ॥ ८. ८. २८**

श्रीलक्ष्मीच्या कृपाप्रसादाच्या सुधाधारांत सुस्नात झालेले प्रजापति आदि देव आणि मानव शीलचारित्र्यादि गुणांनीं समृद्ध झाले आणि महान् सुखाचे धनी झाले. लक्ष्मीचें स्वयंवर सफल झालें, कृतार्थ ठरलें आणि सर्वांनीं पुष्पवृष्टि करून पुनः एकवार प्रार्थना केली :

**सा लक्ष्मीः सुवरदा भवतु, सुप्रसन्ना भवतु ।**

* * *

४८०७८ दि: 7/1/9
१७३८ दि: 2

# ६ : बलिकथेंतील चिरंतन संघर्ष

भारतीयांचे उत्सवराज दोन : दसरा आणि दिवाळी. या दोन्ही वेळीं ‘ बली ’ची त्यांना आठवण असते. दिवाळींत तर ‘ बलिप्रतिपदा ’ हा दिवस खास बलीच्या स्मरणासाठींच राखून ठेवलेला. विजयादशमीनंतर येणारी ‘ दिवाळी ’ म्हणजे उत्साहाचा नि ऐश्वर्याचा बहर ! ऐश्वर्याच्या बहरांत बलिकथेचें स्मरण ठेवणें यांत फार मोठें औचित्य आहे. कारण बलीची कथा त्याच्या ऐश्वर्यराशीशीं निगडित आहे. पण तसें तें ठेवलें जातें, असें दिसत नाहीं. बलीची कथा लोकांना ठाऊक आहे ती ‘ वामनावतारा ’ मुळें. श्रीविष्णूच्या वामनावताराला व त्याच्या ‘ त्रिविक्रमा ’ ला त्यांत प्राधान्य आहे. वामनाच्या तिसऱ्या चरणाला बलीच्या मस्तकीं जागा मिळाली व तो पाताळांत दडपला गेला, एवढेंच लोकांना ठाऊक आहे. वामनाच्या विक्रमांत बलीचें व्यक्तिमत्त्व लोपून गेलें आहे. पण श्रीमद्भागवतकारांनीं बलीचें व्यक्तिमत्त्व फार प्रभावीपणें रेखाटलें आहे. मुख्य म्हणजे बलिकथेच्या रूपानें मानवी जीवनांतील एक चिरंतन संघर्ष वाचकांसमोर ठेवून त्यांतून एका भव्य आदर्शाची निर्मिति त्यांनीं केली आहे. श्रीमद्भागवताच्या आठव्या स्कंधांतील १८ ते २३ या पंचाध्यायींतील बलीचें उपाख्यान म्हणजे शांत, वीर, रौद्र, करुण नि भक्ति या पांच रसांचा मनोहर संगम आहे. त्या संगमांत डुंबतांना अनेक विचारांच्या भोवऱ्यांत आपण गिरक्या घेतों व त्यांतून बाहेरहि पडतों. भागवतकारांच्या अप्रतिम प्रतिभेचें सौंदर्यहि जाणवतें आणि जीवनांत शांति व समाधान मिळविण्याचा त्यांनीं दाखविलेला मार्ग कळतो. तो मार्ग चोखाळणें, हें शेवटीं ज्याच्या त्याच्या प्रकृतिधर्मावर व पूर्वसुकृतावर अवलंबून आहे.

मानवी जीवनांत दोन पेचप्रसंग नेहमींच उभे असतात : एक श्रेयप्रेयाचा, दुसरा सत्यासत्याचा. आणि यांतूनच तिसरा निर्माण होतो : कार्याकार्याचा.

**किं कर्म किमकर्मेति कवयोऽप्यत्र मोहिताः ।**

असें गीता म्हणते, तें या तिसऱ्या पेचप्रसंगाबद्दल. पण असले पेच कुणाला? ज्याला विधिनिषेधांची, सत्यासत्याची चाड असेल त्याला. सदसद्विवेकबुद्धीची ज्याला टोचणी नाहीं, छायाप्रकाशाप्रमाणें जगांत सत्यासत्याला, दोहींनाहि स्थान आहे–नव्हे असत्याशिवाय जग चालायचें नाहीं, असें ज्यांचें धोपटमार्गी तत्त्वज्ञान आहे, त्यांना असले संघर्ष ठाऊक नसतात. धन-दौलत, काम-कान्ता आणि कांचन-कीर्ति हींच ज्यांचीं जीवनोद्दिष्टें, ते सत्यासत्याच्या, ऋतानृताच्या खोल पाण्यांत शिरतच नाहींत. पण बलीची गोष्ट तशी नाहीं.

बलि हा असुरकुलोत्पन्न खरा. हिरण्यकशिपु नि हिरण्याक्ष यांचा तो वंश-संभव. 'असुरेन्द्र' म्हणून त्याला वामनानेंहि संबोधिलें आहे. पण तो अत्यंत सत्त्वशील आहे. बलि हा भक्तराज प्रल्हादाचा नातू. प्रल्हादाचाच वारसा घेऊन तो जन्मास आला आहे. बलीच्या स्वागतपर भाषणाला उत्तर देतांना वामनानें याची जाणीव ठेवली आहे. आकाशांतील तारामंडळांत जसा चंद्र, तसा तुमच्या कुलांत जन्मलेला प्रल्हाद आपल्या विमल यशानें शोभतो—

**युष्मत्कुले यद्यशसाऽमलेन प्रल्हाद उद्भाति यथोडुपः खे । ८. १९. ४**

असा त्याचा गौरव केला आहे. बलीचें कुल वीरतेसाठीं आणि औदार्यासाठीं विख्यात होतें. बलीच्या पूर्वजाचा–हिरण्याक्षाचा श्रीविष्णूनें अन्त केला खरा. पण हिरण्याक्षाचा प्रचंड, अतुलनीय पराक्रम आठवला कीं आपला विजय कांहींच नव्हे, असें विष्णूला वाटत असल्याचें वामनाच्या तोंडून भागवतकारांनीं वदविलें आहे. त्याला जिंकावयाला विष्णूला फार फार प्रयास पडले, अशी स्वच्छ कबुली त्यांनीं दिलेली आहे—

**यं विनिर्जित्य कृच्छ्रेण विष्णुः क्ष्मोद्धार आगतम् ।**
**नात्मानं जयिनं मेने तद्वीर्यं भूर्यनुस्मरन् ॥ ८. १९. ६**

बलीच्या कुलाच्या औदार्याची प्रशस्ति पुढीलप्रमाणें केलेली आहे :

**न ह्येतस्मिन् कुले कश्चिन्निःसत्त्वः कृपणः पुमान् ।**
**प्रत्याख्याता प्रतिश्रुत्य यो वाऽदाता द्विजातये ॥ ८. १९. ३**

—ह्या कुलांत कैंधीं निःसत्त्व वा कृपणकद्रू जन्मला नाहीं. ब्राह्मणाला 'देतों' म्हणून शब्द देऊन मग शब्द फिरवला, असें या कुलांत कधीं घडलें नाहीं.

बलिकुलाची ही केवळ वरपांगी स्तुति नव्हती. बलीला वश करण्यासाठीं वा फुशारकीनें भुलविण्यासाठीं हा स्तुतिपाठ वा जाळें नव्हतें. बलि स्वतःच असें म्हणतो आहे कीं—

**न पुमान् मामुपव्रज्य भूयो याचितुमर्हति। ८. १९. २०**

मनुष्य एकदा माझ्याकडून भिक्षा घेऊन गेला कीं त्याला पुन्हा परत येण्याची गरज पडत नाहीं. बलीला या गोष्टीचा यथार्थ अभिमान वाटतो. वामनानें ठिकठिकाणीं बलीचा गौरव ' वरदर्षभ ' (उदारश्रेष्ठ), ' वदान्यजगदीश्वर ' (औदार्यशील जगन्नाथ) अशा शब्दांत केला आहे.

बलीचें चारित्र्य नि व्यक्तिमत्त्व अशा तऱ्हेचें असतांना वामनानें त्याचें सत्त्व पहावें, हें विपरीत नाहीं काय ? अनेकांना तें विपरीत वाटलें आहे व सद्यःकालीन समाजस्थितीच्या व सामाजिक समस्यांच्या संदर्भात बलिकथेचा विपर्यस्त अर्थहि संधिसाधूंनीं करून घेतला आहे. पण त्याकडे नंतर वळू. बलीचें खरेंच सत्त्वहरण झालें काय? इन्द्राचें स्वर्गराज्यपद टिकावें एवढा हेतु धरूनच श्रीविष्णूंनीं वामनरूप घेतलें काय ? बलीला पाताळांत लोटण्यांत अन्याय झाला आहे काय ? बलीला माघार घेतां आली नसती काय ? वामनाचा कपटकावा लक्षांत आल्यावर त्यानें आपला शब्द फिरविणें समर्थनीय नसतें का ठरलें ? या वीरकुल-प्रसूला वामनाचा शस्त्रानें प्रतिकार करतां आला नसता काय ?—असे विचारांचे भोवरे ही कथा वाचतांना निर्माण होतात. या भोवऱ्यांतून शुकाचार्य म्हणा, व्यासमुनि म्हणा, ज्या कौशल्यानें आपली सुटका करतात, त्याचें दर्शन आपणांला श्रवणमननाचा मोठा आनंद देतें.

बलीच्या कथेचें कथानक सर्वांना स्थूल मानानें ठाऊक असल्यानें तें सविस्तर देण्याची आवश्यकता नाहीं. नर्मदेच्या तीरावर भृगुकच्छ (आजचें भडोच) येथें बलीनें महान् यज्ञ—अश्वमेधयज्ञ—आरंभला होता. यज्ञ सुरू असतांना बटु वामनाची तेजस्वी मूर्ति अवतीर्ण झाली. या बटु ब्रह्मचाऱ्याचें वैभव भागवतकारांनीं महाकवीला साजेशा प्रतिभेनें केलें आहे. ' कोटि रवींहूनि तेज आगळें तुझिया वदनाला ', अशी त्याची कान्ति होती. या बटूचा जेव्हां [illegible]संस्कार झाला, तेव्हां गायत्री मंत्राची अधिष्ठात्री देवता जो सूर्यनारायण, त्यानें स्वतःच त्याला गायत्री

मंत्राचा उपदेश केला. देवगुरु बृहस्पतीनें यज्ञोपवीत अर्पण केलें. पृथ्वीनें कृष्णा मृगाचें चर्म दिलें. आकाशदेवतेनें छत्र नजर केलें. वनस्पतींचा स्वामी चंद्रम, यानें दंड पुढें केला. सप्तऋषींनीं कुश-समिधा गोळा करून दिल्या. प्रत्यक्ष प्रजापतीनें हातीं कमंडलु दिला आणि सरस्वतीनें त्याच्या गळ्यांत रुद्राक्षांची माला घातली! आणि या थाटांत ती बटुमूर्ति यज्ञमंडपापाशीं येतांच त्याच्या देदीप्यमान कान्तीनें दिपलेल्या सर्व ऋत्विजांनीं नि मुनींनीं स्वयंस्फूर्तीनें त्याला उत्थापन दिलें. केवळ सभ्यांनींच नव्हे, तर यज्ञकुंडांतील अग्निदेवतेनेंहि ज्वालारूप हात उंचावून त्याला अभिवादन केलें. यजमान सहधर्मचारिणीसह अतिथीच्या स्वागतसत्काराला सत्वर पुढें सरसावला, हें सांगायला नकोच.

बटु वामनाची पूजा झाली. आसनावर बसण्याची त्याला विनंती करण्यांत आली. "आपलें काय प्रिय करावें?" म्हणून बलीनें पृच्छा केली. "सहस्रावधी ऋषि-मुनींची तपस्या साकार होऊनच आपल्या रूपानें जणूं आली आहे. माझे नेत्र धाले, पवित्र झाले, कुल उद्धरलें," म्हणून बलीनें समाधान व्यक्त केलें आणि आर्जवून विनंती केली, "महाराज गाई, घोडे, हत्ती, सोनें, माणकें अशा सर्व सामग्रीनें सुसज्ज सुंदर सदन—फार काय गृहस्थाश्रम स्वीकारावयाचा असल्यास सुंदर कन्यकाहि आपणांस मी देईन. काय पाहिजे तें मागा." बलीची कल्पना हा याचक मागून मागून असें काय मागणार? बलीला आपल्या औदार्याचा व संपत्तीचा गर्व झाला होता काय?

बटु वामनानें बलीची, त्याच्या कुलाची, त्याच्या पूर्वजांच्या वीर्य-औदार्य-शौर्य-आदि गुणांची आरंभीं सांगितल्याप्रमाणें मोठी प्रशंसा केली व मागितली फक्त 'त्रिपादभूमि'! आणि आपल्या मागणीच्या अल्पतेचें त्यानें समर्थनहि केलें, "ब्राह्मणांनीं, विद्वानांनीं गरजेपेक्षां अधिक दान घेऊं नये. नाहीं तर त्यांना प्रति-ग्रहाचें पाप लागतें."

उदार दाता आणि कृपण याचक हा योग नाट्यमय आहे. भूमीच मागितली, तर ती आपला उदरनिर्वाह भागवूं शकेल, एवढी तरी मागावयाची! माझ्या पूर्व-जांची हा भाटासारखी स्तुति करतो, धर्मशास्त्राच्या गोष्टी बोलतो, सारी पोपट-पंची कीं काय?– असें बलीच्या मनांत येणें स्वाभाविक होतें. पण त्यानें पुन्हा नम्रतेनें प्रार्थना केली, "महाराज, माझ्या लौकिकाला साजेसें कांहीं मागा. येथून

८८०८९ दि. ... ९८०३६ ... २०/१/६८

तृप्त होऊन गेलेल्या याचकावर पुन्हा हातांत झोळी घेण्याची पाळी येत नसते, असा या त्रिभुवनेश्वर बलीचा लौकिक आहे."

बलीची ही आत्मश्लाघा नव्हती. होतें तें सत्यच. पण कांहीं सत्यें स्वतः बोलायचीं नसतात. कर्तृत्वाचा अभिमान त्यांत व्यक्त होतो आणि तें 'आसुरी संपदे'चें द्योतक ठरतें!

यानंतर बलि आणि वामन यांत जो संवाद झाला, तो मोठा चिंतनीय आहे. भारतीय संस्कृतीच्या विचारसरणीचा आविष्कार वामनाच्या भाषणांत आहे. "आपली जीवनधारणा होईल, 'वृत्ति' अनिर्वेध चालेल, मन तृप्त होईल, असें कांहीं मागा," असें बलीचें म्हणणें होतें. 'तृप्ति' शब्दावर जोर देऊन वामनानें म्हटलें—

**अर्थोंहीं कामांहीं तृष्णान्तातें न पावले राजे।**

"राजा, इंद्रिय-विषयांची तृप्ति कधीं झाली आहे? सम्राटांची कामना कधीं शमली आहे? ज्याला तीन पावलांच्या भूमीनें संतोष लाभत नाहीं, त्याला सप्त-द्वीपा वसुंधरेचें स्वामित्व मिळालें, तरी त्याची तृष्णा शमायची नाहीं...तृष्णा व लोभ हींच जन्म-मरणांच्या फेऱ्याला कारणीभूत होतात! यदृच्छया लाभलेल्या गोष्टींत संतोष मानणाराच सुखी होतो, इतकेंच नव्हे, तर अशाच ब्राह्मणांचें तेज, त्यांचा प्रभाव वृद्धिंगत होतो—

**यदृच्छालाभतुष्टस्य तेजो विप्रस्य वर्धते ॥ ८. १९. २६**

उलट असंतुष्टाचें तेज पाण्यानें अग्नि विझावा, तसें नष्ट होतें."

असंतोषांतून लाचारी कशी उद्भवते आणि लाचार माणसें आपलें वजन कसें गमावून बसतात, निःस्पृहांपुढें राजसत्ताहि कशी थरथर कांपते, हींच त्रिकाला-बाधित सत्यें श्रीशुकांनीं वामनाच्या भाषणांतून समाजाला सुचविलीं नाहींत काय? गीतेनेंहि—

**यदृच्छालाभसंतुष्टो द्वन्द्वातीतो विमत्सरः। ४. २२**

हेंच ज्ञानी पुरुषांचें लक्षण सांगितलें आणि मोक्षासाठीं आवश्यक असणाऱ्या 'नैष्कर्म्यसिद्धी'साठीं अनासक्त व निरिच्छ (१८.४९) असण्याची आवश्यकता प्रतिपादन केली आहे.

दा. क्र. १६६२८

वामनाच्या या तत्त्वज्ञान-प्रचुर भाषणानें बलि कांहींसा दिपला असेल; पण स्वतःच्या ऐश्वर्याच्या नशेनें त्याचे डोळे, त्याची विवेकशक्ति अंध झाली होती. वामनाचे हे शब्द 'वृद्धसंमत' होते, हें खरें. पण स्वतःचें हित काय आहे, तें या खुळ्या पोराला कळत नाहीं, याबद्दल त्याची ठाम समजूत झाली. तो हंसला आणि म्हणाला, 'वाञ्छातः प्रतिगृह्यताम् ।' (इच्छेप्रमाणें घेतलें जावें), असें म्हणून दानाचा संकल्प सोडण्यासाठीं त्यानें हातांत जलपात्र घेतलें तोंच–

"वैरोचने, थांब, थांब, घात होतो आहे!" असें म्हणून शुक्राचार्यांनीं त्याला अडविलें.

"महाराज, कसला घात?"

"अरे, हा साधासुधा ब्रह्मचारी नाहीं. हा 'मायामाणवक'–पोराचें कपटरूप घेऊन आलेला, देवांचा पक्षपाती विष्णु आहे." त्या बटु वामनाच्या आगमन-क्षणापासूनच बलीचे गुरु शुक्राचार्य विचारमग्न झाले होते. बलि-वामनाचा संवाद त्यांनीं लक्षपूर्वक ऐकला. 'त्रिपादभूमी'च्या अर्थाचा प्रकाश त्यांच्या प्रज्ञाचक्षूंना दिसला, कळला. आणि म्हणून त्यांनीं बलीला थांबविलें होतें.

"बरं मग?" बलि अजूनहि स्थिर होता.

"अरे, मग काय? हा आतां विश्वकाय बनणार, विराट् स्वरूप धारण करणार, एका पावलानें पृथ्वी व्यापणार आणि दुसऱ्यानें द्युलोक-आकाश नि स्वर्ग! तिसऱ्या पावलाला जागाच कुठें? तुला आपलें वचन पुरें करतां येणार नाहीं. आणि वचनभंगाचें पाप म्हणजे नरकाची पायवाट.

**निष्ठां ते नरके मन्ये ह्यप्रदातुः प्रतिश्रुतम् ॥**

झोपलेल्या माणसालाहि खडबडून जाग यावी, असें शुक्राचार्यांचें तें खणखणीत भाषण होतें. स्वतःचाच नव्हे, तर असुरजातीचा, असुरराज्याचा नाश तूं ओढवून घेत आहेस, असा त्याला कडक इशाराहि त्यांत होता.

येथून पुढें शुक्राचार्यांनीं आपल्या सच्छिष्याला जो उपदेश केला आणि बलीनें त्याला जें विनम्रभावानें उत्तर दिलें, तो मानवी जीवनांतला चिरंतन संघर्ष आहे. सामान्य भाषेंत त्याला 'व्यवहार' आणि 'ध्येयवाद' यांच्यांतील संघर्ष म्हणतां येईल. तत्त्वज्ञानाच्या भूमिकेवरून त्याचें वर्णन 'प्रेयश्रेयांचा संघर्ष' असें करतां

येईल. बलि पेचांत सापडला आहे. मागें फिरलें तर नरकनिवासाची भीति. पुढें गेलें तर सर्वनाश. पण मागें फिरण्यांत आज तर कातडी बचावते आहे, ' शिर सलामत ' राहतें आहे. आणि हें विलोभन केवढें आहे! शुक्राचार्य केवळ इशारा देऊन थांबले नाहींत, तर बलीनें ' काय करावें, ' याचा ' मंत्र ' हि त्यांनीं दिला. असुरकुलाचे ते गुरु. त्याची प्रतिष्ठा सांभाळण्याची जबाबदारी त्यांच्या शिरावर होती. त्यांच्या उपदेशाचें रहस्य लक्षांत घेऊन मोरोपंतांनीं त्याला ' प्रवृत्तिवाद ' असा शब्द लावला आहे. शुक्राचार्यांनीं बलीला प्रथम ' दाना '-ची मर्यादा सांगितली—

**असुरश्रेष्ठा, जेणें होतो संपूर्ण वृत्तिचा अंत ।**
**ज्यांत विचार नसे, त्या दानातें न प्रशंसिती संत ॥**

असा त्याला निर्वाळा दिला. ज्यानें स्वतःचें सारें जीवन, जीवनस्रोत नष्ट होतो, तें दान कसलें ? तो आत्मघातच ! ' दान ' म्हणजे संविभाजन-संपत्तीची सम्यक् वाटणी. ती जरूर करावी. तिच्यामुळें इहलोकीं भोग नि कीर्ति आणि पर-लोकीं पुण्यफलामुळें स्वर्गोपभोग मिळायला हवेत. संपत्तीच्या व्ययांतून धर्म साधावा, पुण्य मिळवावें, कीर्ति मिळवावी आणि पुनः अर्थाची प्राप्ति व्हावी ! जीवनांतील यज्ञ, तप, दान, परोपकारहि सतत चालवितां येतील, इतपतच दान द्यावयाचें असतें ! " सर्वस्वं विष्णवे दत्त्वा मूढ, वर्तिष्यसे कथम् ! " अरे मूर्खा, या कपटपटु बटूच्या झोळींत सर्वस्व टाकून तूं जगणार तरी कसा ? " (८.१९.३३) असेंहि शेवटीं त्यांनीं बलीला विचारलें.

पण त्यांना ठाऊक होतें कीं, बलि हा बुद्धिमान् आहे. " गुरुजी, वचनभंगाचें पाप लागेल, त्याचें काय ? " असा तो प्रतिप्रश्न करील. म्हणून त्याला प्रश्न विचारावयास अवसर न देतांच आपल्या म्हणण्यासाठीं त्यांनीं श्रुतीचा—वेदाचा आधार घेतला. सत्य-असत्याचा निवाडा श्रुति-स्मृतींच्या आधारें करून ते शास्त्रार्थ सांगूं लागले :

" कुणालाहि अमुक एक वस्तु ' हो ' म्हणणें ( व त्याप्रमाणें देणें ) याला सत्य म्हणतात आणि ' नकार ' देणें याला अनृत वा असत्य म्हणतात. पण जीवनांत दान करण्याइतकीच दान न करण्याची म्हणजेच संग्रहाची गरज आहे. आपल्या आत्मरूप वृक्षाचें ( या शरीराचें ) मूळ आहे संग्रहांत—न देण्यांत, म्हणजे अनृतांत;

आणि सत्य ( म्हणजे दान ) हें त्याचें पुष्प आहे. मुळेंच उखडलीं, तर वृक्ष कसा टिकणार ? मनुष्य जिवंत कसा राहणार ? आणि मग त्याला दानधर्माचीं फुलें तरी कोठून येणार ? तेव्हां 'अनृत' नष्ट झालें, तर आत्मा ( शरीर ) शुष्क होईल. शिवाय, राजा, कांहीं प्रसंगीं खोटें बोलण्याला शास्त्राची हरकत नाहीं.

> अनृत वदावें राया, निःशंकचि वृत्तिसंकटीं, नर्मीं।
> गो-विप्र-परित्राणीं जेविं विवाहीं न दोष या कर्मीं ॥

—आपल्या उपजीविकेचें साधन धोक्यांत येत असेल, तर खोटें बोलावयाला हरकत नाहीं. स्त्रियांना प्रसन्न करून घेतांना त्यांना गोड थापा मारायला बिघडत नाहीं; हास्यविनोदांत खोटें बोलणें पाप ठरत नाहीं, विवाह मोडूं नये म्हणून सत्यापलापांत पाप घडत नाहीं, तसेंच आत्मरक्षणासाठीं वा गाई-ब्राह्मणांचे प्राण वांचवण्यासाठीं असत्याचा आश्रय हा निंद्य ठरत नाहीं. "

अशा तऱ्हेचें भावी अनिष्टाची सूचना देणारें, पापभयाच्या शंकेचें निरसन करणारें, 'शास्त्रपूत' भाषण करून शुक्राचार्य आपला शिष्योत्तम काय करतो, हें पहाण्यासाठीं स्तब्ध झाले.

यावर बलीनें दिलेलें उत्तर मोठें बाणेदार, त्याच्या वीरत्वाला नि ब्रीदाला साजेसें आहे. बलि केवळ पढिक शिष्य नव्हता. त्याला स्वतंत्र प्रज्ञा होती, विचार-शक्ति होती. न्यायान्यायाचा, सत्यासत्याचा नि कर्माकर्माचा निर्णय देण्यास तोहि समर्थ होता. श्रुतिवचनें त्यालाहि अवगत होतीं. इन्द्राला त्याची भीति वाटली, ती उगाच नव्हे. बलीचें आध्यात्मिक सामर्थ्य उच्च प्रतीचें होतें. गुरुजींचें भाषण त्यानें ऐकलें, अगदीं सावधान ऐकलें. क्षणभर तो स्तब्ध राहिला नि मग नम्रपणें म्हणाला :

"गुरुदेव ! आपण म्हणतां तें बरोबर आहे. आपण, सांगतां तें धर्माचें स्वरूपहि बरोबर आहे, पण तो गृहस्थाश्रमी, प्रापंचिक लोकांचा धर्म आहे. त्या धर्माचें पालन केलें कीं, त्यांची कीर्तिकामना, अर्थसाधना व कुलपरंपरा अव्याहत चालू रहाते, यांत शंकाच नाहीं. पण तो सामान्यांचा धर्म सत्यनिष्ठ प्रल्हादाच्या या नातवानें आचरून आणि दिला शब्द मोडून त्याच्या व कुळाच्या नांवाला कलंक लावावा काय ? या सर्व धनदौलतीचा त्याग जगाचा निरोप घेतांना

करावाच लागतो; मग आज तो स्वेच्छेनें करून आल्या याचकाला संतोषवून तो त्याग कारणीं कां लावूं नये? जगांत माणसाला अत्यंत प्यारा म्हणजे त्याचा जीव; पण शिबि आणि दधीचि यांनीं तोहि आनंदानें अर्पण केल्याचा इतिहास आहे. मग या मृत्तिकातुल्य धनाचा त्याग करण्यांत एवढें वाईट वाटण्याजोगें काय आहे? आपल्या या असुर-कुलांत गतकालांत केवढे बलाढ्य, अप्रतिरथ, अप्रतिद्वन्द्वी सम्राट् होऊन गेले. त्यांचीं राज्यें-साम्राज्यें कालाच्या उदरांत केव्हांच 'स्वाहा' झालीं. मागें उरलें आहे तें त्यांचें कीर्तिरूप शरीर! अपात्रीं दान केल्यानें करुणासागर उदार आत्म्यांना जरी दुर्गति भोगावी लागली, तरी तो कलंकहि चंद्र-लांछनाप्रमाणें त्यांच्या कीर्तीची शोभा वृद्धिंगतच करतो ना?

"नि असं पहा, आपण म्हणतां हा मायावी विष्णु बटु रूपानें आला आहे. मग यासारखें भाग्य कोणतें? यज्ञयागादि कर्मांचा सारा खटाटोप त्याला प्रसन्न करण्यासाठींच असतो ना? आणि देवांचा कैवार घेऊन माझा शत्रु या नात्यानें तो आला असेल, तर त्या वैकुंठेश्वराला, लक्ष्मीपतीला माझ्या दारीं झोळी घेऊन यावें लागावें, यांत कमीपणा कुणाचा?

"आणि महाकवे, आपण श्रुतिवचनांबद्दलच म्हणत असाल, तर मलाहि एक श्रुतिवाक्य स्मरतें. 'न ह्यसत्यात्परोऽधर्म इति होवाच भूरियम्।'–सत्यापरता नाहीं धर्म आणि असत्यासारखा नाहीं अधर्म, असें सांगून या क्षमाशील धरित्रीनें बजावलें होतें–

अतिदुःखभार साहेन।

परि मी स्पष्ट अनृत-पर नर भर परमोग्र पळ न साहेन॥

त्या सर्वंसहा वसुंधरेचा स्वामी होऊन तिच्या भारांत भर घालण्याचें पाप मी कसें करूं? छेः छेः! गुरुदेव, मला त्या मोहांत पाडूं नका! मला दारिद्र्यांत पडावें लागो, दुःखसागरांत डुंबावें लागो, नरकवासांत पिचावें लागो, मी तें सारें सोशीन, पण अतिथीशीं वचनद्रोह केल्याच्या वेदना मला सोसवणार नाहींत! मी माझा शब्द पुरा करणार!"

शुक्राचार्य यावर काय बोलणार? 'शेषं कोपेन पूरयेत्' एवढेंच अस्त्र त्यांच्याजवळ उरलें होतें. बलीच्या बिनतोड युक्तिवादाला त्या अस्त्रानेंच त्यांनीं उत्तर दिलें:

'जा, माझी अवज्ञा करतोस, तर तुझें राज्यवैभव तुला सोडून जाईल!' असा शाप देऊन ते बाजूस सरले. लोक-कथा नि लोक-पुराणिक सांगतात, शुक्राचार्यांनीं बलीच्या झारींत बसून जलदानाला अडथळा केला आणि वामनानें दर्भाच्या काडीनें झारीचें छिद्र मोकळें केलें, त्यामुळें शुक्राचार्यांचा डोळा फुटला, ते एकाक्ष झाले. मूळ भागवतांत याला आधार नाहीं. या लोककथेचा आशय एवढाच कीं, शुक्राचार्य जीवनांतील एकच अंग, एकच स्वरूप पाहूं शकले, म्हणून ते 'एकाक्ष' होते. आणि बलीचे शब्द कुशाग्रापेक्षां काय कमी तीक्ष्ण होते?

बलीच्या कथेंतील चिरंतन संघर्ष आहे तो हाच! शुक्राचार्यांच्या युक्तिवादांत 'देहात्मवादा'चा, सुखवादाचा प्रचार आहे. सर्व कांहीं करावयाचें तें ऐहिक व पारलौकिक सुखाच्या उपभोगासाठीं. आणि त्या उद्दिष्टासाठीं खऱ्याखोट्याची, सत्यासत्याची सरमिसळ आवश्यक आहे. सामान्य माणसांसाठीं हा धर्म ठीक असेल, असें बलिराजाहि मान्य करतो. पण यापेक्षांहि श्रेष्ठतर, वरच्या पातळीवरचा एक धर्म आहे, अध्यात्मशास्त्र आहे, अशी त्याची निष्ठा आहे. त्या श्रेष्ठ आदर्शाचें, जीवनमूल्याचें पालन ज्ञानी, सदाचारी, समाजनेत्यांनीं केलेंच पाहिजे. त्याशिवाय समाजाची व विश्वाची धारणा होणार नाहीं. 'Everything is fair in love and war,' हें सामान्यांनीं व वाटल्यास दरबारी मुत्सद्द्यांनीं म्हणावें, पण प्रजापालनाचा धर्म ज्यांनीं स्वीकारला, त्या लोकपालांना तें म्हणतां येणार नाहीं. सत्तेपेक्षां सत्याचीच चाड त्यांना हवी. ही एकांतिकता आहे असें कोणी म्हणेल, पण भारतीय संस्कृति ह्याला एकान्तिकता वा अतिरेकीपणा मानीत नाहीं. जीवनाच्या विविध पातळ्या भारतीय अध्यात्म मानतें. मधल्या कोटीच्या लोकांसाठीं 'मध्यम मार्ग,' 'सुवर्णमध्य' ठीक असेल. पण वरच्या कोटीच्या माणसांचा धर्म निर्भेळ सत्याचें कठोर पालन हाच. राजा हरिश्चंद्रानें याच व्रताचें पालन केलें. दाशरथि रामाचाहि तोच आदर्श. रघुवंशांतील गुरुसेवापरायण दिलीपाचीहि हीच धारणा. या मनस्वी दृढव्रतांना नश्वर शरीरापेक्षां 'यशःशरीरा'ची महती अधिक वाटली. पण त्यासाठींहि ते हपापले होते, असें नव्हे. मर्त्य मानवाची अमरतेची आस पूर्ण व्हावयाची असेल, तर ती सच्चारित्र्याच्या व सत्कीर्तीच्या रूपानेंच, हें जातां जातां त्यांनीं व्यक्त केलें आहे. त्यांचें खरें ब्रीद, खरा धर्म 'सत्यपालन' हाच. कारण 'ऋत आणि सत्य' यांनींच विश्वाचें

नियमन व धारणा होते, ही त्यांची श्रद्धा होती. विश्वपालक विष्णूच्या पदावर (ना विष्णुः पृथिवीपतिः) आपला अधिकार पोहोचत असेल तर तो या सत्यपालना-मुळेंच, ही त्यांची निष्ठा होती. 'तिसरें पाऊल माझ्या मस्तकावर ठेव,' ('पदं तृतीयं कुरु शीर्ष्णि मे निजम्' म्हणून बलीनें जेव्हां मस्तक विनम्र केलें, तेव्हां 'करोमि ऋतं –मी सत्यपालन करून दाखवीन,' हीच त्याची प्रतिज्ञा होती !

व्यवहार आणि आदर्श यांचा जेव्हां संघर्ष निर्माण होतो, तेव्हां भारतीय संस्कृति 'आदर्शा'च्या बाजूनें आपला कौल देते. त्या पातळीवर पोचलेल्यांना पालखींतून मिरवते, शिरोधार्य मानते.

बलि एवढा धर्मनिष्ठ, सत्यव्रत होता, तर त्याची सत्त्वपरीक्षा कां घेतली जावी ! या प्रश्नाचें वरवरचें उत्तर सोपें आहे. परीक्षेवांचून प्रशस्तिपत्रें नि पारितोषिकें हीं द्यावयाचीं नसतात म्हणून ! आणि ज्यांच्याजवळ 'सत्त्व' व 'सत्य' असतें, त्यांचीच परीक्षा पहावयाची असते ! भागवतकारांनीं या प्रश्नाचें खरें उत्तर बलीच्याच तोंडून दिलें असून, प्रल्हादाकरवीं त्याला पुष्टि दिली आहे. बलीनें श्रीविष्णूला धन्यवाद दिले आहेत. तो म्हणतो—

त्वं नूनमसुराणां नः पारोक्ष्यः परमो गुरुः ।
यो नोऽनेकमदान्धानां विभ्रंशं चक्षुरादिशत् ॥ ८. २२. ५

"आम्ही असुरजन कुल, विद्या, संपत्ति, राज्यश्री यांच्या मदानें, धुंदीनें जेव्हां अंध होतो, तेव्हां या वस्तु आमच्याकडून हिरावून घेऊन तूं आमच्या डोळयांत झणझणीत अंजन घालतोस नि आम्हांला नेत्रदान करतोस. आमच्यावर हा महान् उपकार करणारा तूं आमचा अप्रत्यक्षपणें गुरुच होय ! फार चांगलें झालें. ऐश्वर्याचा नि लक्ष्मीचा वियोग दैवानें घडवला, पण त्यामुळें प्रत्यक्ष लक्ष्मीपतीच्या चरणांचा लाभ झाला ! ऐश्वर्य-संपत्तीमुळें मानवाची बुद्धि जड बनते, भौतिकवादी बनते. तिच्यांतून आपण मला सोडविलें !"

—बलीची विचारधारा अशी आहे.

बलीच्या पितामहानें–परमभक्त प्रल्हादानें याला दुजोरा दिला. तो म्हणाला, "देवा, देणारा तूंच, घेणाराहि तूंच. मग आम्ही वैभवहानीची कुरकुर कां करावी ? मी तर मानतों, आपण बलीवर मोठी कृपाच केली आहे."

आणि श्रीविष्णूंनीं हेंच सांगितलें : 'संपत्तीच्या मदमोहांत माझे भक्त गुरफटूं नयेत, म्हणून मी त्यांचें धन-वित्त हरण करतों!' कुन्तीनें 'आपदः सन्तु नः शश्वत्' हें मागणें देवाची सदैव आठवण राहण्यासाठींच नव्हतें का मागितलें?

श्रीविष्णूंनीं बलीवर कुठलाच अन्याय केला नाहीं. त्याला त्यांनीं नरकांत ढकललें नाहीं. पाताळ म्हणजे नरक नव्हे. त्यांनीं त्याला दिलें 'सुतल' लोकाचें राज्य. तें स्थान मोठमोठ्या देवांनाहि दुष्प्राप्य होतें. "तुझ्यांतील असुर-भाव नष्ट होईपर्यंत तुला तेथें बिनधोक राहतां येईल आणि पुढील मन्वंतरांत तुला इन्द्रपदाची प्राप्तीहि होईल." हा तर वर दिलाच; पण शिवाय—

**सदा संनिहितं वीर तत्र मां द्रक्ष्यसे भवान्। ८. २२. ३५**

"मी तुझ्या रक्षणास्तव तेथें सदैव आहेंच. मला तूं हवें तेव्हां पाहूं शकशील." असा वर दिला. लोककथा सांगते, श्रीहरि बलीचा प्रहरी बनला! त्यांत अर्थ आहे.

* * *

# ७ : हतभागी कल्माषपाद

श्रीमद्भागवतांतील मित्रसह राजाची कथा म्हणजे एक नितान्त करुण कहाणी आहे. कांहीं अपराध नसतांना शापविषय झालेला हा राजा आपल्या स्वतःच्या हातानें आपलीं सुंदर चरणकमलें शापाग्नींत जाळून टाकतो आणि 'कल्माषपाद' बनतो. तेथूनच त्याच्या संकटपरंपरेला प्रारंभ होतो. एका अज्ञात शक्तीच्या–अंध नियतीच्या क्रूर चेष्टांचें तो खेळणें बनतो. त्याचें एकाकीपण व हतभागीपण वाचकाला व्याकुल करतें.

सूर्यवंशांतल्या सुदास राजाचा हा पुत्र. भस्मीभूत झालेल्या सगरपुत्रांचा आपल्या दिव्य तपोबलानें–भूलोकीं आणलेल्या स्वर्गंगेच्या बलानें उद्धार करणाऱ्या भगीरथाचा हा वंशज. मदयंती नांवाची त्याची गुणवती राणी होती. नांव 'मदयंती' असलें तरी ती मद वाढविण्याऐवजीं तो कह्यांत ठेवण्यासच साहाय्यक ठरत होती. एकदां राजा वनांत मृगयेस गेला असतां, त्याला एका राक्षसाशीं लढावें लागलें. त्या राक्षसाचा त्यानें वध केला. त्या राक्षसाचा भाऊहि तेथें होता. तो राजास शरण आला, राजानें त्याला सोडून दिलें. वैर आणि व्याधि यांचें बीजहि उरूं देऊं नये, असें सुज्ञ म्हणतात. मित्रसह हें तत्त्व विसरला. राक्षसाशीं निर्माण केलेल्या वैराचें बीज त्याच्या भावाच्या रूपानें उरलें.

राजाच्या तावडींतून सुटलेला तो मायावी राक्षस सूडाचा मार्ग शोधूं लागला आणि अखेर त्याला तो सापडलाहि. त्यानें रूप बदललें आणि राजाच्या पाक-शाळेंतच प्रवेश मिळवला. आपल्या पाककौशल्यानें हळूहळू पाकशाळेचीं सूत्रें त्यानें ताब्यांत घेतलीं आणि योग्य संधीची तो वाट पाहूं लागला.

एके दिवशीं कुलगुरु वसिष्ठ राजवाड्यांत भोजनाला येत असल्याची बातमी त्याला कळली. त्यानें सारी पाकसिद्धता केली. पानें मांडलीं. वाढप सुरू झालें.

आणि वसिष्ठ गुरूंच्या पानावर वाढलें गेलें तें स्वादिष्ट पक्वान्न नव्हे—तर अभक्ष्य नरमांस !

क्षणांत वसिष्ठांच्या तळपायाची आग मस्तकीं गेली. मुखांतून शापवाणी बाहेर पडली, " राजा, तूं नराधम आहेस ! आम्हांला नरमांस वाढलेंस ! जा, तूं नरमांसभक्षक राक्षस होशील ! " कोप शमला नि वसिष्ठ मुनींना खरा प्रकार उमगला. राजाला उःशाप मिळाला, " ही राक्षसाची अवस्था फक्त बाराच वर्षें भोगावी लागेल. "

पण मित्रसहाला हा अन्याय सहन झाला नाहीं. गुरु असले म्हणून काय त्यांनीं अविचारानें असा शाप द्यावा ? त्याचें क्षत्रियरक्त सळसळलें. आपला यत्किंचितहि अपराध नसतां गुरु वसिष्ठांनीं आपल्यावर शापास्त्र सोडावें, याचा त्याला भयंकर संताप आला. त्याचा विवेक लोपला. गुरूला प्रतिशाप देण्यासाठीं त्यानें हातांत पाणी घेतलें. आणि गुरूला तो शाप देणार तोंच—

साध्वी मदयंती लगबगीनें पुढें आली. तिनें पतीला समजावलें, " नाथ, हा काय अविचार आरंभला आहे ? ब्रह्महत्येचें पातक करूं नका. गुरुहत्येचें पातक त्याहून भयानक. हा अविचार म्हणजे पुनः कसलीच आशा नाहीं. " पत्नीच्या मृदु भाषणानें राजा शुद्धीवर आला. पण हातांतल्या मंत्रोदकाचें काय करावयाचें ? त्यानें त्या मंत्रपूत जलाची ओंजळ आपल्याच पायांवर रिती केली. त्याचे पाय शापदग्ध झाले. राजा मित्रसह ' कल्माषपाद ' झाला. पृथ्वीवर अन्यत्र कोठेंहि तें मंत्रोदक टाकलें तर जीवहत्या घडेल; तसें होऊं नये म्हणून आपलेच पाय त्यानें जाळून घेतले होते !

गुरूच्या शापानुसार राक्षसभाव प्राप्त होऊन कल्माषपाद रानावनांत हिंडूं लागला. राक्षसबुद्धि प्राप्त झाल्यानें त्याच्या हातून नृशंस कर्में घडूं लागलीं. एक दिवस क्षुधार्त होऊन भटकत असतां, त्याला आढळलें तें एक तरुण ब्राह्मण युगुल ! या राजर्षि राक्षसानें झटकन् त्या ब्राह्मणावर झडप घातली. त्याची तरुण पत्नी पुढें आली आणि तिनें त्या राक्षसाची करुणा भाकली. ती म्हणाली—

" अरे राजा, तूं कोण आहेस, याचें जरा स्मरण ठेव. शापानें तूं राक्षस बनला आहेस, पण तूं आहेस इक्ष्वाकु वंशांतला थोर वीर, प्रजेचा पालनकर्ता,

ऋषींचा अभयदाता ! राजा म्हणजे प्रजेचा पिता. तूं हें काय करतो आहेस ! अरे, हा माझा पति मोठा ब्रह्मर्षि आहे. अजून आम्हांला मूलबाळ नाहीं. आमचें जीवित अजून असफल आहे. याचा वध म्हणजे ब्राह्मणाचा वध. प्रजेचा घात म्हणजे प्रत्यक्ष पुत्राची हत्या. आणि त्यांतहि तुला खायचेंच असलें तर मला आधीं खा. अहेवपणीं मला मरण येऊं दे. पण लक्षांत ठेव कीं, सर्व पुरुषार्थांचें साधन असलेल्या या मानवी देहाचा वध म्हणजे सर्वार्थवध ! ”

पण कल्माषपाद हें बोधामृत श्रवण करण्याच्या मनःस्थितींत होताच कुठें ! कामार्ताप्रमाणें क्षुधार्तेहि हवें तें पाप करण्यास प्रवृत्त होतात ! त्यांत गुरुशापानें त्याची विवेकशक्ति लोपलेली. आणि विवेकभ्रष्टांचा अधःपात प्रतिपावलीं होत असतो. वाघानें एखादा पशु भक्षण करावा, तसा त्यानें तो ब्राह्मणयुवा नष्ट केला. पतिवियोगानें विद्ध झालेल्या त्या अपत्यकामा सतीचा पुण्यप्रकोप उफाळला. तिनें तत्काळ शाप दिला—

“ जा, तुलाहि अपत्यसुख कधीं लाभणार नाहीं. स्त्रीसुखाच्या क्षणींच तुला मृत्यु येईल ! ”

काममोहित क्रौंचमिथुनांतील एकाचा वध होतांच करुणासागर वाल्मीकींच्या मुखांतून अशीच शापवाणी प्रगटली होती. येथें तर प्रत्यक्ष अपत्यप्राप्तीसाठीं आसुलेलें मातृत्वच क्रुद्ध झालें होतें. इक्ष्वाकुकुलोद्भव दशरथालाहि पुत्रशोकाचा शाप मिळाला होता. पण निपुत्रिक दशरथाला तें एक झाकलें वरदानच वाटलें होतें. पण मित्रसहाला मिळालेला शाप म्हणजे निर्वंशतेची निशाणी होती.

वसिष्ठमुनींच्या शापाचा अवधि संपला आणि कल्माषपाद राजमंदिरांत परत आला. राजा आनंदी मनानें परत आला खरा, पण स्वसुखावर आपण निखारे ठेवले आहेत, याची त्याला कुठें कल्पना होती ? ब्राह्मण युवतीनें दिलेल्या शापाची वार्ता राणी मदयंतीला कळलेली होती. दिवसाचें राजकाज आटोपून मित्रसह मदयंतीच्या शयनमंदिरांत गेला. मदयंतीनें त्याच्या हातून घडलेल्या ब्रह्महत्येची व त्याला मिळालेल्या शापाची त्याला कपल्ना दिली आणि आत्मनाश ओढवून न घेण्याबद्दल त्याची मनधरणी केली. खिन्नमनस्क राजा माघारा फिरला. कांहीं दिवसांनीं तो वनांत तपश्चर्येला निघून गेला.

मित्रसह कल्माषपादाची ही जीवनकथा श्रीमद्भागवतकारांनीं अगदीं तटस्थपणें निवेदन केली आहे. दशरथाच्या पूर्वजाची ही कथा आहे. ऐन तारुण्यांत गुरु वसिष्ठांचा शाप मिळाला तोहि एक प्रकारें अकारण. पण नोकरांच्या अपराधाबद्दल धन्याला जबाबदार धरावयाचें, हा व्यवहारांतला नियम आहे, म्हणून त्याचें एक वेळ समर्थन करतां येईल. पण ब्राह्मणाचा वध करण्याची बुद्धि शापग्रस्त राजाला कां व्हावी ? आणि त्याचा कान्तासहवाससुखाचा आनंदहि कां हिरावून घेतला जावा ? या प्रश्नांना उत्तरें नाहींत.

मानवी जीवन हें अगम्य आहे, हेंच खरें ! मानवी जीवनांतील सर्व घटनांचा कार्यकारणभाव शोधण्याचा तुम्ही कितीहि प्रयत्न करा, अखेर बुद्धि कुंठितच होते. पुनर्जन्म आणि कर्मविपाक या दोहोंच्या आधारें माणसाच्या वाट्यास येणाऱ्या सुखदुःखांची मीमांसा भारतीय दर्शनांतील कांहीं संप्रदाय करतात. या जन्मीं वाट्याला आलेलीं दुःखें नि संकटें हीं पूर्वजन्मीं केलेल्या कर्मांचें ‘ संचित ’, त्याचा विपाक वा परिणाम, अशी समजूत घालून पुढील जन्मीं सुख मिळविण्यासाठीं या जन्मीं हातून शुभ कर्में व्हावींत, अशी आशावादी प्रेरणा हीं शास्त्रें देतात; सन्मार्गावर माणसाचें मन नि बुद्धि खिळवून ठेवण्याचा प्रयत्न करतात; भावी आशेच्या सोनेरी स्वप्नजालांत चित्त गुंगवून वर्तमानकालीन दुःखाच्या काळ्या छायांचा गडदपणा कमी करतात. पूर्वजन्मीं मिळालेले शाप-उःशाप हाहि एक असाच समाधानाचा मार्ग पुराणकथांत अनेकदां स्वीकारलेला दिसतो. मागील जन्मीं कुणा सिद्ध पुरुषाचा वा देवतेचा कळत न कळत अपराध झालेला कोणी भूपति वा भूदेव या जन्मीं कुठल्या तरी दुःखाच्या खाईत होरपळतांना आढळतो. शापावसानाची वेळ येते. कुणा सिद्धाचें वा अवतारी पुरुषाचें दर्शन होतें; त्याचा पादस्पर्श होतो आणि शिला होऊन पडलेली अहिल्या, मगराच्या तावडींत सापडलेला गजेंद्र यांचा उद्धार होतो, वाचकाला समाधान वाटतें. दुःखाच्या कारणाचें कोडें उलगडतें; कथाविषय दुःखमुक्त झाल्याचें समाधान लाभतें आणि आपणहि असेंच एक दिवस या भवपाशांतून, संसारतापांतून सुटूं, असा दिलासा मिळतो.

पण कांहीं वेळां हीं पुराणें व त्यांचे प्रणेते हींहि कुंठितमति झालेलीं दिसतात. जीवनांत घडणाऱ्या कांहीं विलक्षण घटनांची उपपत्ति त्यांनाहि देतां येत नाहीं—

निदान देण्याचा प्रयत्न त्यांनीं केलेला दिसत नाहीं. हीं पुराणें मानवी जीविताची अगम्यता, अनाकलनीयताच मूकपणें मान्य करतात, असें समजावयाचें काय ?

आणि विशेषतः कल्माषपादासारख्या निरागस नि सुवृत्त व्यक्तींच्या वाट्याला अशीं दुःखें येतात, आणि त्यांना कोठूनहि आशेचा किरण दिसत नाहीं; उलट दुःखपंकांत तीं अधिकच बुडत जातात, तेव्हां तर वाचकाच्या मनाची कोण तळमळ होते ? त्या दुःखमग्न माणसाची अवस्था डोळे बांधून रानांत सोडलेल्या माणसा-सारखी होते. वाचकाची अशा वेळीं जी विलक्षण तगमग होते, ती काय सांगावी ! असें कां ? या न्यायनिष्ठ, सज्ञान माणसाची अशी ससेहोलपट कां ? मनांत काहूर माजतें. पण प्रतिसाद कोठूनच मिळत नाहीं. मानवी जीवनाचें केवळ अगम्यपणच ह्या कथेद्वारां व्यासमुनींना सुचवायचें होतें काय ?

★ ★ ★

# ८ : रासक्रीडा - स्वरूप आणि रहस्य

श्रीमद्‌भागवतांतील अत्यंत कवि-जन-प्रिय ठरलेलें पण विद्वानांत तितकेंच वादग्रस्त झालेलें प्रकरण कोणतें असेल, तर तें रासक्रीडेचें. दहाव्या स्कंधांतील २९ ते ३३ हे पांच अध्याय रास-पंचाध्यायी म्हणून ओळखले जातात. गोपींच्या कात्यायनीव्रताच्या वेळीं त्यांना अभिवचन दिल्याप्रमाणें एका पौर्णिमेच्या रात्रीं यमुनेच्या तटीं श्रीकृष्णानें गोपीजनांसह केलेल्या नृत्य-विलासाचें हें वर्णन आहे. पण तो रासक्रीडेचा भाग पांचव्या ( म्हणजे तेहतिसाव्या ) अध्यायांतील फक्त २६ श्लोकांत आहे. या पांच अध्यायांचा सारांश आपण आधीं बघूं या. या आख्यानांत विप्रलंभ—म्हणजे वियोग आहे; पण त्यांत शृंगारापेक्षां गोपींची कृष्ण-मीलनाची आध्यात्मिक ओढच अधिक व्यक्त झालेली दिसेल. शृंगाराच्या छटा आहेत, त्या रासवर्णनांत. पण या परस्त्रियांबरोबर श्रीकृष्णानें रासक्रीडा करणें किती उचित ? गोपींनीं श्रीकृष्णाचें चिंतन करणें हें अधर्म्य नव्हे काय ? ज्ञान, वैराग्य नि भक्ति यांचा महिमा गाणाऱ्या भागवतासारख्या ग्रंथांत हें प्रकरण कां असावें ? किंवा परीक्षितीनें शुकमुनींना जणूं श्रोत्यांच्या वतीनें विचारलेला प्रश्न म्हणजे धर्मसंस्थापनेसाठीं अवतार घेणाऱ्या श्रीकृष्णानें परनारींसमवेत केलेला हा विलास त्याच्याबद्दल अप्रियता नि गैरसमज निर्माण करणारा नाहीं काय ? हाच प्रश्न अनेक चिकित्सक नि टीकाकार विचारतात. त्यांचा परामर्श आपण घेऊंच. पण रासलीलेचें रहस्य उलगडण्यास साहाय्य व्हावें, म्हणून प्रथम त्याचें स्वरूप समजावून घेऊं.

रासलीलेच्या सर्व घटना अतिशय अद्‌भुत, कौतुकास्पद आणि नाट्यपूर्ण आहेत. त्यांत नाट्यपूर्ण घटनांना उठाव मिळावा म्हणून अद्‌भुत—करुण रसांचे रंग मिसळले आहेत. रासलीलेसाठीं निवडलेली पार्श्वभूमि आणि परिसर हीं त्या नाट्यमय घटनांना साजेशींच आहेत. कृष्णजन्माच्या क्षणापासून त्याच्या लीलांना साक्षी असलेल्या विशाल यमुनेच्या सलिल लहरींनीं निनादित झालेला

रंगमंच कवीनें निवडला आहे. रात्र शरदृतूची आहे. पौर्णिमेचा चंद्र दिग्वधूंचीं मुखमंडलें आरक्त गुलाबी छटेनें फुलवीत खुलवीत पूर्वेच्या प्रांगणांत प्रवेश करीत आहे. त्याच्या रुपेरी किरणांचा शिडकावा सर्वत्र होऊं लागतांच कुमुदवनांतील लाख लाख कळ्या फुलूं लागल्या आहेत. कुमुदवनांतील मंद सुगंध सर्वत्र दरवळला आहे. शारदश्रीनें नटलेली ती वनश्री कमलालया कमलेचीच आठवण करून देत आहे. आकाशांत रजनीनाथाच्या सभोवतीं अनेक तारामंडळें उदय पावलीं आहेत आणि त्यांचें प्रातिबिंब यमुनेच्या विशाल जलाशयांत पडून जणूं तीं सहस्र नयनांनीं शारदश्रीची शोभा अवलोकन करीत आहेत. तिच्याच शेजारी सहस्र कुमुदिनींचा साजशृंगार ल्यालेली कुंजवनसखी उभी आहे. सर्वत्र कौमुदी महोत्सवाचे वातावरण पसरलें आहे. आल्हाद नि उत्फुल्लता सर्वत्र ओसंडत आहेत आणि निसर्गातील सर्व स्थिरचर कुठल्या तरी अपेक्षेनें भारलें जाऊन मंत्रमुग्ध झालें आहे. अशा या क्षणीं श्यामल गोपसुतानें नादभरी मुरली आपल्या सुकुमार ओठांवर ठेवली. तिच्यांतून मंजूळ सूर बाहेर पडायचा अवकाश, तिकडे गोकूळांत एकच धांदल उडाली.

गोपांगनांचे कान जणूं संकेत ठरल्याप्रमाणें त्या मुरली-रवासाठीं आतुरलेले होते. त्याची चाहूल लागायचा अवकाश, हातांतील काम त्यांनीं तसेंच सोडलें. दोहन करणारींनीं दुधाच्या चरव्या जमिनीवर टाकल्या. कुणी चुलीवर ठेवलेलीं भांडीं उतरावयाच्या विसरल्या. कुणी अंगावर घेतलेल्या अर्भकांना दूर सारलें. कुणी शयनागारांत उत्कंठित असलेल्या पतींना विसरून गेल्या. कुणी वेशभूषा करीत होत्या. कुणी डोळयांत घालण्यासाठीं बोटावर काजळ घेतलें होतें. कुणी भालप्रदेशावर सौभाग्यतिलक चढविण्यासाठीं कुंकू घेतलें होतें. सर्व जणी सर्व विसरल्या नि बेभान होऊन धावूं लागल्या. त्या सर्वींचें लक्ष्य एकच होतें. तो बासरीवाला मोराच्या पिसांचा मुगुट धारण करणारा घननील. त्यांना ध्यास होता त्या सुकुमार यशोदानंदनाच्या मुखदर्शनाचा. कवि म्हणतो, त्यांचीं मनें कृष्णमय झालीं होतीं. त्या ' गोविंदापहृतात्मानः ' झाल्या होत्या. त्यांचीं मनें त्या गोप-नंदनानें केव्हांच हरण करून नेलीं होतीं. मनच नाहीं, मग देहभान कुठलें नि मानापमानाची जाणीव तरी कुठली ? त्या इतक्या बेभान झाल्या होत्या, कृष्ण चिंतनांत तल्लीन होऊन धावत होत्या, कीं आपल्या शेजारीहि अन्य गोपी अशाच धावत आहेत, याचीहि त्यांना कल्पना नव्हती ! अशी ती एक विलक्षण धुंदी

होती, दिव्योन्माद होता. जाऊं-धावूं शकल्या नाहींत त्या फक्त अंतर्गृहांत अडकून पडलेल्या गोपी. पण त्यांनीं जागींच डोळे मिटले. त्या ध्यानमग्न झाल्या आणि त्यांची भावसमाधि लागली.

आणि पति-पुत्रांचा, घरा-दाराचा भय-लज्जेचा त्याग करून आलेल्या या गोपांगनांचें त्या खट्याळ नंदसुतानें स्वागत कसें केलें? अगदीं थंडपणें—अगदीं साळसूदपणें; जणूं आपण त्या गांवचेच नव्हत, अशा पद्धतीनें. तो श्याम मुरारी त्यांना विचारूं लागला—'हें काय? तुम्ही साऱ्या जणी अशा अकस्मात् येथें धावत कां आला? गोकुळावर कांहीं संकट का आलें आहे? रात्र किती झाली आहे! लांडग्यांनीं व्यापलेलें हें वन. पायांखालीं विंचूकाट्यांचें भय. जा, जा. क्षणभर सुद्धां येथें थांबूं नका. तिकडे तुमचीं मुलें, तुमचे आई-वडील, तुमचे पति तुमची शोधाशोध करीत असतील. मुलें रडत असतील, गाई हंबरत असतील, माता विव्हळत असतील. मार्गे फिरा. त्यांची सेवा-शुश्रूषा करा.

भर्तुः शुश्रूषणं स्त्रीणां परो धर्मो ह्यमायया ।
तद्बन्धूनां च कल्याण्यः प्रजानां चानुपोषणम् ॥ १०. २९. २४

आणि तो पति दुःशील असो, दुर्भग असो, जड असो, वृद्ध असो, रोगी असो, कीं अधन असो. 'पतिः स्त्रीभिर्न हन्तव्यः'—'पति देवचि ललनांना!' तुम्ही इथं थांबणं, रेंगाळणं, माझ्यासारख्या परक्याच्या सान्निध्यांत उभं रहाणं देखील 'अस्वर्ग्यं' नि 'अयशस्कर' आहे. जा, आपापल्या घरीं परता आणि स्त्रीधर्माचें, सतीधर्माचें पालन करून जन्माचें सार्थक करा!"

श्रीकृष्णाचें हें श्रुति-स्मृति-पुराणोक्त धर्माचें प्रवचन ऐकायला का गोपी तेथें सारीं बंधनें तोडून आल्या होत्या? कृष्णानें दाखविलेल्या परकेपणाच्या वृत्तीनें त्या खिन्न-विषण्ण झाल्या. निराशेनें व्याकूळ झाल्या. त्यांचे कंठ सद्गदित झाले. मुखांतून शब्द फुटेना. काय बोलावें हें सुचेना. त्या बिचाऱ्या स्फुंदून स्फुंदून रडूं लागल्या. त्याची विनवणी करूं लागल्या. त्यानें कृपाकटाक्षानें आपल्याला पुनीत करावें, म्हणून करुणा भाकूं लागल्या.

"प्रपंचांत गुरफटलेलं मन तूं खेचून घेतलंस. तूं क्लेशनाशक, भवतारक म्हणून तुझ्या पायांशीं आलों. तुझें दास्य पत्करून रहायला आम्ही राजी आहोंत. तुझ्या सेवेपेक्षां श्रेष्ठतम धर्म कोणता? ज्या धर्माचें पालन करण्याचा तूं उपदेश

कैलास, त्या धर्माचें अखेर पर्यवसान तुझ्या पदकमलांचें सान्निध्य लाभणें हेंच ना? पति-पुत्र, घर-दार म्हणजे प्रपंचांतल्या नानाविध दुःखपरंपरेला निमंत्रण. तिकडे आम्हांला परतायला तूं कां सांगतोस? आमचं पाऊल इथनं हलत नाहीं. तुला अनुग्रह करायचा नसेल, तर नको करूंस. तुझ्या विरहानलाच्या ज्वालांत या देहाची आम्ही आहुति देऊं नि तुझें ध्यान करीत तुझ्या पदवीला प्राप्त होऊं."

गोपांगनांचा तो अभंग निश्चय, त्यांची ती विरक्ति आणि आपल्या ठायीं असलेली दृढ भक्ति पाहून भगवन्त संतोषला. सहास्यवदनानें त्यानें गोपींचें स्वागत केलें. त्यांना हात धरून यमुनेच्या पुलिनावर नेलें. गीत-नृत्याला आरंभ झाला. यमुनेच्या जललहरींवरून वाहणाऱ्या वायूनें तो नदीकांठ शीतल, सुभग झाला होता. कुमुद्वनांतील सौरभ सर्वत्र उधळला होता. कृष्णानें त्यांना आपल्या बाहूंत घेतलें. त्या आनंदडोहांत बुडाल्या. पण अजून त्या पूर्ण कृष्णमय झाल्या नव्हत्या. त्यांची अहंजागृति कायम होती. "केवढं माझं भाग्य! भगवंतानें मला आपलें मानलें. माझ्या भाग्याचा इतर गोपींना केवढा हेवा वाटत असेल!"—अशा अभिमानानें त्या डुलत होत्या. नि तोंच त्यांच्या सौभाग्यमदाचा निरास करण्यासाठीं भगवान् अंतर्धान पावला! मीलनाचा आनंद क्षणांत लोपला. विरहाची दीर्घ काळ रात्र सुरू झाली. येथें या विश्वनाट्याचा पहिला अंक संपला.

दुसऱ्या व तिसऱ्या अंकांत—अध्यायांत गोपींनीं कृष्णभेटीसाठीं केलेला आक्रोश, त्याची केलेली शोधाशोध, त्याचें केलेलें गुणगान यांचें हृद्य वर्णन आहे. केवळ रास-प्रसंगासाठीं, शारदीय इंदूच्या उदयापासून अखेरच्या रासक्रीडेच्या समाप्तीपर्यंतच्या वर्णनासाठीं दिलेल्या एकुण १५४ श्लोकांपैकीं ६३ श्लोक यासाठींच आहेत. कृष्णसखा दिसेनासा होतांच वेड्यापिशा होऊन त्या इतस्ततः हिंडूं लागल्या. वृक्षवेलींना कृष्णाचें कुशल विचारूं लागल्या. कृष्णस्पर्शाचें भाग्य त्यांना लाभलें, म्हणून तरु-लतांचें, पुष्प-मंजरींचें भाग्य वानूं लागल्या. आणि अखेर आजवरची कृष्णलीला स्मरत, कृष्णमय होऊन आणि स्वतःलाच कृष्ण समजून कृष्णलीलांचें अनुकरण करूं लागल्या!

आणि त्यांना अकस्मात् श्रीकृष्णसख्याचीं कोमल पदचिन्हें वृंदावनांतील एका लताकुंजाकडे आढळलीं. त्यांत एका ललनेचीं पदचिन्हें मिसळलीं होतीं!

म्हणजे कृष्णानें आम्हांला टाकून कुणा तरी एकीवर खास अनुग्रह केला होता तर! त्या अधिक शोधाशोध करूं लागल्या. त्या पाऊलखुणांचा मागोवा घेत पुढें जाऊं लागल्या. तेथें त्यांना आढळली ती एक गोपी हतभागिनीप्रमाणें आक्रंदन करणारी.

कृष्णसखा तिला घेऊन कुंजवनांत आला होता. तिच्यासह त्यानें नाना क्रीडा केल्या होत्या. तिलाहि अभिमानानें ग्रासलें. 'कृष्णसख्याची मी अधिराज्ञी' असा गर्व तिच्या मनीं उपजला. 'प्रिया मी थकलें रे! मला जरा खांद्यावर घे ना!' म्हणून ती लाडिकपणें कृष्णाला आळवूं लागली. लाडावलेल्य लेकीनें डोक्यावर बसावें, असा हा प्रकार होता. 'ठीक आहे. बैस बाई खांद्यावर,' असें कृष्ण म्हणाला नि तेथेंच गुप्त झाला! ती गोपी–ती राधिका त्या शोकमग्न गोपीसमूहांत सामील होऊन श्रीकृष्णस्तव करूं लागली.

श्रीकृष्णाचें गोपींनीं केलेलें स्तवन म्हणजे एक सुंदर स्तोत्र आहे: त्यांत गोपींची श्रीकृष्णाविषयींची भावना प्रकट झाली आहे. आजपर्यंत श्रीकृष्णानें व्रजावर आलेलीं विविध संकटें कशीं निवारण केलीं, याचें तें वर्णन आहे. गोपी कृष्णाला 'व्रजजनार्तिहन्' म्हणून संबोधितात. तूं गोपिकानंदन नसून 'हृदयसाक्षी तूं विश्वनायक' असें त्याचें वर्णन करतात; तुझें कथामृत कल्मषापह म्हणजे पापनिवारक आणि श्रवणमंगल आहे, अशी श्रद्धा व्यक्त करतात आणि तुझ्या दर्शनासाठीं आसावलेल्या जीवांना 'त्रुटिर्युगायते'–क्षण युगासारखे वाटतात, अशी आपली विरहवेदना सांगत त्या कृष्णदर्शनलालस गोपी विराण्या गातात.

गोपींची ती व्याकुलता, अनन्यमनस्कता व शरणपरायणता पाहून श्रीकृष्ण प्रगट झाला. गोपींच्या हृदयांत नि नयनांत आनंद नाचूं लागला. क्षणापूर्वीं स्मशानवत् भासणाऱ्या यमुनापुलिनावर महोत्सवाचें वातावरण निर्माण झालें. आपल्या उत्तरीयावर त्यांनीं श्रीकृष्णाचें आसन मांडलें. त्याचें विविध प्रकारें पूजन केलें. याचें चरणसंवाहन त्या करूं लागल्या. आणि किंचित् कोपानें भ्रुकुटी वक्र करून त्यांनीं कृष्णाला प्रश्न विचारला, "जगांत प्रेमिकांचे तीन प्रकार दिसतात: कुणी प्रत्युपकाराची इच्छा बाळगून प्रेम करतात. कुणी वत्सल पित्याप्रमाणें भूतमात्रांचें पालन करतात; प्रतिप्रेमाची ते अपेक्षाहि बाळगत नाहींत. कांहीं असे असतात कीं, ते आपल्या उपासकांची फिकीर करीत नाहींत. प्रेमाला प्रतिसाद देत नाहींत. यांपैकीं श्रेष्ठ कोण?"

कृष्णानें आपल्याशीं केलेल्या निर्दय वागणुकीचें या प्रश्नाद्वारें त्या जणूं स्पष्टीकरण मागत होत्या.

कृष्णाचें उत्तर केवळ मार्मिकच नव्हे, तर त्यांची शंका निरसन करणारें व इतरांना मार्गदर्शन करणारें आहे. " पति-प्रेमाची, प्रत्युपकाराची अपेक्षा करून केलेली भक्ति ही स्वार्थी आहे. ना त्यांत जिव्हाळा, ना तो धर्म ( न तत्र सौहृदं न धर्मः । ). केवळ पित्याप्रमाणें सकरुण दृष्टीनें भक्ति करणारे धर्म व जिव्हाळा दोन्ही दाखवितात. तिसऱ्या प्रकारांत चौघांचा समावेश आहे. आत्माराम, ( समाधिसुखांत निमग्न होणारे ), केवळ बाह्यसुखांत निमग्न होणारे, तिसरे कृतघ्न आणि चौथे दुष्ट. सख्यांनो, मी यांपैकीं कोणत्याच प्रकारांत मोडत नाहीं. तुमच्या प्रेमाला कांहीं क्षण मीं प्रतिसाद दिला नाहीं, तो केवळ तुमच्या प्रेमाची उत्कटता तीव्र करण्यासाठीं. तुम्ही माझ्यासाठीं सारा प्रपंचाचा पसारा सोडून आलात, असेष्टांचा त्याग केलात, लोकनिंदेची चाड सोडलीत, हें मला कळत का नाहीं ? मी दृष्टीआड झालों तो तुमचा प्रेमा वाढावा म्हणून. सख्यांनो, कृपा करा नि मजवर रागवूं नका. अजस्र अशा शृंखला तोडून तुम्हीं मला जें निर्हेतुक प्रेम अर्पण केलेंत, नव्हे सर्वस्व समर्पण केलें, त्या ऋणांतून युगयुगान्तरींहि मी मुक्त होऊं शकणार नाहीं. तुमचें उत्कट, निष्काम प्रेम हेंच तुमच्या प्रीतीचें महाफल." गोपींच्या प्रेमपाशांत, भक्तीच्या चिरबंधनांत भगवंतानें स्वतःला चिरकाल बांधून घेतल्याची ही कबुली आहे.

आणि त्या गोपींना त्याच्या प्रेमाराधनेचें अल्पसें तरी फल मिळावें, अपार करुणेचा अनुग्रह त्यांना प्रतीत व्हावा, म्हणून योगेश्वर कृष्णानें रासक्रीडेचा सोहळा आयोजित केला.

रास शब्दावर कृष्णदयार्णवांचें भाष्य पुढीलप्रमाणें आहे:

> रास शब्दें म्हणाल काय ? । कुशल नर्तकींचा समुदाय ।
> तिहींसहित विलास होय । नृत्यविशेष तो रास ॥
> रासमंडिता जे का क्रीडा । ते बोलिजे रासक्रीडा ।

ज्यांत दिव्य अलौकिक रसाची निर्मिति व प्रतीति असते, ती रासक्रीडा होय.

' रासपंचाध्यायी ' या हिंदी ग्रंथांत लेखक म्हणतो : " एक रसही रससमूहके

रूपमें प्रगट होकर स्वयं ही आस्वाद–आस्वादक, लीलाधाम और विभिन्न आलंबके रूपमें क्रीडा करे–इसका नाम रास है।"

रासक्रीडेंतील आध्यात्मिक आशयाकडे वळण्यापूर्वी काव्यकृति म्हणून पाहिलें असतां त्या कवीची प्रतिभा केवढी उच्च दर्जाची होती, हेंहि पाहूं या. आरंभीं म्हटल्याप्रमाणें यमुनेचा विशाल व रमणीय परिसर या दिव्य लीलेसाठीं कवीनें निवडला आहे. त्यानें केलेलें निसर्गाचें वर्णन मोठें मोहक आहे. शारदीय ज्योत्स्नेनें तें यमुनापुलिन सुधाधवल झालें आहे. मल्लिका-मांदारपुष्पांचा सौरभ त्या वातावरणाची प्रसन्नता वाढवीत आहे. सारी काननभूमि कुसुमित झाली आहे. आणि जणूं सुकुमार कृष्णचरणांना नि गोविंदाच्या नाजुक पदतलांना वालुकाकण खुपूं नयेत, म्हणून यमुनेनें आपल्या तरल लहरींचा हात त्यावर फिरवून त्यांना कोमल बनविलें आहे. या उत्प्रेक्षेंतलें माधुर्य सहज जाणवणारें आहे.

अशा मधुर वातावरणांत सुपेशल गोपींचें आगमन होतें. मानवी मनाचे सूक्ष्म भाव कवीनें येथें उलगडून दाखविले आहेत. त्यागाच्या कसोटीवर प्रेमाची पारख होत असते. यत्किंचितहि अभिमान तेथें चालत नाहीं. ईर्षा-असूयेला तेथें जागा नाहीं. सर्वस्व-समर्पणाची त्यासाठीं तयारी हवी. असीम आर्तता आणि व्याकुलता यांच्यांत सारे अहंकाराचे कांटेकुटे जळून गेल्यावरच प्रभुकरुणेचा अमृतवर्षाव होतो. उत्कट प्रेम प्रेमळाला जिंकतें–कायमचें वश करतें.

आणि कवीनें केलेलें रासक्रीडेचें वर्णनहि तसेंच बहारीचें आहे. कृष्णानें गोपींसह फेर धरला नि तो सोहळा पाहण्यासाठीं गगनमंडपांत अमरजनांची दाटी झाली. गोपयोषितांच्या चरणांतील नूपुरें नि करांतील कंकणें यांनीं यमुनापुलिन झंकारून गेलें. त्या केतकीवर्णाच्या गोपिकाद्वयांत तो श्यामल देवकीसुत सोन्याच्या मण्यांमध्यें जडवलेल्या मरकतरत्नाप्रमाणें शोभत होता. नृत्यकुशल गोपांगनांचे ते चंचल पदविन्यास, बाहुलतांचे विभ्रम, त्यांच्या मुखांवरची तीं स्मितें आणि त्यांचे ते स्निग्धमधुर कटाक्ष, कपोलांवर भ्रमराप्रमाणें झेप घेणारे कृष्णकुंतल आणि नृत्याच्या आवेगांत उन्मुक्त झालेले केशकलाप यांच्यामुळें मेघमंडळांत सौदामिनी विलसावी, तशा त्या विलसत होत्या. नृत्याच्या श्रमानें त्यांच्या मुखमंडलावर, चंद्रबिंबावर सुधाबिंदु चमकावे, तसे घर्मबिंदु चकाकत होते. आणि तो करुणाकर भक्तवत्सल आपल्या सुखप्रद करकमलानें ते घर्मबिंदु हलकेच पुसून टाकीत होता. कृष्ण-

हृदयाचा हा सुकोमल भाव व्यक्त करण्यांत कवीची संवेदनचतुरता व सहृदयता प्रत्ययास येते.

जराशा विस्तारानें हें कथाख्यान मुळाला धरून येथें दिलें आहे, त्याचा हेतु, मूळ काय आहे व त्यांत शृंगाराचा भाग किती आहे, हें सर्वांना समजावें. पुनः एकदां पूर्वापर संदर्भ लक्षांत घेऊन रासपंचाध्यायींतील विषय समजावून घेऊं या.

पहिली गोष्ट अशी कीं, या कथेचा वक्ता आहे वैराग्यसंपन्न शुकमुनि आणि श्रोता आहे मृत्यूच्या दारांत पाऊल टाकलेला परीक्षित. अशांना शृंगारचेष्टितांच्या वर्णनांत रस तो कोणता? दुसरी गोष्ट अशी कीं, याच्याआधींच्या ( २८ व्या ) अध्यायांत वरुणाचा गर्व-परिहार करून तात नंदाला आणि गोपजनांना कृष्णानें आपलें स्वरूपदर्शन दिलें होतें. ज्या रूपाचें वर्णन भागवतकारांनीं 'सत्यं ज्ञानमनन्तं यद् ब्रह्मज्योतिः सनातनम् ।' अशा श्रुतिप्रणीत शब्दांत केलें आहे. यशोदेलाहि तें रूप पहावयास मिळालें होतें. उरल्या होत्या त्या गोपीच. त्यांच्या निरुपम प्रेमचें फळ त्यांच्या पदरांत टाकण्यासाठीं या प्रसंगाची योजना स्पष्ट स्पष्ट दिसते.

प्रत्यक्ष आख्यानाची सुरुवात 'भगवान्' या शब्दानें होते आणि 'योगमायां उपाश्रितः'-आपल्या अद्भुत, अचिंत्य योगमायेचा अवलंब करून रासाची आकांक्षा त्यानें मनांत आणली, असा श्रीशुकांनीं इशारा दिला आहे. श्रीकृष्णाचा योगेश्वर म्हणून उल्लेख पुनः २९.१६, २९.४२ आणि ३३.३ मध्यें आला आहे. या योगमायेच्या प्रभावानें जेवढ्या गोपी होत्या, तेवढीं रूपें श्रीकृष्णानें घेतलीं ( ३३.२० ). रासमंडळ रचल्यावर दोन दोन गोपींमध्यें कृष्णमूर्ति होतीच. श्रीकृष्णाच्या क्रीडावृत्तीला उपमा आहेत, त्या 'यथादिपुरुषो भजते मुमुक्षून्' ( २९.३० ) 'पुरुषः शक्तिभिर्यथा' ( ३२.१० ) अशा आध्यात्मिक स्वरूपाच्या. गोपी कृष्णाकडे धाव घेतात त्या 'संसृतेः भयात्' आणि त्याकडे बघतात ते तो 'अखिलदेहिनां अन्तरात्मदृक्' या दृष्टीनें. गोपींचा श्रीकृष्णाला प्रश्न आहे तो भक्तीचें इंगित समजण्यासाठीं व श्रीकृष्णाचें उत्तर आहे तें भक्तीचें मर्म सांगण्यासाठीं. आणि या क्रीडेसाठीं भागवतकार दृष्टान्त योजतात तो असा :

रेमे रमेशो व्रजसुंदरीभिः ।
यथाऽर्भकः स्वप्रतिबिंबविभ्रमः ॥ १०. ३३. १७

निरागस बालकानें आरशांतील स्वतःच्या प्रतिमेशीं खेळावें तसें !

हें सर्व पाहिल्यावर दोन प्रश्न उपस्थित होतात–ही रासक्रीडा हें एखादें रूपक समजावयाचें काय ? आणि एखाद्या आध्यात्मिक, गूढ अनुभूतीचें हें निवेदन असेल, तर शृंगाराचा आश्रय कवीनें कां केला ?

या प्रश्नाची चर्चा आजवर अनेकांनीं केली आहे. खुद्द भागवतांत याचा कांहीं खुलासा, कांहीं समर्थन करण्याचा प्रयत्न आहे ( १०.३३. २७-३२ ) भारताचार्य श्री. चिं. वि. वैद्यांनीं हा एक प्रक्षेपक भाग पण इष्टापत्ति म्हणून स्वीकारला आहे.[1] कांहींनीं कर्तुमकर्तुम् सामर्थ्य असणाऱ्या श्रीकृष्णाची ही लीला म्हणूनच त्याकडे पहावें[2], इंडियन पिनल कोडचे नियम[3], मानवी नीतिशास्त्राचे निकष त्याला लावूं नयेत, असा युक्तिवाद केला आहे.याहून एका वेगळ्या प्रकारें या रहस्याचा उलगडा होऊं शकतो. त्या प्रकाराचा परिचय वाचकांना व्हावा,हा पुढील विवेचनाचा हेतु आहे.

वृंदावनांतील गोपीजनांबरोबर केलेल्या या क्रीडेला तत्त्वज्ञानाची बैठक आहे आणि त्याला मानसशास्त्रीय आधारहि आहे. धर्मविषयक वा ईश्वरविषयक स्थिरभाव–स्थायी वृत्ति कशा बनत जातात, याचें हें चित्रण आहे; भगवद्-भक्तीचा उदय आणि क्रमशः तिला येणारी परिणत अवस्था याचें हें विवरण आहे आणि काव्यमय पार्श्वभूमीसाठीं प्रेमिकांच्या रोमांचकारी साहसाचा परिवेश त्यावर चढविला आहे, असे भारतीय संस्कृतीचे थोर भाष्यकार श्रीराधाकमल मुकर्जी यांचें प्रतिपादन आहे. त्यांनीं रासपंचाध्यायीला लिहिलेली विस्तृत प्रस्तावना व श्लोकाश्लोकावर दिलेल्या टीपा या प्रकरणाचा आशय उलगडून दाखवितात.[4]

१ श्रीमहाभारताचा उपसंहार – चिं. वि. वैद्य ( १९१८ ). पृ. ५७२.

२ रासलीलाकी महिमा–हनुमानप्रसाद पोद्दार–कल्याण–भागवतांक, १६.१–गोरखपूर.

३ श्रीमद्भागवतादर्श ( प्र. ५–श्रीकृष्णावतार)–य. त्र्यं. कोल्हटकर ( स. १९३१ ). पृ. ४१८–४३४.

4 The Lord of the Autumn Moon : by Radhakamal Mukerjee. Asia Publishing House, 1957.

तत्त्वज्ञानाच्या गहन चर्चेंत न गुंततां या प्रसंगाचें मर्म आकलन करण्याचा आणखी एक मार्ग आहे. त्यासाठीं हें लक्षांत घेतलें पाहिजे कीं, भागवत ग्रंथ केवळ एक पुराण, एक कथासंदोह नाहीं. त्यांत संत-महात्म्यांच्या साधनेचे विविध मार्ग नि विविध गूढ अनुभव ग्रथित केलेले आहेत आणि त्यांची प्रचीति अलीकडच्या कालातील संतजीवनावरून येऊं शकते. परमेश्वरप्राप्तीचा भक्ति—परमप्रेमस्वरूप भक्ति हा एक विशद मार्ग आहे. अखेर मानवाला परमेश्वराशीं संबंध कोणत्या ना कोणत्या तरी नात्यानेंच प्रस्थापित करावा लागतो. तें नातें पिता-पुत्राचें असेल, स्वामी-सेवकाचें असेल, बंधू-बंधूंचें असेल, सख्या-सुहृदांचें असेल किंवा पति-पत्नींचेंहि असेल. आणि या सर्व नात्यांत तन्मयतेचा, अद्वैताचा आनंद साधकाला लाभणार असेल, तर तो पति-पत्नींच्या नात्यांतच. भक्तिशास्त्राचें स्वानुभवानें निरूपण करणाऱ्या आचार्यांनीं शांत, दास्य, सख्य, वात्सल्य आणि मधुर हे पंचभाव या उपासनेंत वर्णन केले आहेत. प्रेम हाच त्या सर्व भावसाधनांचा पाया आहे. मात्र तें प्रेम श्रीरामकृष्ण सांगतात त्याप्रमाणें 'कामगंधशून्य' असलें पाहिजे. या भक्तिप्रवाहाला मधुराभक्ति असें नांव आहे. "सच्चिदानंद परमात्मा श्रीकृष्ण हेच एक पुरुष आणि जगांतील सर्व सूक्ष्म-स्थूल पदार्थ व जीव हे सर्व त्याच्या स्त्रिया, म्हणून शुद्ध व पवित्र होऊन, त्यांना पति समजून त्यांची उपासना केल्यास जीवाला मुक्ति आणि निरवच्छिन्न आनंदाचा लाभ मिळतो, हें चैतन्यप्रभूंनीं प्रचलित केलेल्या मधुरभावाचें सारतत्त्व आहे"[1] या मधुरभावसाधनेची मानसशास्त्रदृष्ट्या चिकित्साहि आधुनिक काळांतील अनेक तत्त्वशोधकांनीं केली आहे आणि साक्षात्कारी संतांनीं तिला पुष्टि दिली आहे. अगदीं अलीकडच्या काळांत श्रीरामकृष्णांनीं या मधुराभक्तीचा आचार करून दाखविला आणि अनुभवाच्या निकषावर तिची सत्यता पारखून घेतली. रासलीलेचा प्रसंग हा असा मधुराभक्तीचा—एका साधनामार्गाचा इतिहास आहे. आणि या मधुरभक्तिरसायनांत इतर प्रांतांतल्या संतभक्तांप्रमाणें महाराष्ट्रसंतहि रंगून निघालेले आहेत.[2] केवळ बुद्धिवादानें वा तर्कानें या प्रसंगाचा उलगडा होणार नाहीं. ब्रह्मविद्येंतील भक्तियोगशास्त्राचें आचरण करतांना येणाऱ्या अनुभवानेंच त्याचा आशय कळणार आहे.

---

१ श्रीरामकृष्णचरित्र, प्रथम भाग—कै. न. र. परांजपे. पृ. ३६६.

२ मधुराभक्ति—डॉ. प्र. न. जोशी. पृ. ६३-१०६.

मधुराभक्तीच्या प्रक्रियेचें हें वर्णन आहे असें मान्य केलें, तरी शृंगाराचा आश्रय करण्याची आवश्यकता होती काय, हा प्रश्न उरतोच. त्याला दोन प्रकारचीं उत्तरें आतांपर्यंत देण्यांत आलीं आहेत. शिवकल्याणांनीं दिलेलें उत्तर हा एक प्रकार—

जे शृंगाररसीं आसक्त। त्यांसि हाचि रस प्रस्तुत।
सेव्य असूनि त्यांचें चित्त। स्वनिष्ठ करावें ॥

स्वतः शिवकल्याण ही सारी रूपकात्मक रचना आहे, असें मानतात. कृष्णभक्तीची गोडी लावण्याचें हें एक साधन आहे व श्रीकृष्णानें मदनाला जिंकल्याचा हा प्रसंग आहे, असें कृष्णदयार्णव म्हणतात.* हें दुसरें उत्तर.

पण याला तिसरें उत्तर संभवतें तें हें कीं, ' द्वैतांतील अद्वैताचें—दोन मनांच्या मीलनाचें यथार्थ वर्णन, मानवांच्या अनुभवाच्या पातळीवरील दृष्टांतानें करावयाचें म्हटलें, तर पतिव्रतेच्या समर्पणवृत्तीवांचून अन्य दृष्टांतच नाहीं. ज्ञानेश्वरांचीहि हीच अडचण होती. ' मय्यर्पितमनोबुद्धिः ' (१२.१४) या गीताचरणावर निरूपण करतांना—

अर्जुना गा तो भक्तु। तोचि योगी तोचि मुक्तु।
तो वल्लभा मी कांतु। ऐसा पढिये ॥ ज्ञा. १२. १५६

हाच दृष्टांत त्यांना निवडावा लागला. शिवाय, मधुराभक्तिद्वारा येणारा अनुभव व मिळणारा आनंद हा वैषयिक आनंदाहून अगदींच निराळा आहे, वेगळया प्रतीचा व स्तराचा आहे, हें सांगायला संत-भक्त विसरले नाहींत. श्रीमद्भागवतांत वापरलेला ' काम ' वा ' रति ' हा शब्द शुद्ध आध्यात्मिक अर्थानें वापरला आहे, हें भीष्म-उद्धव-कुंती यांच्या स्तवनांत—प्रार्थनांत येणाऱ्या संदर्भावरून स्पष्ट आहे. गौतमीय तंत्रांत स्पष्टच म्हटलें आहे—

प्रेमैव गोपरामाणां काम इत्यगमत् प्रथाम्।
इत्युद्धवादयोऽप्येतं वाञ्छन्ति भगवत्प्रियाः ॥

* कृष्णक्रीडा हृदयीं थारे। तंव तंव बुद्धी विवेकें भरे। ह. व. ३३.६४
कंदर्प दाटला दर्पभ्रमें। तो येथ जिंकूनि रासक्रमें। ह. व. २९५८.

हाच आशय चैतन्यचरितामृतांतील पुढील चरणांत स्पष्ट झाला आहे—

निजेन्द्रिय - सुख - हेतु कामेर तात्पर्य ।
कृष्णसुख तात्पर्य गोपीभाव वर्य ॥

—सामान्य लोक ज्याला 'काम' म्हणतात, त्याचें पर्यवसान इन्द्रियसुखांत (आणि तेंहि क्षणिक व अखेर दुःखरूप ) आहे. याउलट गोपींचें प्रेम श्रेष्ठ दर्जाचें, वासनारहित, स्वतःला विसरून जाणारें व कृष्णमय बनण्यासाठीं होतें. *

खरी स्थिति अशी आहे कीं, प्राकृत वा सामान्य कवींना संयम राखतां आला नाहीं आणि अत्यंत उत्तान भाषेंत त्यांनीं ही कथा रंगवली. मुळांतील मीलनांतील सूचकता त्यांनीं घालविली; वाच्यार्थावर भर दिला आणि पाल्हाळानें कामुकतेला चेतावणी दिली.

अशा या अद्भुत प्रसंगानें नटलेल्या, उदात्तप्रेमाच्या माधुरीनें रसरसलेल्या आणि अध्यात्माचा मनोज्ञ ध्वनि असलेल्या रासलीलेवर भारतीय मन शतकानुशतकें भ्रमराप्रमाणें लुब्ध होऊन राहिलें असल्यास नवल तें काय ?

* याच संदर्भात श्री. य. त्र्यं. कोल्हटकर यांनीं मिसेस ॲनी बेझंट यांचें जें अवतरण दिलें आहे, तेंहि चिंतनीय आहे.— In all ages love between husband and wife has been the symbol of union between the supreme and his devotees. Where will you find a better image of the merging of the Soul in its God ? — श्रीमद्भागवतादर्श, पृ. ४३४.

* * *

# ९ : गृहस्थ झाला भगवंत

समाजव्यवस्थेचा आधार आणि कणा कोणता, असा प्रश्न विचारला, तर त्याचें एकच उत्तर द्यावें लागेल आणि तें म्हणजे 'गृहस्थाश्रम'. ब्रह्मचर्याश्रम ही गृहस्थाश्रमाची पूर्वतयारी आहे आणि वानप्रस्थ ही त्याची परिणति आहे. नव्या पिढीचा गृहस्थाश्रम चांगल्या तऱ्हेनें चालावा म्हणून वानप्रस्थाश्रमाची योजना आहे, तशीच ती संन्यासाश्रमाची पूर्वतयारी आहे. आणि हा चतुर्थाश्रम चतुर्विध पुरुषार्थांतील अखेरचा पुरुषार्थ जो 'मोक्ष' तो साधण्याचें साधन आहे. इहलोक व परलोक यांना जोडणारा दुवा म्हणजे संन्यासाश्रम! पण हे तिन्ही आश्रम ज्याच्या आधारें उभे रहातात तो म्हणजे गृहस्थाश्रमच. ही जाणीव भारतीय समाजशास्त्रज्ञांना चांगल्या प्रकारें होती व म्हणून तो आश्रम चांगल्या प्रकारें, सर्वांना पार पाडतां यावा म्हणून 'विविध आदर्श' हि रेखाटले गेले. सुभाषितकारानें म्हटलें आहे—

> **सानन्दं सदनं सुताश्च सुधियः कांता च सद्भाषिणी**
> **सन्मित्रं, सुधनं, स्वयोषिति रतिः, चाज्ञापराः सेवकाः।**
> **आतिथ्यं, शिवपूजनं प्रतिदिनं, मृष्टान्नपानं गृहे**
> **साधोः सङ्गमुपासते हि सततं, धन्यो गृहस्थाश्रमः॥**

[आनंदानें भरलेलें घर, सत्प्रवृत्त पुत्र, सद्भाषण करणारी पत्नी, सज्जन मित्र, पुरेसें धन, आपल्याच पत्नीच्या ठायीं रममाण होण्याची (अव्यभिचारी) वृत्ति, आज्ञाधारक सेवक, आतिथ्य, नित्य शिवपूजन, उत्तम अन्नपाणी आणि सदैव सत्संग यांनीं युक्त असा गृहस्थाश्रम धन्य होय.]

काम आणि अर्थ ह्या मानवी जीवनांतल्या खरें म्हणजे निसर्गदत्त प्रबल प्रेरणा. पण भारतीय समाजशास्त्रज्ञांनीं त्यांना 'पुरुषार्थां'त गणावें, ही एक आश्चर्य वाटावयास लावणारी घटना आहे. पण तसें करण्यांत एक चातुर्य आहे, दूरदृष्टि आहे.

निसर्गविरुद्ध जाऊन कोणतीच गोष्ट मनुष्याला करतां येत नाहीं. तेव्हां या 'निसर्गा' ला वा 'प्रकृती' लाच सुव्यवस्थित रूप देऊन, मर्यादेंत ठेवून कल्याण साधून घेण्याचा मार्ग शास्त्रज्ञांनीं काढला. कामवासना व संग्रह या जीवनाच्या सातत्यासाठीं आणि सुरक्षिततेसाठीं असलेल्या योजना आहेत. पण त्यांचा कौशल्यानें उपयोग करून त्यांतूनच मानवाचा विकास साधण्यासाठीं गृहस्थाश्रमाची योजना आहे. गृहस्थाश्रम हा साऱ्या संस्कृतीचा आरंभ आहे. ज्या क्षणीं आदिमानवानें छोटेंसें ' घरकुल ' निर्माण केलें, त्याच क्षणीं त्याच्या भटक्या जीवनाला विराम मिळाला; भिरभिरणाऱ्या प्रवृत्तीला स्थिरता येण्याला सुरुवात झाली; जीवनाच्या गतीला एक नवा केंद्रबिंदु मिळाला; मानव ' समाजशील ' बनण्याला आरंभ झाला; नवीं नातीं निर्माण झालीं आणि प्रत्येक नव्या नात्याबरोबर भावनांच्या नाना छटा अनुभवाला येऊं लागल्या. त्यांतून जीवनाचा नवा अर्थ–आशय प्रत्ययाला येऊं लागला. त्याची भावना, बुद्धि आणि कर्तृत्व यांना नवीं क्षितिजें खुलीं झालीं. त्यांना सखोलता येऊं लागली आणि त्यांची उंचीहि वाढूं लागली. ज्याप्रमाणें एका बाजूनें मानव भूगर्भात वा सागरहृदयांत खोल उडी मारूं लागला आणि दुसऱ्या बाजूनें हिमालयाच्या गगनभेदी शिखरांशीं स्पर्धा करीत सूर्यमंडळाला कवेंत घेण्यास अंतराळांत उड्डाण करूं लागला, तसाच तो अंतःसृष्टींत बुडी मारून वासना-भावनांचा तळ शोधूं लागला आणि दुसऱ्या बाजूनें, त्यांना उन्नत करून ' विश्वचि माझें घर ' या गोष्टी बोलूं लागला. अशा तऱ्हेनें ' घर ' हा मानवाच्या सामाजिक-सांस्कृतिक व आध्यात्मिक विकासाचा, भौतिक–अभौतिक विश्वांतील प्रगतीचा आरंभबिंदु ठरला.

मानवाला खऱ्या ' काव्या ' चा आस्वाद नि आनंद कोठें मिळत असेल, तर तो दोनच ठिकाणीं–निसर्गांत नि घरांत. निसर्ग नि घर हे दोन्ही काव्यप्रवाहांचे जिवंत झरे आहेत. विविध वसनांनीं विभूषित होऊन अरुणरंगाचे सडे शिंपीत येणारी उषा किंवा लक्षावधि तारकांच्या झगमगत्या बिंदूंनीं नील नभाच्या फलका-वर नाना रंगावलि काढणारी निशा, शिशिरांत शीर्ण-विदीर्ण झालेल्या या सृष्टींत पुन्हा नवकिसलयांची किमया फुलविणारा वसंत किंवा हिरवा चुडा, हिरवीं वसनें ल्यायलेल्या नववधूप्रमाणें लाजणाऱ्या धरणीवर सुवर्णाचा साज चढवून प्रौढ गृहिणीप्रमाणें तिला गौरवाचें स्थान देणारा हेमन्त, घोंघावणारा भेसूर वारा, हृदयांत धडकी भरविणारीं मेघगर्जितें आणि काळोखाचीं दाट आवरणें यांना

सांगाती घेऊन येणारी वर्षा किंवा धवल-शीतल चंदेरी रसांत साऱ्या वस्तुजाताला भिजवून आल्हादक प्रसन्नतेचा प्रसाद पसरविणारा शरद्–हीं आदिमानवाप्रमाणें आजहि मानवाला भयचकित करतात, क्षुब्ध करतात, स्तब्ध बनवितात, हर्षोत्फुल्ल करून नाचायला लावतात. चंद्रासाठीं बालरामानें घेतलेला हट्ट आजच्याहि प्रौढ मानवानें सोडलेला नाहीं !

आणि ' घरा ' चें काव्य ! कल्पना करा– आपल्याला जन्म देऊन स्वतः नामानिराळे होणारे विश्वामित्र वा अप्सरा ( अप्सरा – बाजूला सरणाऱ्या ) सर्वत्र दिसूं लागल्या, तर काय होईल ? नगरें आणि उद्यानें, भव्य प्रासाद आणि दिव्य मंदिरें घटोत्कचाच्या मायावी सृष्टीप्रमाणें क्षणांत विलुप्त तर होतीलच, पण प्रेम, स्नेह, दया, वात्सल्य, मैत्री, करुणा यांचा मागमूस तरी राहील का ? मानवानें घर निर्माण केलें, म्हणून ' शृंगार ' खुलला; ' हास्या 'च्या मुखावर स्मित झळकलें, ' वीर ' गर्जूं लागला; ' वत्सल ' अंगाईगीतें गाऊं लागला; ' भक्ति ' समर्पणाचीं गीतें आळवूं लागली. वाणी ' वसूनां संगमनी ' झाली. शारदेची वीणा झंकारूं लागली. ओसाडीचें नंदनवन झालें. वखवखल्या हृदयांत शांति-समाधीचा उल्हास नांदूं लागला आणि हें सारें पुनः पुनः घडत आहे. त्यांत नित्यनूतनता आहे. ' क्षणे क्षणे यन्नवतामुपैति, ' ही रमणीयतेची व्याख्या निसर्गाइतकीच घराला–घरांतील भावजीवनाला लागू पडते आणि या रमणीयतेच्या दर्शनानें प्राकृत प्रतिभा पालवते नि काव्याची कैलासलेणीं ती निर्माण करते. केशवसुतांच्या कवीप्रमाणें ' घर ' हि म्हणूं शकेल—

**आम्हांला वगळा–कलादि सगळे होतील निर्माल्यवत् ।**
**आम्हांला वगळा–बनाल सगळे कोल्हे तुम्ही जंगली ॥**

असें आहे हें घर नि गृहस्थाश्रम !

या गृहस्थाश्रमाचा आनंद प्रत्येकानें उपभोगावा, ही भारतीय संस्कृतीची एक दृष्टि आहे. भारतीय संस्कृति ऐहिकाकडे पाठ फिरवीत नाहीं; तशी मृत्यूच्या, नश्वरतेच्या विचारानें या संसाराच्या रमणीयतेवर कृष्णछाया पसरवून त्याला काळवंडूनहि टाकीत नाहीं. फक्त हा ' डाव ' केव्हां तरी संपायचा आहे, याची आठवण ठेवायला सांगते. क्रिकेटच्या खेळांत हातांत बॅट घेऊन खेळायला उतरलेला खेळाडू समोर आपला बळी घ्यायला उभ्या असलेल्या गोलंदाजाला पहात

असतो आणि घड्याळाचा कांटा अमुक ठिकाणीं येतांच खेळ थांबणार, हेंहि त्याला अनेकदां माहीत असतें. म्हणून काय तो आपलें क्रीडानैपुण्य दाखवायला कांकूं करतो? भारतीय संस्कृतीची दृष्टि नेमकी हीच आहे. म्हणून 'प्रपंच करावा नेटका' असें ती सांगते. पण सहस्र उपदेशांपेक्षां एक उदाहरण प्रभावी ठरतें, म्हणून तसे आदर्शहि रेखाटते. असाच एक आदर्श श्रीमद्भागवतांत आहे-स्वतः श्रीकृष्णाच्या गृहस्थाश्रमाचा!

प्रसंग असा कल्पिला आहे कीं, श्रीकृष्णानें 'नरकासुरा'चा वध केला. नरकासुरानें १६,१०८ राजकन्या बंदिवासांत ठेवल्या होत्या, त्या सर्वांची श्रीकृष्णानें मुक्तता केली. पण त्यांना आतां 'वाली' कोण? श्रीकृष्णाला त्या सर्वांनीं मनानें वरलें! आणि श्रीकृष्णानें त्यांची मनःकामना पूर्ण करण्याचें मान्य केलें. आपल्याच कन्येचें प्रथम पाणिग्रहण व्हावें, पहिल्या लग्नाचा सोहळा आपल्या मांडवांत व्हावा, ही प्रत्येक राजकन्येच्या पित्याची इच्छा! श्रीकृष्णानें तीहि मान्य केली. श्रीकृष्णानें 'योगमाये'नें अनंत रूपें धारण केल्याचे जे कांहीं मोजके अद्‌भुत प्रसंग श्रीमद्भागवतांत वर्णिले आहेत, त्यांपैकीं रासक्रीडेचा पहिला व हा दुसरा. त्या दोन्ही ठिकाणीं 'योगमाया' शब्दाचा उपयोग या घटनांचा कसा व काय अर्थ घ्यावयाचा, याचा सूचक आहे. त्यांत शिरण्याचें आपल्याला येथें कारण नाहीं. ही वार्ता 'अमरावती'स—इंद्रनगरीस पोहोंचली.

एकें कृष्णें अनेक कन्या। एके घटिकेंत विधिविधाना।
पृथक् पृथक् पाणिग्रहणा। करूनि वरल्या हें नवल॥

हरिवरदा ६९. २०

पण नारदमुनि म्हणजे साऱ्या मुलखाचे चौकस! ही भगवंताची लीला समजून घ्यायची त्यांना उत्कंठा लागली. विवाहमंगल झालें, ठीक झालें. पण पुढें प्रत्येकीची संसारयात्रा कशी काय चालते? प्रत्येकीचें घर निराळें होतें. श्रीकृष्णानें विलासी सम्राटाप्रमाणें १६,१०८ स्त्रियांची एका जनानखान्यांत खोगीरभरती करून हुजूर-पागा बनविली नव्हती. नारदांना कुतूहल वाटलें—'द्व्यष्टसाहस्रा सदनीं कैसा। एक्या शरीरें वर्तें सरिसा?' स्वारी तत्काळ अमरावतीहून द्वारावतीला वीणा छेडीत निघाली!

या अद्भुताच्या पार्श्वभूमीवर श्रीमद्भागवतकारांनीं ' गृहस्थ झाला भगवंत ! ' हा प्रसंग रेखाटून गृहस्थाश्रमांत जीवनाचा आनंद कसा उपभोगावा, ही ' जीवन-कला ' वर्णिली आहे. हें सारें सामान्यांना ' मोहरे ' लावण्यासाठीं—लोकसंग्रहार्थ ! याबद्दल श्रीव्यासांची भूमिका स्पष्ट आहे—

**ब्रह्मन् धर्मस्य वक्ताहं कर्ता तदनुमोदिता ।**
**तच्छिक्षयँल्लोकमिममास्थितः पुत्र मा खिदः ॥ १०.६९.४०**

श्रीकृष्णाचें तें ' मनुष्यनाट्य ' पाहून नारदाला संभ्रम निर्माण झाला. त्याचें समाधान करण्यासाठीं श्रीकृष्ण म्हणतो, वत्सा, कष्टी कां होतोस ?—

**मी धर्माचा संस्थापक । वक्ता कर्ता अनुमोदक ॥**
**धर्मसन्मार्गीं शिक्षी लोक । म्हणोनि सम्यक् आचरें पै ॥**
**हरिवरदा, ६९. ४९**

समाजनेत्यांवर, कुटुंबांतील कर्त्या पुरुषांवर, संस्थाचालकांवर फार मोठी जबाबदारी असते. केलेले नियम कसे पाळावे, केलेला कायदा कृतींत कसा आणावा, उपदेशिलेला धर्म कसा आचरावा, हें दाखविण्याचें उत्तरदायित्व त्यांच्या-वर असतें. ' यद्यदाचरति श्रेष्ठः तत्तदेवेतरे जनाः । ' हा मनुष्यस्वभावाचा नियम आहे. केवळ दुष्टांचें निर्दालन करून, परकीयांना हाकून लावून स्वधर्माची व स्वातंत्र्याची संस्थापना होत नसते. तो स्वधर्म विधायक रीतीनें प्रस्थापित करावा लागतो—आणि तोहि निष्ठेनें, श्रद्धेनें. म्हणून श्रीव्यासांनीं शब्द योजला आहे—

**इत्यर्थकामधर्मेषु कृष्णेन श्रद्धितात्मना ॥ १०. ६९. ४३**
**[ ऐशा प्रकारें कामधर्मार्थें । साधावयाचें परम आर्तें ।**
**दावी स्वदेही भगवंत । श्रद्धावंत होत्साता ॥ ह. व. ६९. ३६२ ]**

श्रीभगवंतांनीं दाखविलें तें केवळ धर्माचरणाचें, ' धर्माविरुद्ध कामोपभोगाचें ' नाटक नव्हतें —तो श्रद्धेचा आचार होता. धर्मसंस्थापनेच्या कार्याचेंच तें एक अविभाज्य भरीव अंग होतें.

नारदजींची स्वारी पर्वत, नद्या, मैदानें मागें टाकीत द्वारकेजवळ आली. नगरीच्या बाहेर ' सुस्वागतम् 'चे फलक नव्हते. पण कौशल्यपूर्ण रचना केलेलीं उपवनें, त्यांतल्या घनदाट राया, पुष्पांनीं डंवरलेले वेलींचे कुंज, सरोवरांतील हंस-

कारंडक स्वागताला सिद्ध होते. सुजल, सुफल असें तें स्नेहसिक्त स्वागत होतें. नगरींतल्या यदुवीरांच्या सरल, सरस व सुसंस्कृत हृदयाची व सोदार स्वागताची तें ग्वाही देत होतें.

नारदमहर्षींची स्वारी द्वारकेंत शिरली. सोळा हजार एकशें आठ 'बिन्हाडां'ना भेटी देण्याचा संकल्प मनाशीं केलेला होता. सारीं येथून तेथून कृष्ण-मंदिरेंच. कुठें तरी शिरावयाचें म्हणून एका प्रासादांत मुनींनीं प्रवेश केला. वाडा दासदासींनीं गजबजला होता. मुनींना परवान्याची गरज नव्हती. 'नारायण', 'नारायण' हाचा त्यांचा परवलीचा शब्द होता! जातां जातां कानांवर एवढेंच पडलें : 'श्रीकृष्णजींची स्वारी आतांच मृगयेहून परतली आहे.' नारदमुनींनीं अंतःपुरांत प्रवेश केला. हस्तिदंताच्या पलंगावर श्रीकृष्ण आराम करीत पडले होते. रुक्मिणीदेवी मोरपिसांच्या पंख्यानें वारा घालीत होत्या. मुनींना पाहतांच यदुराज पलंगावरून उठले. ऋषींना सामोरे गेले. ऋषींना आसन मिळालें. पाद्यपूजा झाली. 'काय सेवा करूं?' म्हणून विचारणा झाली. मुनींनीं पाहिलें, आतिथ्यभावना अजून जागी आहे, सुवर्णनगरी निर्माण केल्याच्या अहंकाराखालीं ती दडपली गेली नाहीं. मुनींना मागायचें कांहींच नव्हतें. उठले नि चालूं लागले. रुक्मिणीदेवीच्या पिंजऱ्यांत स्वारी अडकली आहे तर! सत्यभामेकडे जाऊन कलागत लावायला बरी संधि आहे, असा विचार मनांत आला असावा.

पुढच्या मंदिराचा रस्ता धरला. मंदिराच्या बाहेरच उद्यान होतें. श्रीकृष्णाची स्वारी हातांत पाण्याची झारी घेऊन झाडांना पाणी घालतांना दिसली. मुनि एका वृक्षामागें थबकले. सुवर्णचंपकाचीं फुलें खुडलेलीं त्यांना दिसलीं नि जवळच उभ्या असलेल्या सुवर्णलतिकेच्या केशकलापांत ती जाऊन बसली. मुनि मागच्या पावलीं परतले. पुढें सरकले. वाड्याच्या चौथ्या चौकांत आले. श्रीकृष्णजींची स्नानाची तयारी दिसली. यमुना-जलांत विहार करणाऱ्या या जलकेलिचतुराची जलक्रीडा काय पहावयाची, म्हणून नारदजी माघारीं फिरले. पुढच्या वाड्यांत प्रवेश केला.

वाड्यांत धूपाचा मंद सुगंध पसरला होता. चौकशी करतां समजलें, कृष्णजी प्राणायाम करून ध्यानस्थ बसले आहेत. समाधिभंग करणें बरें नव्हे, म्हणून पुढें गेले. वाड्यांत होमहवन सुरू होतें. धूम्रवलयें आकाशांत पसरत होतीं. सौधावर किंचित् कृष्णमेघ पसरल्याचा भास होत होता आणि मेघाच्या आगमनाच्या शंकेनें

मयूर नृत्य करीत होते. यज्ञांत कृष्णजींच्या शेजारी बसलेली धर्मपत्नी त्या मोराच्या संभ्रमानें स्मित करीत होती. तिची नजर चुकवून नारदजी बाहेर पडले. आतां काय दृष्टीस पडतें, म्हणून मनांत विचार करीत होते.

श्रीकृष्णजी धर्मकृत्य आटोपून सभामंडपांत जाण्याच्या तयारींत असावेत. पण दोन-तीन बालकांनीं त्यांना गराडा घातला होता. एकाला गुदगुल्या करून त्यांनीं हसविलें. दुसऱ्याचा गालगुच्चा घेऊन त्याला जवळ ओढलें. तितक्यांत एक अर्धांगिनी तेथें दाखल झाली. तिच्या कडेवरहि एक गोजिरवाणें अर्भक होतेंच. श्रीकृष्णानें त्याचें प्रेमभरानें चुंबन घेतलें. त्याच्या मातेचें हृदय धन्यतेनें कीं (कृष्ण-जींच्या मस्तकस्पर्शानें?) पुलकित झालें खरें. त्यांच्यांतील नर्म आलाप नारदजींना ऐकूं आला नाहीं. पण ती प्रौढा 'इश्श' सारखा कांहीं तरी अभिनय करीत खोट्या रागानें, पण हसऱ्या चेहऱ्यानें दूर गेलेली त्यांना दिसली. त्यांच्या रंगाचा बेरंग व्हायला नको, या विचारानें मुनिजींनीं मान नि पाय मागें फिरविले.

मुनि पुढल्या प्रासादांत प्रवेश करते झाले. भोजनाचा थाट होता. ब्राह्मणादि मंडळी पानावर होती. गृहिणीसह कृष्णजी पंक्तींत फिरत होते. आग्रह करीत होते. नारदांनीं विचार केला, 'ही आपत्ति आपणांवर नको!' मुनींनीं थोडी विश्रांति घेतली. पुनः 'हरिचर्या'-निरीक्षणाच्या कार्यक्रमाला सुरुवात झाली.

एका वाड्यांत प्रवेश केला. कळलें कीं, श्रीकृष्णजींचा 'स्वाध्याय' चालू आहे. ग्रंथपठनांत स्वारी मग्न आहे. दुसऱ्या ठिकाणीं समजलें, विद्वज्जनांसमवेत तत्त्व-चर्चा सुरू आहे. कोठें समजलें, अक्रूरादि यादववीरांसमवेत राजकारणाचीं खलबतें सुरू आहेत. एका ठिकाणीं समजलें, कांहीं शिल्पी-स्थापत्यविशारद आले आहेत. नवीन विहिरी, तलाव खोदावयाचे आहेत, मठ बांधावयाचे आहेत. नाना लोकोपयोगी कामांच्या योजनेवर विचारविनिमय सुरू आहे.

तेथून मुनिमहाराज पुढें निघाले. श्रीकृष्णजी अर्धांगीबरोबर हास्यविनोद करीत झोपाळ्यावर बसलेले त्यांना दिसले. हास्यविनोदाचा विषय 'झोपाळ्यावरचें' साजरें करण्यासंबंधीं असावा, असें त्या लज्जावतीच्या चेहऱ्यावरून दिसलें. नारदजी पुढें सरकले. तेथें सारीपाटाचा डाव रंगांत आला होता. डाव कृष्णजी अंगावर घेत होते. समोर जाण्याला मुनींचें मन घेईना. पुढच्या वाड्यांत शिरले.

तेथें समजलें, श्रीकृष्णजी अश्वशाळेंत–गजशाळेंत गेले आहेत. आतां चार शब्द बोलायला संधि सापडेल म्हणून नारदजी लगबगीनें तिकडे वळले. पण तेथें समजलें कीं, कृष्णजींची स्वारी व्यायाममंदिरांत गेली आहे.

दिवसभराच्या पायपिटीनें नारदजींचे पाय आतां बोलूं लागले होते. जवळच एक जलाशय दिसला. तेथें विसावा घ्यावा, संध्यावंदन करावें, म्हणून नारदजी चालूं लागले. तळ्यापाशीं येतांच त्यांना दिसलें तें अकल्पितच ! श्रीकृष्णजी तेथें पोहोण्यासाठीं आले होते ! मुनींना पाहतांच लगबगीनें ते तीरावर आले. त्यांनीं मुनींचे चरण धरले. वास्तविक नारदजीच श्रीकृष्णाचें चरणकमल धरण्यास अधीर झाले होते. कारण ती श्रीकृष्णाची दिनचर्या पाहून ते स्तिमित झाले होते. कोठें ललनेचा अनुनय, कोठें अपत्यांवर अनुग्रह, कोठें स्नेही जनांशीं नर्मविनोद, कोठें पुराणश्रवण, कोठें वेदांतचर्चा, केव्हां राजकारण, तर केव्हां धर्म-समाज-कारण–नाना रीती, नाना उपाय यांनीं ती श्रीकृष्णाची अर्थसाधना, कामसाधना नि धर्मसाधना पाहून ते दिपले होते. गृहजीवनाचा आनंद कसा लुटावा, रमणींना कसें रिझवावें, मित्रांना कसें सुखवावें, अनुयायांना कसें मार्गी लावावें आणि हें सारें अलिप्तपणें करून पुनः आत्मचिंतनीं कसें रंगावें, याचा वस्तुपाठ नारदजींनीं आज पाहिला होता. धन्यता पावलेला गृहस्थाश्रम त्यांनीं पाहिला आणि ‘ धन्य द्वारकापुरी, धन्य वसुंधरा ! ’ म्हणत वसुधेच्या वैभवाचा महिमा सुरलोकांत सांगण्यासाठीं त्यांनीं अमरावतीकडे प्रयाण केलें !

* * *

# १० : अवधूताचे चोवीस गुरु

श्रीदत्तात्रेयांनीं चोवीस गुरु केले होते, हें अनेकांच्या बोलण्यांत येतें. या गोष्टीचें मूळ श्रीमद्‌भागवतांत आहे. अकराव्या स्कंधांत श्रीकृष्णांनीं उद्धवाला जी 'अवधूतगीता' सांगितली आहे, त्यांत हा प्रसंग आला आहे. कालांतरानें 'अवधूत' व 'श्रीदत्तात्रेय' यांच्यांत अभेद मानला गेल्यानें अवधूतानें केलेले गुरु हे श्रीदत्तात्रेयांचे गुरु ठरले असावेत. संतश्रेष्ठ श्रीएकनाथमहाराज यांची एकादश स्कंधावरील टीका याच दृष्टिकोनांतून असल्यानें सामान्य भाविकांतील तो समज दृढावण्यास मदत झाली आहे. 'तो अवधूत जाण दत्तात्रेया।' (ए. भा. ९·२९) असें स्पष्टीकरणहि नाथांनीं केलें आहे. कांहीं कां असेना, पण हें अवधूताचें गुरुप्रकरण वरवर दिसावयाला कांहींसें रुक्ष व नीतिजड असलें, तरी कवीच्या चिंतनशीलतेचें तें द्योतक आहे. इतकेंच नव्हे तर भारतीय जीवनदृष्टीचा एक विशेष पैलूहि त्यांत आपल्याला पहावयास मिळतो.

माणसानें जीवनाकडे कसें बघावें? प्रश्न मोठा बिकट आहे. खरें म्हणजे जीवनाकडे व निसर्गाकडे अमुक तऱ्हेनें पहा, हें इतरांना सांगण्याचा तरी आपल्याला काय अधिकार आहे? जो तो आपल्या स्वभावधर्माप्रमाणें वा संस्कारांप्रमाणें पहातोच. या स्वभावधर्माप्रमाणें बघणाऱ्यांचे (शास्त्रज्ञांचा वर्ग वगळल्यास) दोन प्रमुख वर्ग दिसतात: एक सौंदर्यवादी कविकलावंतांचा आणि दुसरा बोधवादी चिंतकांचा. पंचभौतिक सृष्टि म्हणजे पंचेंद्रियांना मिळणारी आनंदाची नि सौंदर्याची अक्षय्य मेजवानी, असें मानणारे आणि आपला आनंद मुक्तपणें उधळणारे कवि अनेक आहेत. प्रा. वसंत बापट यांचे पुढील उद्‌गार त्याचे द्योतक व प्रातिनिधिक म्हणावयाला हरकत नाहीं. आपल्या 'केवळ सौंदर्य, केवळ आनंद' या गीतांत ते म्हणतात —

पांच नद्यांतून मनःसागरांत
आनन्दजलाचे पूर भरतात
पंचरंगांच्या या इंद्रधनुष्यांत
चित्तचंडोलही भरारी घेतात
पांच राजहंस माझ्या पालखीला
उचलती उंच आनन्दमयांत
कशाचा बोध ?
तात्पर्यशोध ?
जय शब्द स्पर्श रस रूप गंध
केवळ सौंदर्य, केवळ आनंद

असे सौंदर्यपिपासू आनंदयात्री जगांत अनेक होऊन गेले आहेत. साहित्याचीं व कलेचीं दालनें त्यांनीं उभाविलीं व सजविलीं आहेत आणि अनंत विश्वांतील अमर्याद आनंद सान्त इंद्रियांनीं लुटण्याची व साकार करण्याची एक गुरुकिल्ली त्यांनीं जगाला बहाल केली आहे. जीवनसाफल्य प्राप्त करण्याचा तो एक ' योग ' आहे.

पण या अनंत विश्वाच्या विराट्स्वरूपाकडे बघण्याचा दुसरा मार्ग असूंच नये, असें थोडेंच आहे ? कलेचा – निर्भेळ आनंदाचा पुरस्कार करणाऱ्यांना तो मान्य नसला म्हणून काय झालें ? तात्पर्यवादी म्हणून त्यांचा कुणी कितीहि अधिक्षेप करो, तो पंथ अनादि आहे व कदाचित् अनंत काल टिकणारहि असेल. कारण, मानवी प्रकृतीचें व प्रवृत्तीचें स्वरूप अचिन्त्य आहे. रवीन्द्रनाथ म्हणतात त्याप्रमाणें " Inscrutable are the ways of human nature ! "

व्यक्ति चिंतनशील बनली, सारासारविवेक करूं लागली आणि तत्त्वशोधनांत रमूं लागली कीं, ' तात्पर्यवादी ' बनते, असें म्हणायला हरकत नाहीं. अनुभवाचे सुवर्णकण गोळा करण्याचा तो एक छंद आहे. त्यांच्या ' झारेकरी ' दृष्टीला गवसतात ते सत्याचे कांहीं कण. कवि-कलावंतांनीं पाहिलेली असते ती फक्त त्याच कणांच्या सौंदर्याची झळाळी ! पण महाकवि या सत्यसौंदर्यांचा कौशल्यानें मिलाफ करतात. मग शेक्सपीअरसारख्या कवींना वृक्षपर्णांना जिभा फुटल्याचा नि अखंड वाहणाऱ्या निर्झरांच्या खळखळाटांत केवळ संगीतच नव्हे तर अनुभवाचे

ग्रंथ वाचावयास मिळाल्याचा आनंद होतो. इमर्सन, थोरो, वर्डस्वर्थ नि आपल्या-कडील रे. टिळक आदि लेखक-कलावंत या प्रवृत्तीचीं माणसें आहेत.

त्यांनीं निसर्गाचें नि जीवनाचें आगळें स्वरूप पाहिलें आणि त्याचा अन्वयार्थ वेगळ्या प्रकारें लावून आशय उलगडून दाखविला.

श्रीमद्भागवताचा कवि असाच तत्त्वशोधक आहे. जीवनाच्या विविध स्तरांवरील विविध घटना–मग त्या निसर्गातील असोत, मानवेतर प्राण्यांच्या वर्तनांतील असोत, कीं चैतन्याचें स्फुरण ज्यांच्या अन्तर्यामीं विशेष प्रगल्भपणें झालें आहे, अशा मानवांच्या जीवनांतील असोत—त्यानें साधकाच्या दृष्टीनें न्याहाळल्या आहेत. त्यांतूनच अवधूतगीतेचा अवतार झाला आहे. प्रपंचीं आसक्त झालेल्या मानवांना त्याग करणें फार अवघड जातें, ही उद्धवाची भीति व शंका आहे. " मी माझें वाढलें गाढ । तेणें मती झाली मूढ । " –अशा शब्दांत नाथांनीं उद्धवाची व्याकुळता व्यक्त केली आहे. त्यावर भगवंतांनीं त्याला दिलेला दिलासा मोठा उदात्त आहे. मानवाच्या बुद्धिसामर्थ्यावरील, मानवाच्या कर्तृत्वा-वरील कवीचा विश्वास त्यांत प्रगट झाला आहे. श्रीकृष्ण म्हणतात —

> **प्रायेण मनुजा लोके लोकतत्त्वविचक्षणाः ।**
> **समुद्धरन्ति ह्यात्मानमात्मनैवाशुभाशयात् ॥ ११. ७. १९**

नाथांचें या ओवीवरचें भाष्य मोठें सूचक व मार्मिक आहे. ' भूत संचारल्या-पाठीं । सुटती जल्पवादगोठी । ' अशी उद्धवाची जणूं गीतेंतल्या अर्जुनाप्रमाणें स्थिति झाली आहे. उद्धवाच्या मागें ' अहंमहिषासुर ' लागला आहे. त्याची ' झाडणी ' करायला श्रीकृष्णरूपी पंचाक्षरी निघाले आहेत.

> तेथ झाडणीलागी आतां । यदुअवधूतसंवादकथा ।
> **त्याचि मंत्रूनि मंत्राक्षता । होय झाडिता श्रीकृष्ण । ए. भा. ७. २०९**

अशा रीतीनें ' ज्ञानसाधन साधकां ' म्हणून अवधूतगीतेचा जन्म आहे. परमार्थसाधकानें कोणती शिदोरी बरोबर घ्यावी व ती कुणापासून मिळवावी, हें सुचविणें हेंच या ' अवधूतगीते 'चें प्रयोजन आहे.

एकदां यदु शिकारीसाठीं रानांत गेला होता. तेथें त्याला मुक्तपणें व निश्चित-पणें संचार करीत असलेला एक ' अवधूत ' ब्राह्मण आढळला. तो ' अकुतोभय '

होता, 'तरुण' होता व 'कवि' होता, असें श्रीव्यासांनीं त्याचें वर्णन केलें आहें. पुढें यदूच्या मुखांतून त्याचें वर्णन—

> त्वं तु कल्पः कविर्दक्षः सुभगोऽमृतभाषणः ।
> न कर्ता नेहसे किञ्चिज्जडोन्मत्तपिशाचवत् ॥ ११. ७. २८

असें केलें आहे. सर्व कांहीं ज्यानें झटकून टाकलें आहे तो 'अवधूत'. 'अहं धुईतो अवधूत' अशी नाथांची त्या संज्ञेवरची मल्लीनाथी ! 'निजानंदें निवाला । अंतरीं शीतल झाला ।' मग तो अकुतोभय कां होऊं नये ? 'आनन्दं ब्रह्मणो विद्वान् न बिभेति कदाचन ।' अशी श्रुति आहेच. तो 'चिरतरुण' दिसत होता, याला नाथांनीं दिलेलें कारणहि मोठें मार्मिक आहे. "नीच नवा बोधु मैळों नेणें । भोगिजे नित्यनूतनपणें । परमतारुण्यें टवटवला ॥" ज्ञान सदैव ताजें असतें, नित्यनूतन स्वरूपांत तें स्फुरतें. ज्ञानाच्या नित्यनवेपणानें ज्ञात्याच्या मुखावरहि तारुण्याची नव्हाळी दिसावी, यांत विशेष तें काय ?

अवधूताला यदूनें त्याच्या या सदासावध-निजरूपांत निःसंगपणें विहार करतां येण्याचें इंगित विचारलें. सामान्यतः मानवप्राणी हा धर्मार्थकाम या त्रिविध पुरुषार्थांच्या प्रेरणेनें कार्यमग्न होऊन 'आयुः, यशः व श्री' यांच्या अभिवृद्ध्यर्थ धडपडत असतो; पण हा पुरुष मात्र 'अकर्तुः सुविशारदा बुद्धि' असलेला विद्वान् असून बालकाप्रमाणें हिंडत होता. ('तूं बाला ऐसा वर्तसी । परी बालबुद्धी नाहीं तुजपासी ।'–एकनाथ) 'बाल्येन तिष्ठासेत्' या श्रुतिवचना-प्रमाणें तो वागत होता. यदूला तें मोठें कोडें होतें. आपल्या 'आत्मानंदकारणा'चें कारण त्या अवधूतानें जें सांगितलें, तीच अवधूत-गीता.

त्या अवधूताला ती विवेकस्थिति सहजासहजीं मिळालेली नव्हती. ती मिळवण्या-साठीं त्यानें प्रयत्न केला होता. मुख्य म्हणजे त्यानें अनेकांना 'गुरु' केलें होतें. 'जो जो सद्गुण म्यां देखिजे भूतीं । तें ते स्थिती तो गुरु ॥' हें आहे त्याचें सूत्र.

अवधूताच्या चोवीस गुरूंची आचार्य विनोबांनीं आपल्या विश्लेषक बुद्धीनें चटकन् तीन वर्गांत विभागणी करून टाकली आहे.* सृष्टि-गुरु, प्राणि-गुरु व

---

* 'भागवतधर्मसार' – 'गुरुबोध', पृ. १५–१९.

मानव-गुरु अशी ही गुरुत्रयी आहे. सृष्टि-गुरूंत पृथ्वी आणि आकाश, नदी आणि सागर, पर्वत आणि वृक्ष, अग्नि आणि वायु, सूर्य आणि चंद्र या निसर्गाच्या विभूति आहेत. त्यांत प्राणाची भर घातली की निसर्गांतील अकरा गुरूंची यादी पुरी होते.

प्राण्यांमध्यें पारवा व कुरर हे पक्षी, अजगर नि सर्प हे सरपटणारे प्राणी, आमिषांना फसणारे हरिण व मासा, मधुसंचय करणारीं मधुकर नि मधुमक्षिका आपल्याच देहांतून तंतु उत्पन्न करून पुनः ते गिळून टाकणारा कोळी, भिंगुरटीचें रूप पावणारा कीटक आणि हस्तिनींच्या आसक्तीनें जीवाला मुकणारा हत्ती – हे प्राणि-सृष्टींतले गुरु आहेत.

मानवगुरूंत पिंगला नामक एक वेश्या, एकच कंकण धारण करणारी कुमारी, एकाग्रवृत्तीनें काम करणारा बाणकार आणि मानापमानांची पर्वा न करतां आत्मरत–आत्मक्रीड फिरणारें बालक—हे मानवी गुरु अवधूतानें वर्णिले आहेत.

या तिन्ही गटांतील व्यक्ति व प्रसंग यांची मांडणी व विस्तार मूळ भागवतांत वेगवेगळ्या प्रकारें केलेली आहेत. कपोतीचें व पिंगलेचें आख्यान खूप विस्तारानें वर्णिलें आहे. जरा सूक्ष्मतेनें पाहिलें, तर या 'शिकवणुकी'चें स्वरूप दुहेरी आहे: भावरूप व अभावरूप. कुणासारखें वागावें, हा एक बोधप्रकार. इतरांच्या कोणत्या चुका टाळाव्यात व कुणासारखें वागूं नये, हा दुसरा प्रकार. इतरांच्या अनुकरणानें त्यांच्या वागण्यांतल्या वृत्तींतला गुण संपादून आपलें जीवन समृद्ध करणें ही जशी एक कला आहे, तशीच इतरांच्या अनुभवानें शहाणे होणें, त्यांनीं केलेले प्रमाद टाळणें, हीहि एक कला आहे.

मानवानें एकदां शिकावयाचें ठरविलें, तर त्यासाठीं त्याला अनंत गुरु भेटतात, हें या अवधूतगीतेचें सार दिसतें. निसर्गांतील भव्य विभूति या भारतीय मनाला नेहमींच आकृष्ट करीत आल्या आहेत. भारतीय तत्त्वविचार हा निसर्ग-सांनिध्यांतच विकसित झाला आहे. वाल्मीकि–कालिदास आदींनीं निसर्गाचा उपयोग उपमादृष्टान्तांसाठीं कुशलतेनें केला आहे खरा; पण श्रीव्यासांची आणि त्यांची दृष्टि एका परीनें सारखीच आहे.

समुद्र इव गांभीर्ये धैर्ये च हिमवानिव ।

असें श्रीरामाचें वर्णन करणारे वाल्मीकि आणि—

मुनिः प्रसन्नगम्भीरो दुर्विगाह्यो दुरत्ययः ।
अनन्तपारो ह्यक्षोभ्यः स्तिमितोद इवार्णवः ॥

असें म्हणणारे व्यास दोघेहि निसर्गांतील भव्य विभूतींचें गुणवैभवच सांगत नाहींत काय? पण निसर्गांतील भव्य विभूतींप्रमाणें कोळी-कीटकहि कवीच्या नजरेंतून सुटलेले नाहींत, हेंहि लक्षांत घेण्याजोगें आहे. तसेंच त्यांत गीतमुग्ध होणारें भोळें-भाबडें हरिण आहे, तसाच शक्तिशाली गजराजहि आहे. जशा निसर्ग-व्यवहारांतून, तशाच लोकव्यवहारांतूनहि मार्मिक निरीक्षणानें अनेक गोष्टी शिकतां येतात, हें मानवी गुरूंच्या निवेदनांतून सुचविलें आहे. हा सारा 'शिकवणुकी'चा प्रकार कुणाला 'नीतिपाठा'चा वाटेल, पण दुसऱ्या एक दृष्टीनें त्याला 'गुणग्रहणाची दृष्टि' असेंहि नाहीं का म्हणतां येणार? कुणी नीतिपाठ म्हणून हिणवलें काय किंवा कुणी गुणग्रहण म्हणून गौरविलें काय, परमार्थसाधकाला त्याची काय पर्वा!

अवधूताची नानाविध गुरु करण्याची रीत, त्या त्या पदार्थांपासून 'थोडाही गुण मिळतां घ्यावा' ही प्रवृत्ति, व्यासमुनींचें निसर्गव्यवहाराचें व मानवी जीवनाचें सूक्ष्म निरीक्षण–या साऱ्याच गोष्टी मोठ्या उद्बोधक नि रंजक आहेत. पण त्याहिपेक्षां अवधूताच्या तोंडीं अखेरीस घातलेला व अवधूतगीतेपूर्वींहि आलेला एक विचार अतिशय उदात्त आहे. मानवी देहाची महती भारतीय संस्कृति फार मानते. अवधूत म्हणतो —

सृष्ट्वा पुराणि विविधान्यजयात्मशक्त्या
वृक्षान् सरीसृपपशून् खगदंशमत्स्यान् ।
तैस्तैरतुष्टहृदयः पुरुषं विधाय
ब्रह्मावलोकधिषणं मुदमाप देवः ॥ ११.९.२८

परमात्म्यानें अनेक भूचर, खेचर आणि जलचर प्राणी निर्माण केले. त्यांत वृक्ष होते, सर्प होते, त्यांत पशु-पक्षी होते आणि कासव-मासेहि होते. परंतु भगवंत 'अतुष्ट-हृदय'च राहिले. आणि मग त्यांनीं मानवप्राणी निर्माण केला व त्यांच्या प्रतिभेल कृतार्थतेचें समाधान लाभलें. 'देखोनि मनुष्यदेहासी। सुख झालें भगवंतासी।'

आणि त्याचें कारण परब्रह्माचें—विश्वाच्या रहस्याचें आकलन करण्याचें सामर्थ्य या मानवांतच आहे. जणूं ज्याला आपण निर्मिलें, त्यानें आपणांस ओळखावें, त्यानें गावें, नाचावें आणि त्या कीर्तनरंगीं आपणहि रंगावें, अशी स्पृहा त्या लीलाविश्वंभराच्या चित्तांत निर्माण झाली होती. भारतीय संस्कृति नरदेह हें परमोत्कर्षाचें साधन मानते. तें साधन एवढें प्रभावी आहे कीं, त्यामुळें 'याचि देहीं, याचि डोळां' मुक्तीचा सोहळाहि अनुभवतां येतो.

अवधूतानें अनेक गुरु केले, पण शेवटीं स्वतःचा देह हाच गुरु मानला आहे. 'देहो गुरुर्मम विरक्ति-विवेक-हेतुः ।' मानवाला लाभलेल्या, त्याच्या देहाच्या आश्रयानें राहणाऱ्या विवेचकबुद्धीनेंच मानवाला श्रेय-प्रेय, सार-निःसार आणि अमर-नश्वर यांतला भेद समजतो आणि जें शाश्वत आहे, चिरंतन आहे, श्रेयस्कर आहे, त्याची निवड व प्राप्ति करतां येते. देहाचें हें श्रेष्ठत्व जाणूनच नाथांनीं म्हटलें आहे : 'देव वांछिती मनुष्यपण !'

'गुरुबिन कौन बतावे वाट' हें व्यवहारांत आणि विशेषतः परमार्थाच्या गर्दुम नि गूढ मार्गांत खरें असलें, तरी अखेर 'ज्याचा तो स्वतःचा गुरु !'—

आत्मनो गुरुरात्मैव पुरुषस्य विशेषतः ।
यत्प्रत्यक्षानुमानाभ्यां श्रेयोऽसावनुविन्दते ॥ ११. ७. २०

हा श्रीव्यासांचा विचार आम्हांस विशेष श्रेष्ठ वाटतो. कारण त्यांत मानवाच्या प्रज्ञेवर गाढ विश्वास व्यक्त झाला आहे. गीतेंतील 'उद्धरेदात्मनात्मानं' या श्लोकाची आठवण येथें सहज होईल. पण त्यांतील उपदेशापेक्षां हा श्लोक अधिक सारगर्भ व सामर्थ्यशाली वाटतो.

गुरुपूजनाच्या मागें भारतीय संस्कृतीची एक विशिष्ट विचारधारा आहे, एक जीवनमूल्य आहे. तें म्हणजे कृतज्ञताबुद्धि. ज्या कोणापासून काहीं घेतलें असेल, त्याचें तें ऋण मान्य करणें. त्यामुळें अहंकाराची बाधा होत नाहीं; कर्तृत्वाचा दर्प चढत नाहीं. म्हणूनच यदूच्या प्रश्नाला अवधूतानें उत्तरें द्यावयाला सुरुवात केली, त्या वेळीं त्याची वृत्ति 'प्रश्रयावनत'—विनम्र व विनीत होती, हें सांगायला श्रीव्यासमुनि विसरले नाहींत !

* * *

# ११ : भागवताचें रसमाधुर्य

" भागवतानें ज्याच्या मनाची पकड घेतलेली नाहीं, ज्याच्या चित्ताला रिझविलें, रमविलें आणि शमविलें नाहीं, असा कोण भक्त या उभ्या भारतांत झाला असेल ? भट्टाद्रि, पोतना, शंकरदेव, चैतन्य, वल्लभ, जगन्नाथदास, सूरदास, एकनाथ हे तर भागवताचे प्रत्यक्ष पाईकच. पण इतरहि जे असंख्य संत आणि महंत भारतांत झाले, ते सर्व भागवताच्या मोहिनीनें मुग्ध झालेले आहेत; मग ते अशिक्षित आणि खेडवळ का असेनात ? केरळ, काश्मिर आणि कामरूप या त्रिकोणांत जो सापडला, तो भागवतांतून निसटूं शकला नाहीं;...जिथून कोणीच निसटूं शकला नाहीं, तिथून मी तरी कसा निसटणार ? " *

आधुनिक भारतांतील एका परमज्ञानी, अत्यंत विरागी, नितांत कनवाळू आणि अध्यात्म व विज्ञान यांची समतोलबुद्धीनें उपासना व्हावी म्हणून शिकवण देणाऱ्या संतानें वरील शब्दांत भारतीय जनमानसावरील श्रीमद्‌भागवताचा प्रभाव संक्षेपानें पण साकल्यानें वर्णन केला आहे.

भारतांतील पुराणग्रंथ ही कांहीं एक वेगळीच ग्रंथसंपदा आहे. भारताचा तो एक मोठा सांस्कृतिक वारसा आहे. एका अर्थानें प्राचीन समाजाचे ते 'विश्वकोश' आहेत. पुराणांचें—पुराणरचनेचेंहि पुढें पुढें एक 'शास्त्र' म्हणजे सुव्यवस्थित रचनेचें तंत्र निर्माण झालें. पुराण म्हटलें कीं त्यांत विश्वाची उत्पत्ति, स्थिति नि लय यांचें वर्णन असावयाचें. चतुर्दश भुवनांचीं वर्णनें असावयाचीं. राजांच्या वंशावळी असायच्या; राजनीति-दंडनीतिद्वारा समाजधर्माचें नि वर्णाश्रमवर्णनद्वारा व्यक्तिधर्माचें विवेचन असायचें. पण प्रत्येक पुराणाचा केंद्रबिंदु कोणती ना कोणती देवता आहे—ती श्रीविष्णु असेल, श्रीशिव असेल, श्रीजगदंबा असेल वा श्रीगणेश असेल. त्या देवतेचें ऐश्वर्य, विभूति नि महिमा, तिचें कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुम्

* 'भागवतधर्मसार' ( प्रस्तावना ) : आचार्य विनोबा.

सामर्थ्य वर्णन करणें आणि तिच्याविषयीं भक्ति निर्माण करणें हाच त्यांचा मुख्य हेतु होता. पुराणांत अनेकदा कल्पनांचा अतिरेक, विचारांचा एकांतिकपणा, सत्यासत्याची सरमिसळ आढळेल; त्यामुळें त्यांना ' भाकडकथा ' म्हणण्याकडे आधुनिकांचा कल होतो. पण ज्यांनीं तीं रचलीं, श्रवण केलीं नि जतन केलीं, त्यांच्या मनांत त्यांच्या सत्यतेविषयीं भ्रम नव्हते. जें उपयुक्त ठरतें, जीवनाची धारणा करून तें टिकवतें नि तें पुढें नेतें, तें ' सत्य ' तेवढ्या कालापुरतें नि त्या समाजापुरतें, ही जर आजच्या फलप्रामाण्यवादी तत्त्वमीमांसेची ( प्रॅग्मॅटिझम ) कसोटी पुराणांना लावली, तर त्यांतील ' अर्थवाद ' वगळतां ( आणि तो वगळावा हें तत्कालीनांना ज्ञात होतें ) पुराणें त्या त्या काळांत त्या त्या सांप्रदायिकांस सत्यच वाटत. समाजाला धर्म, नीति व सदाचार यांची शिकवण त्यांनीं दिली; धैर्य, त्याग, तितिक्षा, औदार्य नि स्नेह यांचे आदर्श पुरवले आणि मानवी मर्यादेचें स्वरूप सांगून व विश्वशक्तीपुढें नम्र होऊन आपणहि ' विश्वात्मक ' बनण्याची प्रेरणा दिली. त्यांनीं समाजाला उन्नत केलें. सर्वसामान्य जनतेचे वेद, उपनिषदें, गीता, म्हणजे पुराणेंच. सामान्य बालबुद्धीला समजेल, त्यांना रुचि वाटेल, त्यांच्या कल्पनेला पंख फुटतील आणि त्यांच्या कामक्रोधादि विकारांचा उपशम होईल, उन्नयन होईल, अशा पद्धतीनें त्यांच्या जीवनाचीं कोडीं सोडविण्याचा त्यांनीं प्रयत्न केला आणि त्यांना समाधान मिळवून दिलें. आख्यायिका, दंतकथा, इतिहास नि चरित्रें यांना काव्यमय रूप देऊन पुराणांनीं त्या त्या कालांत उत्कृष्ट सेवा बजावली. श्रीमद्‌भागवतांत पुराणांचीं जीं विसर्ग, स्थान, पोषण, आदि लक्षणें सांगितलीं आहेत, त्यांचा अर्थ पाहिला म्हणजे पुराणें हीं परमात्म्याच्या संकल्पानें निर्माण झालेल्या विश्वाचें व विश्वपालनकर्त्या विश्वेश्वराच्या वैभवाचें वर्णन करण्यासाठीं आणि जीवाला कर्मवासनांच्या चक्रांतून मुक्त करून प्रेममय परमात्म्याच्या सान्निध्याचा, सामीप्य-सायुज्याचा मार्ग दाखविण्यासाठीं निर्माण झालीं होतीं, हें स्पष्ट दिसतें. उपनिषदांत पुराणांना पांचवा वेद म्हटलें आहे, तें बहुधा याच हेतूनें असावें.

रामायण, महाभारत नि श्रीमद्‌भागवत ही भारतीयांच्या जीवनाची त्रिपदा गायत्री-प्रेरक शक्ति आहे. रामायण हें राष्ट्रीय काव्य, महाभारत हा राष्ट्रीय इतिहास, तर श्रीमद्‌भागवत हा राष्ट्रीय धर्मग्रंथ होय. सर्व राष्ट्राच्या आकांक्षा ज्यांत प्रगटतात आणि सर्व राष्ट्राच्या गरजांची जें तृप्ति करतें, जें राष्ट्राचा

भूतकाल सांगतें, वर्तमान घडवितें आणि भविष्याचा मार्ग दाखवितें, तें 'राष्ट्रीय'–अशी जर राष्ट्रीयत्वाची व्यापक व्याख्या केली, तर ती या तिन्ही महान् ग्रंथांना यथार्थपणें लागू पडते. हे तिन्ही ग्रंथ भारताच्या भिन्नभिन्न-भाषी प्रदेशांत सारख्याच आवडीनें वाचले गेले, ऐकले गेले नि नव्या साहित्याचे स्फूर्तिदाते ठरले. त्यांनीं भारतीयांचीं चित्तें नि चरित्रें घडवलीं, तशींच तीं समान आदर्श नि परंपरा देऊन एकत्र जडवलीं. हे तिन्ही ग्रंथ भारतीयांच्या 'एकराष्ट्रीयत्वा'च्या नसले, तरी भावनात्मक एकतेच्या दृष्टीनें मोठे तारक नि प्रेरक ठरले आहेत.

श्रीमद्भागवताला राष्ट्रीय धर्मग्रंथ म्हण्याचें मुख्य कारण असें कीं, ज्या वेळीं कर्मकांड वाढलें, नाना संप्रदाय निर्माण झाले, देवतांच्या नांवाखालीं थोतांडहि माजलें आणि कदाचित् या सर्वाला विटून व अन्य कारणांनीं पाखंडहि पसरूं लागलें, त्या वेळीं सर्वांना सुलभ, सुगम व समान असा 'विशुद्ध भक्तिपंथ' निर्माण करण्याचें काम या ग्रंथानें करून धार्मिक क्षेत्रांतलें अराजक संपुष्टांत आणण्याचें कार्य केलें. सर्वांना एका भागवत धर्माच्या ध्वजाखालीं गोळा केलें. तामिळनाडमधील अलवार आणि आचार्य, महाराष्ट्रांतील वारकरी संत, गुजरात, राजस्थान, बंगाल नि बिहार यांतील वैष्णव संत मध्ययुगापासून आजपर्यंत देश, वेश, जात-पात सर्व विसरून एकच भाषा बोलत आले आहेत–ती भाषा हृदयाची नि हृदयाला कळणारी आहे.

श्रीमद्भागवताचे सप्ताह गुजराथ, महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, बंगाल आणि केरळ व तामिलनाड या सर्व प्रदेशांत आजहि होतात. त्याच्या आधारें कथाकीर्तनें होतात. महाराष्ट्राचे पुराणिक गुजरातींत भागवत सांगतात आणि गुर्जर संत महाराष्ट्रांत येऊन डाकोरजीचा महिमा गातात. भारतीय संविधानानें भारताला राजकीय दृष्ट्या एकराष्ट्रीयत्व देण्याचा प्रयत्न चालविला आहे, तो अजून तरी सफल झालेला नाहीं. पण सांस्कृतिक दृष्ट्या भारत एकसंध राखण्याचें कार्य या धर्मग्रंथानें कित्येक शतकें केलें होतें, हें विसरतां येणार नाहीं. या खोलवर रुजलेल्या सांस्कृतिक वारशाच्या एकात्मतेवर श्रद्धा ठेवूनच भारत कदाचित् एकराष्ट्र बनण्याची शक्यता वाटते.

श्रीमद्भागवताचा विषय काय आहे, तें त्या महाकवीनें प्रथम स्कंधाच्या प्रारंभींच सांगितलें आहे—

धर्मः प्रोज्झितकैतवोऽत्र परमो निर्मत्सराणां सतां ।
वेद्यं वास्तवमत्र वस्तु शिवदं तापत्रयोन्मूलनम् ॥
निगमकल्पतरोर्गलितं फलं शुकमुखादमृतद्रवसंयुतम् । १.१.२-३

— येथें धर्मकथन आहे, पण त्यांत कपट, कैतव–फसवणूक नाहीं, गुप्तता नाहीं. तो निर्मत्सरी सज्जनांचा धर्म आहे. धर्म नि सत्पुरुष कुणाचा मत्सर–द्वेष करीत नाहीं. विश्वांत जाणून घ्यावयाची सत्यवस्तु कोणती, याचें वर्णन येथें आहे आणि ती वस्तु 'शिव-द' म्हणजे 'विश्वमंगलकारक' आहे. तापत्रयाचा नाश करण्याचें सामर्थ्य तिच्यांत आहे......वेदरूपी कल्पवृक्षाचें फल म्हणजे हा ग्रंथ.

पण हा वेदाप्रमाणें गूढ, अनाकलनीय, विद्वज्जनांनाच उमजणारा असा नाहीं. 'अमृताच्या पुत्रांना'–मानवांना आस्वाद घेतां येईल, अशा अमृतरसानें हा ओथंबलेला आहे. भागवताचा कवि आवाहन करतो तें केवळ मुमुक्षूंना–संसाराला विटलेल्यांना नव्हे, तर रसिकांना, आ-लयं–पृथ्वीच्या अंतापर्यंत अथवा भावसमाधि लागेपर्यंत त्याचा आकंठ आस्वाद घेण्यासाठीं. तें प्राशून कधीं कंटाळा येणार नाहीं. कारण प्रत्येक वेळीं जाणवेल ती त्याची नित्यनूतनता. म्हणून तो म्हणतो—

पिबत भागवतं रसमालयम् मुहुरहो रसिका भुवि भावुकाः ॥ १.१.३

रामायण–महाभारतांच्याप्रमाणेंच श्रीमद्भागवताच्या नित्यनूतनतेमुळेंच हें काव्य जिवंत राहिलें. किती संतांनीं, भक्तांनीं नि कवींनीं या ग्रंथांतील व्यक्तींचा आश्रय करून आपल्या आर्त हृदयाची वेदना आणि समाधानाचा आनंद आजवर व्यक्त केला आणि त्याचें चिरयौवन आणि 'नवता' धारण करण्याचें सामर्थ्य जिवंत ठेवलें, त्याला गणतीच नाहीं.

तत्त्वज्ञानाचें कार्य माणसाला मृत्यूला शांतपणें व धीरानें तोंड देण्यास समर्थ बनविणें होय, असें कुणी तरी तत्त्ववेत्ता म्हणाला आहे. श्रीमद्भागवताच्या अवताराचें एक प्रयोजन तेंच आहे. शमीकऋषींच्या पुत्राच्या शापामुळें परीक्षित आपल्या जीवनाचीं घटकापळें मोजीत असतांनाच श्रीशुकमुनि त्याच्या प्रायोपवेशनस्थळीं आले व 'भगवति अनन्ते रतिः' जडावी म्हणून श्रीकृष्णचरित्र व त्याचे अवतार यांचें त्यांनीं वर्णन केलें (१. १९. १६). दुसरें अवतारप्रयोजन

नारद-व्यास-संवादांत स्पष्टपणें प्रकट झालें आहे. " भारताच्या निमित्तानें प्रत्यक्ष वेदाचेंच विवरण आपण केलें; त्या ग्रंथापासून स्त्री-शूद्रांना देखील धर्मज्ञान प्राप्त झालें, तरी पण मनाला समाधान वाटत नाहीं. ' तथापि नात्मा परितुष्यते मे । ' " ( १.५.५ ) अशी आपली व्यथा व्यासांनीं नारदमुनींजवळ व्यक्त केली असतां, त्याला नारदांनीं दिलेलें उत्तर लक्षांत घेण्याजोगें आहे—

**नैष्कर्म्यमप्यच्युतभाववर्जितं न शोभते ज्ञानमलं निरञ्जनम् । १. ५. १२**

भगवन्ताविषयीं भक्ति-प्रेमा नसलेले, केवळ नैष्कर्म्याची सिद्धि करून देणारें तें ज्ञान विमल असूनहि शोभत नाहीं; पुरेसें पडत नाहीं. याचाच अर्थ असा कीं, मानवाच्या संपूर्ण विकासासाठीं बुद्धीप्रमाणेंच भावनांचाहि विकास आवश्यक आहे. केवळ तार्किक बुद्धि प्रगल्भ होऊन पुरी पडत नाहीं; हृदयधर्मांचाहि विकास झाला पाहिजे. अमूर्त, अव्यक्त ब्रह्माच्या शोधाबरोबर परमेश्वरशक्तीनें निर्माण झालेल्या ह्या व्यक्त, सगुण, रूपगोचर भौतिक व मानवी सृष्टींतहि रस घेतां आला पाहिजे. व्यक्तित्वाचा हा समतोल विकास साधणें हेंच श्रीमद्भागवताच्या अवताराचें प्रयोजन या व्यास-नारद-संवादांतून सूचित होतें आहे. हाच आशय प्रश्नोत्तरपुराणांत नारदाला वृंदावनांत दोन जरठांपाशीं शोकमग्न स्थितींत आढळलेल्या तरुणीच्या रूपकांतून सुचविला गेला आहे. या ग्रंथाचें आणखी एक प्रयोजन म्हणजे भागवतधर्माचें विवेचन.

श्रीमद्भागवतांत भगवत्प्रणीत भगवद्भक्तीचा धर्म भगवद्भक्तांच्या भक्तीचा गौरव करून वर्णिलेला आहे—

**स वै पुंसां परो धर्मो यतो भक्तिरधोक्षजे । १. २. ६**

या शब्दांत ' धर्म ' शब्दाची व्याख्या केली आहे आणि जीवनांतील कर्म, तप, ज्ञान, सर्व कांहीं कृष्णमय व्हावें—

**वासुदेवपरं ज्ञानं वासुदेवपरं तपः ।**
**वासुदेवपरा योगा वासुदेवपरा गतिः ॥ १. २. २९**

असा उपदेश लोकमंगलासाठीं ( शिवाय लोकस्य, भवाय भूतये । ) केला आहे. त्यासाठींच श्रवणमंगल असें श्रीकृष्णाचें चरित्र गायिलें आहे. भागवतांतील

श्रीकृष्णचरित्र कवीनें विलक्षण जिव्हाळयानें, कौतुकानें आणि प्रेमादरानें वर्णिलें असल्यानें त्याचा थोडा आस्वाद घेणें इष्ट ठरेल.

श्रीमद्भागवतांत श्रीकृष्णचरित्र आलें आहे तें १० व ११ या दोन स्कंधांमध्यें, म्हणजे ग्रंथाच्या शेवटीं ! पहिल्या स्कंधाच्या सातव्या अध्यायांत परीक्षितीच्या जन्माची कथा आहे. भारतीय युद्धानंतर पांडवांच्या शिबिरांत मध्यरात्रीं शिरून अश्वत्थाम्यानें अनेक लहानमोठ्या पांडवपुत्रांचा वध केला, येथून आरंभ आहे. द्रौपदीचें सांत्वन करून, उत्तरेला अभयदान देऊन व भीष्म-कुंतीचा निरोप घेऊन श्रीकृष्ण द्वारकेस परतले व लवकरच निजधामास गेले. आणि मग आरंभीं उल्लेख केल्याप्रमाणें परीक्षिति राजाला श्रीकृष्णचरित्र ऐकण्याची इच्छा निर्माण झाली व शुकमुनींनीं त्याला तें कथन केलें. त्यासाठीं मागें जाऊन विश्वोत्पत्तीपासून आरंभ करून भगवंताचे नाना अवतार, त्याच्या नाना विभूति व नाना लीला यांचें कथन करीत ते शेवटीं श्रीकृष्णचरित्रावर आले. अलीकडचें ' फ्लॅश बॅक ' ( अखेरीच्या दृश्यानें आरंभ करून नंतर मुळापासून निवेदन करणें ) पद्धतीचेंच हें एक प्रकारें तंत्र आहे ! यांत दोन गोष्टी साधल्या गेल्या आहेत. महाभारताशीं श्रीमद्भागवताचा सांधा जुळवला गेला आहे, ही एक गोष्ट; दुसरी, महाभारतांत श्रीकृष्णचरित्र जें गौण रूपांत आलें होतें, त्यालाच केंद्रस्थान देऊन तें सांगण्याचा प्रयत्न. श्रीकृष्णाच्या दैवी, ईश्वरी स्वरूपाची बाजू महाभारतांत नाहीं, पण ईश्वराचा तो अवतार असावा इतकें पूर्णत्व व सामर्थ्य त्यांत प्रकट झालें आहे. हीच बाजू श्रीमद्भागवत सांगतें. महाभारतांतला श्रीकृष्ण पूर्णतः मानवी असूनहि कांहीं वेगळेंच अतिमानवत्व त्याच्या ठिकाणीं आढळतें, असें विद्वानांचें मत आहे. श्रीमद्भागवतांत मात्र मानवी व ईश्वरी दोन्ही बाजूंचा एक अवर्णनीय संगम व्यास-शुकांनीं साधला आहे. कसा तें पाहूं या !

श्रीमद्भागवतांतील कृष्णचरित्र कवीनें जितकें अद्भुत, तितकेंच मानवी स्वरूपांत रेखाटलें आहे. अद्भुत रसाला आरंभ जन्मक्षणापासूनच होतो. कृष्णजन्म होतांच कारागाराचीं कडी-कुलुपें गळून पडतात, दुथडी भरून वाहणारी यमुना श्रीकृष्णचरणस्पर्शानें दुभंग होते, प्रेमळ मावशीचा आव आणणारी पूतना आक्रोश करीत प्राण सोडते; यमलार्जुन हे दोन वृक्ष उन्मळून पडतात. गोवर्धनगिरी करांगुलीवर तोलून धरला जातो. कालियाचा गर्वपरिहार होऊन

8006९ 10.9.9५ 9५३८ २.१२.६८

तो शरण येतो – अशा मनाला विस्मित करणाऱ्या एक, दोन – नव्हे अनेक काव्य-मय कथा कवि वर्णन करतो. पण त्याचबरोबर मानवी देह धारण करणारा हा देव मानवी व्यवहारांत गुरफटलेला आढळतो, मानवी सुखदुःखें भोगतो, गोकुळांत नंद-यशोदा, गोप-गोपी, स्नेही–संवगडी यांच्या सहवासांत किंवा रुक्मिणी-सत्यभामा यांच्या अन्तःपुरांत सर्व प्रापंचिकाप्रमाणें रस घेतो.

मानुषं लोकमासाद्य तज्जातिं अनुसन्धतः ।

कृष्णाच्या चरित्राचें श्रवण करण्याची इच्छा ऋषींनीं व्यक्त केली होती आणि ती मुनींनीं पूर्ण केली आहे. हा नरस्वरूप नारायण सर्वत्र मानवी संबंधबंधनांत अडकलेला आहे. द्वड बालकाप्रमाणें तो कधीं रांगत यशोदेचीं पूजा-उपकरणीं उधळून देतो, तर कधीं तिचा ताकाचा डेरा कलंडून वेताच्या छडीचा प्रसादहि खातो. गोपींच्या घरचें दहीदूध चोरून, त्यांनीं चुगली केल्यास पुनः त्यांची वाट अडवतो. जलभरणाला गेलेल्या गोपींचे घट खट्याळपणें खडा मारून फोडतो नि त्यांचें ‘ गोरें अंग ’ भिजवतो; कधीं संवगड्यांसह यमुनेच्या तीरावर ‘ खगांचिया साउलीच्याच संगें ’ धावतो, बकाचें सोंग घेतो, कोकिळेला कुहूकुहू करून साद घालतो. त्याला सुदाम्यासारखे मित्र आहेत. अक्रूर-उद्धवासारखे शिष्य-स्नेही आहेत, अर्जुन-द्रौपदीसारखे बहिश्चर प्राणसखे आहेत. भामा-रुक्मिणीसारख्या सौंदर्य-प्रेम-संपन्न कान्ता आहेत. कुन्ती, भीष्म, विदुर यांसारखे ज्येष्ठ आप्त आहेत. अनेक नात्यांत गुरफटलेला हा कृष्ण खरेंच संसारी आहे, ‘ लेकुरवाळा ’ आहे. सर्व वयोवस्थांत विविध नात्यांच्या भूमिका या लीलाधारी नटानें यशस्वी-पणें पार पाडल्या आहेत. आणि त्या अगदीं मनाची स्थिरता, अलिप्तता सांभाळून-चित्ताचें प्रसन्नत्व न गमावतां. त्याची प्रज्ञा ‘वायुर्नावमिवाम्भसि’ कधीं संकटाच्या वावटळींत हरली नाहीं, त्याच्या मुखावरची प्रसन्नता कधीं मावळली नाहीं. संकटाच्या काळोखांत कृष्णाच्या प्रसन्न वदनावरचें स्मित हा विपद्ग्रस्तांना सदैव आशेचा किरणच वाटला आहे. म्हणून कृष्णसखा सदैव पाठीशीं असावा, ही सर्वांची कामना– त्यासाठीं संकटेंसुद्धां पत्करावयाची तयारी. ‘ विपदः सन्तु नः शश्वत् ’ अशी प्रार्थना करायला कुन्ती धजते, ती यासासाठींच.

भगवद्गीतेंत उल्लेखिलेलें ‘ जन्म कर्म च मे दिव्यम् ’ विविध अवतारांच्या रूपानें भागवतांत पहावयास मिळतें. पण हे सारे अवतार ‘ धर्मसंस्थापनार्थ ’

आहेत; हा विश्वास त्यांतून दृढ करण्यांत आला आहे. श्रीकृष्णाच्या निर्गुण निराकार रूपांतून शेषशायी श्रीविष्णूचें साकार रूप प्रगटलें; तेथून कंसाच्या कारागारांत काळोख्या मध्यरात्रीं देवकीच्या पोटीं जन्म घेईपर्यंतच्या प्रदीर्घ जीवनप्रवासांत आपल्याला अनेक पुण्यश्लोक ब्रह्मर्षींच्या नि राजर्षींच्या भेटी घडतात; अनेक राजवंशांचे इतिहास ऐकावयास मिळतात; अनेक भगवद्भक्त भेटतात. दक्षयज्ञ, वृत्रवध, परशुरामपराक्रम इत्यादि कथामिषानें राज्यक्रांत्यांचीं वर्णनें ऐकायला मिळतात; दधीचीचा आत्मयज्ञ, बलीचें आत्मबलिदान, ध्रुव-प्रल्हादांची दृढ विष्णुभक्ति, समुद्रमंथनाचा जगड्व्याळ प्रसंग, भगीरथाचा महान् पुरुषार्थ असे नाना रोमहर्षक प्रसंग पहायला मिळतात. मानवी स्वभावाचे सुष्ट, दुष्ट पैलू पहायला सापडतात; पापी जनांच्या नृशंस, क्रूर चेष्टा आणि त्याचबरोबर श्रद्धेचें अपार सामर्थ्य याहि गोष्टी पहावयास मिळतात. केवढा विशाल नि भव्य हा आलोक आहे! ‘विश्वनाट्याचें’च हें विराट् दर्शन आहे! तें निर्माण करणाऱ्या कवीची प्रतिभा केवढी अलौकिक, किती सर्वस्पर्शी म्हटली पाहिजे! जातां जातां बलिकथेप्रमाणें कधीं राजमंडपांत, तर इन्द्र-वृत्रासुर-कथेप्रमाणें कधीं रणभूमीवर तत्त्वचर्चा ऐकावयाला मिळते; भारतीयांनीं तत्त्वचर्चा केली आहे, पण ती जीवन-समरांतील पेचप्रसंग सोडविण्यासाठीं, असें भारतावरून व प्रामुख्यानें भागवतावरून स्पष्टपणें दिसतें. सर्व कथांत आढळतो तो सत् व असत् यांचा झगडा. त्यांतून कर्तव्य आणि अकर्तव्य यांचा निवाडा होतो, संमोह नष्ट होतो. भारतीय योगशास्त्राला—नीतिशास्त्राला अध्यात्माची—ब्रह्मविद्येची बैठक, व्यवहाराला अध्यात्माचें अधिष्ठान, जनमानसांत श्रीकृष्णचरित्रानेंच मिळवून दिलें आहे. निकोप, निरोगी, व आनंदी बालकें हीं या भूमींत ‘बाळकृष्ण’ मानलीं जातात. तें बालक घरांत रुणझुण धावावयास यावें म्हणून नववधूच्या देव्हाऱ्यांतील ‘बाळकृष्ण’ नवऱ्या मुलानें नेण्याचा शिरस्ता महाराष्ट्रांत आहे. गोपवधूची भूमिका घेऊन गर्बा नृत्याच्या वा गोफनृत्याच्या द्वारा मुली कलानंद लुटतात आणि गौळणी गाऊन कृष्णस्वरूप पतीवर प्रेम करायला शिकतात. श्रीकृष्ण हा बाल, किशोर, कुमार आणि प्रौढ या स्वरूपांत भारतांत सखा, आप्त आणि गुरु या नात्यांनीं भारतीयांच्या मनींमानसीं सतत विहरत आहे. हा ‘देवकीपरमानन्द’ भारतीयांना जगद्गुरूहि वाटला आहे.

श्रीमद्भागवतानें मानवी हृदयांतील भावनेला जसें मैत्री, करुणा, वात्सल्य, इत्यादि रूपानें विशुद्ध व उदात्त बनवून मानवी जीवनाला उच्चस्तरावर नेलें आहे, तसेंच जीवनाकडे पहाण्याची एक विशुद्ध सौंदर्यदृष्टिहि दिली आहे. भागवताचें जें चिन्त्य ध्येय रूप तेंच मुळीं सुन्दरतम आहे. विश्वांतील सर्व सौंदर्याचें उगमस्थान हेंच सुंदरतत्त्व आहे. तें सुभग आहे, श्लील आहे, शंतम म्हणजे मंगल आहे. जेव्हां श्रीकृष्णाच्या रूपानें तें साकारतें, तेव्हां रूपात्मक सौंदर्याचें दिव्य दर्शन मानवाला घडतें. भागवतांत ठिकठिकाणीं आलेलीं श्रीकृष्णवर्णनें त्या थोर भक्त-कवीच्या सौंदर्याची साक्ष देतात. पहिल्या स्कंधांत ब्रह्मनिर्वाणास जाण्यापूर्वी भीष्माचार्यांनीं श्रीकृष्णाची स्तुति केल्याचा प्रसंग आहे. भीष्मांनीं कृष्णमूर्तीचें वर्णन पुढीलप्रमाणें केलें आहे—

**त्रिभुवनकमनं तमालवर्णं रविकरगौरवराम्बरं दधाने ।**

**वपुरलककुलावृताननाब्जं विजयसखे रतिरस्तु मेऽनवद्या ॥ १. ९. ३३**

हे विजयसख्या ( अर्जुनाच्या मित्रा ), तूं त्रैलोक्यसुंदर आहेस, तुझी कांति तमालपत्राप्रमाणें नीलवर्ण आहे. सूर्यकिरणाप्रमाणें झगझगणारें वस्त्र तूं परिधान केलें आहेस; तुझें मुखकमल कुरळया केशकलापानें झाकल्यानें तुझी देहयष्टि विशेषच खुलून दिसत आहे...तुझ्या ठायीं माझें विशुद्ध प्रेम सदैव राहो !

व्रजांतल्या गोपांगना सुंदर हावभाव, मोहक स्मितें आणि मधुर प्रेमकटाक्ष टाकीत - पण हें सारें त्या श्रीकृष्णाचें अनुकरण होतें. भीष्मच म्हणतात—

**ललितगतिविलास-वल्गुहासप्रणय-निरीक्षण-कल्पितोरुमानाः ।**

**कृतमनुकृतवत्यः ........ यस्य गोपवध्वः ॥ १. ९. ४०**

ध्येयवस्तूचें ध्यान करतां करतां ध्याता तदाकार होतो, असा मानसशास्त्राचा नियम आहे. तेव्हां आनन्दघन नि रसस्वरूप परब्रह्माचें ध्यान करण्यासाठीं जी सगुण-साकार मूर्ति हवी, ती तितकीच पराकोटीची नयनमनोहर हवी. तिच्या मुखावर प्रसन्नतेचें स्मित हवें; तें स्मित नयनांत वसावें नि त्यांतून हृदयांतील प्रेमलहरींचा भक्तावर प्रसादवर्षाव व्हावा, याच दृष्टिकोणांतून श्रीविष्णूचीं–श्रीकृष्णाचीं रूपें भागवतांत ठायीं ठायीं आलीं आहेत. दुसऱ्या स्कंधांत ( २.९.१२ ) शुकमुनींनीं ध्यानयोग्य म्हणून केलेलें वर्णन आणि तिसऱ्या स्कंधांत ( २८.१३-१६ ) कपिल-मुनींनीं माता देवहूतीला ‘ काष्ठां भगवतो ध्यायेत् ’ म्हणून केलेलें—

दर्शनीयतमं शान्तं मनोनयनवर्धनम् ।

असें वर्णन—हीं वाचावींत, म्हणजे भक्तांच्या सौंदर्यदृष्टीची कल्पना येते. हीच साजिरी-गोजरी, सावळी मूर्ति जेव्हां गोकुळांत रांगूं—रमूं लागली, तेव्हां तिच्या प्रत्येक हालचालींत, अंगप्रत्यंगांत, विलास–विक्रमांत केवळ सौंदर्यच प्रतीत झालें. वनमाला नि गुंजमाला घालून आणि मयूर-पिसांचा झगमगता मुगुट माथां लेवून यमुनातीरीं कदंबतरुतळीं कान्हा मुरली-स्वर बरसूं लागला, म्हणजे स्थिर-चरांना तो असीम आनंदाचा सोहळा वाटे. श्रीकृष्णाच्या रूपलावण्यावर केवळ मुग्ध गोपांगनाच भाळल्या नव्हत्या, तर सर्वच भक्तांचा मेळा भाळला होता. म्हणून श्रीवल्लभाचार्यांसारखे विरक्तहि एका अष्टपदींत—

अधरं मधुरं वदनं मधुरं नयनं मधुरं हसितं मधुरम् ।
नृत्यं मधुरं सख्यं मधुरं मधुराधिपतेरखिलं मधुरम् ॥

असा त्या माधुर्याचा प्रभाव गातांना दिसतात. मराठी संत-साहित्यांतहि 'सुंदर ध्याना'-चीं रेखीव वर्णनें अमाप आहेत. भागवतानें दिलेल्या सौंदर्यदृष्टीचा प्रभाव भारतांतील शिल्पावर व मूर्तिकलेवर खूपच झाला आहे. श्रीमुरलीधराच्या, डाकूरजीच्या नि ठाकूरजीच्या मूर्ति आपलें कलासर्वस्व ओतून सुभगसुंदर बनविण्याचा प्रयत्न कलावंतांनीं केलेला आहे. शिल्पाप्रमाणेंच संगीत, नृत्य नि नाट्य या कलांवर श्रीकृष्ण-चरित्राचा मोठा ठसा उमटलेला दिसतो.

भागवतांतील धर्म हा खरा मानवी धर्मच आहे. मानवाची प्रतिष्ठा आणि मानवी मूल्यें यांची जोपासना करण्याचें सामर्थ्य मानवांत आहे. उत्क्रान्तिवादानें मानवाच्या उत्पत्तीचा इतिहास कांहींहि मानलेला असो. 'देवत्वा'संन्निध जाण्याचें सामर्थ्य एका मानवांतच आहे, अशी भागवताची ठाम श्रद्धा आहे. भागवतांत मानवी देहाची निंदा जरी अनेक ठिकाणीं आढळत असली, तरी देहाचें महत्त्व कुठेंच कमी लेखलेलें नाहीं. उलट भगवंतालाहि मानवी रूप घेण्याचा मोह होतो आणि देवांनाहि त्याचा हेवा वाटतो, अशीच त्याची महती गायिली आहे ( ३.२९.२८-३३ ).

मानवी देहांतलें चैतन्यतत्त्व हा ईश्वराचाच अंश असल्यानें 'सर्वत्र समदृष्टि' होण्यांतच धर्मशीलता आहे, ही भागवताची प्रमुख शिकवण आहे. भागवतांत

कुठें कर्मकांडाचा, यज्ञयागाचा वा मूर्तिपूजेचा बडिवार नाहीं. असला तर निर्बंधच आहे. भागवतांतील धर्म हा ' प्रेमस्वरूप ' आहे आणि म्हणूनच तो मानवी आहे. भागवतांत उपदेशिलेलीं नीतिमूल्यें हीं शाश्वत स्वरूपाचीं, उच्चदर्जाचीं सामाजिक मूल्यें आहेत आणि तीं मानवाला आचार-सुलभहि आहेत. भागवतांतील हा प्रेमस्वरूप धर्म एका अंगानें अनंतगुणनिधान भगवंताशीं मानवाचें नातें जोडतो, तर दुसऱ्या बाजूनें दृष्ट वस्तुजाताशीं, चराचर सृष्टीशीं त्याला बांधून टाकतो. या प्रेमस्वरूप धर्माचें नांव आहे भक्ति. तिसऱ्या स्कंधांत माता देवहूतीला कपिलानें हा भागवतधर्म विशद करून सांगितला आहे. तोच अकराव्या स्कंधांत श्रीकृष्णानें भक्तराज उद्धवाला वर्णन करून सांगितला आहे.

ईश्वरभक्तीचें अखेर पर्यवसान सर्वत्र सर्वांभूतीं ईश्वर भरला आहे या बुद्धींत नि वृत्तींत व्हावें आणि तसा आचार घडावा. ' जें जें देखिजे भूत । तें तें मानिजे भगवंत ' या संतोक्तींत सूत्ररूपानें तो आशय उत्तम रीतीनें व्यक्त झाला आहे. जो भूतमात्रावर प्रेम करूं शकत नाहीं, त्याच्या मनाला शांति नाहीं.

**भूतेषु बद्धवैरस्य न मनः शान्तिमृच्छति । ३. २९. २३**

हा भागवताचा इशारा आजच्या ईर्ष्या-मत्सरग्रस्त जगानें ध्यानांत ठेवला, तर विश्वशान्ति निर्माण करण्याचा प्रयास विफल ठरणार नाहीं. सर्वांतर्यामीं ईश्वर भरलेला आहे, हें विसरून—त्याची अवहेलना करून पूजेचें विडंबन मनुष्य करतो (अर्चाविडम्बनम्—३. २९. २१), असें भागवताचें स्पष्ट सांगणें आहे. ह्या मानवांतील परमेश्वराची पूजा कशी करावी, याचा भागवतानें सांगितलेला मार्ग धर्मनिरपेक्षतेनें (सेक्युलर) मानवाची प्रतिष्ठा मानणाऱ्यांनाहि मान्य व्हावा :

**महतां बहुमानेन दीनानामनुकम्पया ।**
**मैत्र्या चैवात्मतुल्येषु यमेन नियमेन च ॥ ३. २९. १७**

वडीलधाऱ्यांबद्दल आदर बाळगून, दीनजनांवर दया दाखवून, बरोबरीच्यांशीं मैत्री करून आणि अहिंसा, सत्य, आदि यम-नियमांचें पालन करून. या उपदेशांत गूढ, अलौकिक कांहीं नाहीं. समाजधारणेसाठीं सांगितलेलीं दान, मान, करुणा व मैत्री हीं नैतिक मूल्यें आहेत. मानवा-मानवांमध्यें स्नेहबंधन निर्माण करणें आणि तेंहि सर्वांची समानता मान्य करून, हें भागवताचें सूत्र आहे.

१६६२७

अकराव्या स्कंधांत श्रीकृष्ण-उद्धव-संवादांत हाच उपदेश पुनः आला आहे :

अयं हि सर्वकल्पानां सध्रीचीनो मनो मम ।
मद्भावः सर्वभूतेषु मनोवाक्कायवृत्तिभिः ॥ ११. २९. १९

हें त्या सर्व विवेचनाचें सार आहे. 'सर्वभूतीं भगवद्दृष्टि । हेंचि भांडवल माझे गांठीं', 'यापरी कायावाचा मनें । सर्वभूतीं भगवद्भजनें । हेंचि मुख्यत्वें श्रेष्ठ साधन ।'—नाथांचें या सर्व श्लोकांवरील विवरण मोठें रसाळ आहे.

श्रीमद्भागवतांतील ज्ञान आणि भक्ति, आत्मोद्धार आणि समाजसेवा, स्थितप्रज्ञत्व आणि सर्वभूतहितेरतत्व यांचा मधुर मिलाफ हा अवर्णनीय वाटतो. लो. टिळकांनीं त्याला 'पुरणपोळी'ची उपमा दिली होती, तर श्रीरामकृष्ण परमहंस आधुनिकांना समजेल अशा शब्दांत ज्ञानाच्या लोण्यांत तळलेली आणि भक्तीच्या मधांत मुरवलेली ती एक पुरी ( केक ) आहे, असें वर्णन करीत.

आजच्या जगाला नि समाजाला या ग्रंथाची गरज काय ? या पुस्तकांत भिन्न-भिन्न कथांचें अंतरंग स्पष्ट करतांना, त्यांतील सौंदर्य-बोधाची दिशा सूचित करतांना आणि वर त्यांतील उदात्त मानवतावादी धर्माचें विवेचन करतांना या प्रश्नाचें उत्तर दिलें गेलेंच आहे. एका अधिकारी विद्वानाच्या वचनाच्या आधारें त्याचा समारोप केला, तर तो उचितच होईल. लखनौ विद्यापीठाचे कुलगुरु आणि भारतीय संस्कृतीचे एक थोर भाष्यकार श्री. राधाकमल मुकर्जी म्हणतात. "आजच्या युगाच्या अशा कांहीं समस्या आहेत, त्याचे विशिष्ट असे सामाजिक दृष्टिकोन आहेत आणि तत्त्वप्रणाली आहे. पण मानवामानवांना, भिन्न भिन्न राष्ट्रांना नि वंशांना एका धाग्यांत बांधून ठेवण्याचें जें महत्त्वाचें कार्य आधुनिक संस्कृतीला पार पाडायचें आहे, त्या कार्यासाठीं भागवतांतून योग्य अशी आध्यात्मिक प्रेरणा मिळूं शकेल." अन्यत्र ते म्हणतात—

"प्रेम, मांगल्य आणि करुणा यांचें एक महाकाव्य या दृष्टीनें भागवताकडे पाहिलें, तर या पुराणाचा खरा वारसा आपल्याला लाभेल; त्यानें प्रतिपादन केलेलीं सत्यें व मूल्यें यांचा आधुनिक जीवनाच्या संदर्भांत अर्थ लावतां येईल व त्याला दुजोरा देतां येईल. कारण सत्य नि मूल्यें प्राचीन वा अर्वाचीन असूं शकत नाहींत—तीं चिरंतनच असतात."

* * *

# तीन परिशिष्टें

## आद्य विवाह

मानवजातीची निर्मिति केव्हांपासून ? मोठा गमतीदार प्रश्न आहे हा. शास्त्रज्ञांचें या बाबतींतलें संशोधन संपलेलें नाहीं. उत्खननांत सांपडणाऱ्या मानवी देहाच्या अवशेषांवरून कुणाला पन्नास लक्ष वर्षांपूर्वी मानवप्राणी पृथ्वीवर असावा, असें वाटत आहे, तर इतरांचा अंदाज आणखी कांहीं वेगळा आहे. शास्त्रज्ञांचे शोध कांहीं असोत, पुराणकथांचें कथन या बाबतींत निश्चित आहे. आदम आणि ईव्ह यांच्यापासून मानवप्रजा निर्माण झाल्याची बायबलमधील कथा पुष्कळांना ठाऊक आहे. पण त्या दोघांचा धार्मिक विधीनें विवाह झाला होता कीं नाहीं, याबद्दल कुठें उल्लेख नाहीं ! उलट त्या उभयतांच्या हातून 'पापकृत्य' घडलें व मनुष्य हा 'पापयोनि' व 'पापात्मा' आहे, असेंच मानण्याकडे तिकडे कल आहे. भारतीय पुराणांत यासंबंधीं कांहीं कथा आहे काय ?

या प्रश्नाचें उत्तर 'होय' असें आहे. भारतीयांच्या पुराणांत त्यासंबंधीं कथा आहे नि ती भारतीयांच्या विवाहाबद्दलच्या दृष्टिकोनावर प्रकाश टाकणारी आहे. भारतीयांना विवाह व प्रजानिर्मिति या दोन्ही गोष्टी आरंभापासून पवित्र वाटत असल्याचें त्या कथेवरून दिसतें आणि गमतीची गोष्ट म्हणजे हा 'आद्य विवाह' घडवून आणण्यांत सदा ब्रह्मचारी असणाऱ्या नारदांचीच मध्यस्थी होती ! नारदांना कीर्तनकारांनीं 'कळीचे नारद'—कलह लावून देण्यांत पटाईत—अशी पदवी दिली असली, तरी तो त्या काळांतला श्रेष्ठ 'वार्ताहर' होता, यांत शंकाच नाहीं !

आपण सारी 'मनू'ची प्रजा म्हणून आपल्याला 'मानव' म्हणतात. हे मनु सात होते. ते ब्रह्मदेवाचे 'मानसपुत्र'. त्यांतल्या 'स्वायंभुव' नांवाच्या मनूला देवहूति नांवाची कन्या होती. मोठी स्वरूपवान्, अत्यंत सुलक्षणी आणि अत्यंत

धार्मिक. तिला नारदांच्या तोंडून कळलें कीं अमुक ठिकाणीं अमुक ऋषि तपश्चर्या करीत आहेत. तुला अगदीं साजेसेच ते आहेत. पुढील काळांत दमयंती, रुक्मिणी, सुभद्रा यांच्या बाबतींत जें घडलें, तेंच देवहूतीच्या बाबतींत घडलें. *त्या ऋषींचें* गुणवर्णन ऐकून तिचें मन त्यांच्यावर जडलें. विवाह करीन तर त्यांच्याशींच, असा तिनें निश्चय केला. तिच्या पित्याला–मनूला तिचें मन मोडवेना! तिला घेऊन आपल्या पत्नीसह एका रथांत आरूढ होऊन मनु त्या ऋषींच्या आश्रमांत दाखल झाला!

तो आश्रम सरस्वती नदीच्या तीरावर होता. आश्रम मोठा सुंदर होता. कदंब, चंपक, मदार व आम्र इत्यादि वृक्ष तेथें डवरलेले होते. उन्मत्त कोकिळांचे आलाप तेथें चालू होते. हंस, चक्रवाक व चकोर पक्ष्यांचें मनोहर कूजन कानावर पडत होतें. भ्रमरांचा गुंजारवहि कानाला रिझवीत होता. हरिण आणि कस्तुरीमृग, हत्ती आणि गवे, मुंगूस आणि मोर इत्यादींचीहि तेथें वस्ती होती. अशा सुंदर वातावरणांत एका मुनीचीं दहा हजार वर्षें तपश्चर्या सुरू होती–अनुरूप पत्नी मिळावी म्हणून! त्या मुनीच्या पर्णकुटीपाशीं मनु आपली पट्टराणी शतरूपा व कन्या देवहूति यांच्यासह येऊन उपस्थित झाला. त्या मुनींचें नांव ' कर्दम '. हा ब्रह्मदेवाचा मानसपुत्रच.

सडपातळ उंचेली अंगकाठी, कमलपत्रासारखे विशाल नेत्र, मस्तकावर सोनेरी जटांचा मुगूट आणि शरीरावर तपश्चर्येचें तेज यांमुळें कर्दमऋषींची मूर्ति मनोहर दिसत होती. मनूनें त्यांना ओळखलें, वंदन केलें व कुशल प्रश्न झाल्यावर, " माझी मुलगी पदरांत घेऊन अनुग्रह करा, तुम्हांला ही सर्वस्वी अनुरूप आहे, तिनें तुम्हांला वरण्याचा ध्यास घेतला आहे," अशी विनंती केली. कर्दमांनीं देवहूतीकडे पाहिलें. तिची अंगकांति, रूपसंपदा व तिच्या मुखावरील सात्त्विक पावित्र्याचें तेज पाहून तेहि भारले गेले. हें ' विधिलिखित 'च आहे, हें जाणून त्यांनीं मनूला रुकार दिला.

हा जगांतला पहिलाच विवाहप्रसंग वेदांत वर्णन केलेल्या विधीप्रमाणें पार पडला. विशेष लक्षांत घेण्यासारखी गोष्ट म्हणजे ब्राह्मणपुत्र व क्षत्रियकन्या यांचा हा विवाह होता!

विवाह पार पडला. शतरूपा सासूबाईंनीं जांवईबुवांना मूल्यवान् वस्त्रालंकार व संसारोपयोगी साहित्य आंदण दिलें. मुलीला योग्य पति मिळाल्यामुळें मनु चिंतामुक्त झाला. पण त्याला कन्यावियोग जाणवलाच. 'जा मुली जा, दिल्या घरीं तूं सुखी रहा' असें म्हणत सद्गदित अंतःकरणानें व डबडबलेल्या डोळ्यांनीं मनूनें कन्येचा निरोप घेतला. जगांतला पहिला विवाह आणि कन्यावियोगाचें दुःख यांना बरोबरच आरंभ झाला !

* * *

## श्रीलक्ष्मी

प्रत्येक पुरुषाला 'श्रीयुत' आणि प्रत्येक स्त्रीला 'श्रीमती' या बिरुदानें उल्लेखिण्याची जी प्रथा आपण स्वीकारली आहे, तिच्यामागें श्रीभक्तीची थोर भारतीय परंपरा आहे. 'श्री' म्हणजे सर्व माङ्गल्याचें माहेर, कल्याणांचें आयतन व शुभांचें आशास्थान. विद्याध्ययनाचा आरंभ असो, पूजेचा संकल्प असो, कीं पत्रलेखनाची सुरुवात असो, आधीं उच्चार 'श्री'चा. विघ्नहर्ता गजानन काय किंवा जगत्पालक विष्णु काय, सर्वांच्या मागें 'श्री' ही उपाधि लावून आपण त्यांना 'श्रीयुत' बनवून टाकलें आहे. या दृष्टीनें तरी 'श्री' ही जगन्मोहिनी ठरली आहे खरी ! या श्रीचा अवतार जनमानसांत केव्हां झाला ? तिचें दर्शन कवींच्य प्रतिभेला केव्हां घडलें ? हा इतिहास मोठा मनोरंजक आहे.

भारतांत सणांची व उत्सवांची रेलचेल आहे. प्रत्येकाचें आपल्या परीनें कांहीं वैशिष्ट्यहि आहे. पण दिवाळी, दसरा या सणांची बरोबरी कुणीच करूं शकत नाहीं. दिवाळीच्या उत्सवांतील कौटुंबिक भावनेचें काव्य जरा बाजूस ठेवलें, तर त्या सणांतील प्रमुख सोहळा म्हणजे लक्ष्मीपूजनाचाच. ऐहिक वैभवाची प्रदात्री देवता म्हणून लक्ष्मीचें पूजन हिंदू लोक मोठ्या भावभक्तीनें करतात, ते प्रायः याच उत्सवांत. लक्ष्मी ही सागरकन्या. समुद्रमंथनाच्या वेळीं कौस्तुभ, चंद्र, पारिजात यांच्यासमवेत ती वर आली आणि सागरानें ती विष्णूला अर्पण केली, ही पुराण-कथा सर्वविश्रुत आहे. पण त्यापूर्वीं तिचें अस्तित्व कोणत्या रूपांत होतें ?

पुराणांच्या आधींचें आपलें वाङ्मय म्हणजे वेद; त्यांत या देवतेचा उल्लेख आहे काय? नि कोणत्या रूपांत? सागरमंथनाच्या कथेंत कांहीं रूपकार्थ आहे काय? लक्ष्मी जर सागरदुहिता, तर तिला पद्मा, कमला हीं नांवें कां मिळालीं?

वैदिक आर्यांना 'लक्ष्मी' ही देवता माहीत नव्हती. त्यांना ठाऊक होती फक्त 'श्री'. अग्नि, इंद्र, वरुण, वायु या देवतांप्रमाणेंच श्रीदेखील एक निसर्गांतील शक्ति व म्हणून देवता. निसर्गांतील सौंदर्य, शोभा व मुख्यतः विपुलता नि समृद्धि यांचें उगमस्थान म्हणजे श्री. वैदिक ऋषींनीं या देवतेवर ज्या ऋचा लिहिल्या आहेत, त्यांच्या समूहाला 'श्रीसूक्त' असें नांव आहे. त्यांतील पहिली ऋचा पुढीलप्रमाणें आहे.—

**हिरण्यवर्णां हरिणीं सुवर्णरजतस्रजाम्।**
**चंद्रां हिरण्मयीं लक्ष्मीं जातवेदो ममावह ॥**

ही प्रार्थना अग्नीला करण्यांत आली असून, त्यानें सुवर्णकान्ति असलेली, सोन्याचांदीच्या अलंकारमाळा धारण करणारी, चंद्राप्रमाणें प्रकाशमान् असलेली लक्ष्मी आपल्या गृहीं आणावी, अशी प्रार्थना आहे. याच सूक्तांत पुढें 'तूं प्रजांची माता आहेस. तूं मला दीर्घायुषी कर; पुत्र, पौत्र, धन, धान्य, हत्ती, घोडे, गाई, मला दे; कीर्ति व ऋद्धि यांचा लाभ घडव,' अशी तिची प्रार्थना आहे. तिच्याकडे ऋषि पाहतो ती समृद्धीची माता म्हणून, ही गोष्ट प्रामुख्यानें येथें आपल्या ध्यानांत येते.

श्री हा शब्द वैदिक आर्यांना माहीत होता तो प्रामुख्यानें सौंदर्य, शोभा या अर्थानें. पुढील वाङ्मयांतहि शोभा, कांति द्युति हे त्याचे पर्यायवाचक शब्द आढळतात. गगन-श्री, शारद-श्री इत्यादि शब्दसमुच्चयांत श्री हा शब्द शोभा, तेज, कांति या अर्थानेंच योजला जातो. निसर्गाच्या सान्निध्यांत सदैव राहणाऱ्या आर्यांना विशाल सरोवरांत विकसणाऱ्या कमल-वनांनीं मोहिनी घातली. कमलें म्हणजे शोभा. नील नभोमंडल व नील सागर यांच्या सीमेवर प्रकट होणारें सूर्यबिंब हेंहि त्यांना कमलासारखेंच वाटलें. त्यांतच सूर्यकिरणांचा स्पर्श होतांच कमलें हसूं लागतात, त्यांची शोभा वाढूं लागते, हेंहि त्यांनीं पाहिलें. सूर्यपूजक आर्यांनीं कमल हें सूर्याचें प्रतीक ठरविलें. आपल्या प्राचीन शिल्पांत याच अर्थानें तें वापरलें आहे. श्री व शोभा यांच्या निकट साहचर्यांतून लक्ष्मीला 'कमला'

व ' कमलालया ' हीं नांवें मिळालीं. ही सौंदर्याची देवता ' पद्महस्ता ', ' पद्म-मालिनी ', ' कमलासना ' आहे, असें कवीच्या प्रतिभेला दिसलें.

लक्ष्मीचें जलाशीं सान्निध्य श्रीसूक्तांत व्यक्त केलें आहे, तें तिला ' आर्द्रा ' हें विशेषण लावून. विपुल जलसंपत्ति असेल, तरच धनधान्यादिकांची प्राप्ति होऊन सुबत्ता नांदेल, ही गोष्ट आजच्याप्रमाणेंच वैदिक ऋषीहि जाणून होते. कोयना धरणाच्या जलसंचयांतून महाराष्ट्राची लक्ष्मी आपण वाढवूं पाहातच आहोंत ना ? या अर्थानें लक्ष्मी ही ' जलधि-जा ' आहे.

जगांत शोभा, चारुता, कांति येते, ती कुणामुळें ? या प्रश्नाचें उत्तर सोपें आहे. सूर्य हीच तेजाची देवता, प्रकाशाचें उगमस्थान. सूर्यकिरणांच्या कोमल स्पर्शानेंच कमलांना जाग येते व त्यांची कमनीय कांति खुलूं लागते. म्हणून वैदिक आर्यांनीं ' श्री ' ही सूर्यपत्नी होती असें म्हटलें आहे. वाजसनेय संहितेंत श्री व लक्ष्मी ह्या सूर्याच्या सपत्नी होत, असें म्हटलें आहे. विष्णूची कल्पना पुढें येण्यापूर्वीची ही कल्पना आहे. लक्ष्मी ही समृद्धीची, तर श्री ही सौंदर्याची देवता, असा स्पष्ट भेद त्या वेळीं होता. पुढें विष्णु या कल्पनेंत सूर्यदेवतेची कल्पना विकसित झाली व लक्ष्मीनारायणाचा अभेद्य संबंध जडला. लक्ष्मी ही पृथ्वीची शोभा व वैभव या दृष्टीनें पृथ्वी व लक्ष्मी या दोघी विष्णूच्या पत्नी म्हणून पुराणांत उल्लेख आहे, तर कांहीं ठिकाणीं लक्ष्मी व सरस्वती या दोघी विष्णूच्या पत्नी, असा उल्लेख आहे.

लक्ष्मी–वैभव याची मोहिनी सर्व धर्मसंप्रदायांवर पडली. बौद्धांनाहि लक्ष्मीचा त्याग करतां आला नाहीं. यशोधरा, राजलक्ष्मी, वसुधरा या रूपांत त्यांनीं तिची भक्ति–उपासना केली आहे. लक्ष्मीला ' महालक्ष्मी ' नांव कसें मिळालें, याची कथा श्रीदेवीभागवतांत आहे. ब्रह्मा, शंकर, विष्णु, अग्नि, सूर्य, इंद्र, कुबेर यांच्या तेजापासून निर्माण झालेली अठरा हातांची ती एक स्वतंत्र देवता. परंतु कालांतरानें एकाच आदिशक्तीची गौरी, लक्ष्मी, काली हीं रूपें मानण्यांत येऊं लागलीं, हें उघड आहे. कालांतरानें ' श्री ' ही सौंदर्याची स्वतंत्र देवता, ही कल्पना मागें पडली व लक्ष्मींत ती सामावली गेली. स्निग्ध, सोज्वळ, पवित्र रूपानें युक्त अशा प्रौढ रूपमतींना भारतीय लोक ' लक्ष्मी 'चा अवतार मानूं लागले व संसाराची शोभा म्हणून ' गृहलक्ष्मी 'चा अवतार झाला.

देवदैत्यांनीं समुद्रमंथन केलें. त्यांत कौस्तुभ, पारिजात आदि चौदा रत्नां-समवेत लक्ष्मीहि रत्नाकराच्या उदरांतून निघाली, हें सर्वांना ठाऊक आहे. पण या समुद्रमंथनाचा मूळ उद्देश कोणता होता? या कथेला कांहीं रूपकार्थ आहे काय?

श्रीमद्भागवताप्रमाणें अमृतप्राप्तीसाठीं समुद्रमंथन झालें. बारावें रत्न लक्ष्मी, तेरावें सुरा व चौदावें रत्न म्हणजे अमृतकुंभ घेऊन आलेले धन्वंतरी. पण विष्णु-पुराणांतील कथा वेगळी आहे. दुर्वासांच्या शापानें इंद्रादि देवांची 'श्री', शोभा, लक्ष्मी, तेज, नाहींसें झालें व तें परत मिळविण्यासाठीं समुद्रमंथनाचा खटाटोप झाला. धन्वंतरीनंतर लक्ष्मीचा अवतार, असा त्यांत क्रम आहे. हा लक्ष्मीचा अवतार व ही समुद्रमंथनाची कथा म्हणजे एका भव्य निसर्गघटनेचें रूपकात्मक वर्णन आहे, असें एका पंडिताचें म्हणणें आहे. हिमालयाच्या प्रदेशांत गाढ रात्री-नंतर होणाऱ्या सुरम्य उषःकालावर ही कथा उभारली असावी. देव हे प्रकाशाचे कैवारी, असुर हे तमाचे-अंधकाराचे वाली. दोघेहि विश्व-सागर घुसळीत होते. कैलासापलीकडेच मंदार पर्वत आहे. रात्रीच्या वेळीं आकाशगंगेचा पट्टा त्यावर रवीच्या दोरासारखा शोभून दिसतो. या मंथनांतून प्रथम बाहेर पडणारें व सर्वांना गुदमरवून टाकणारें कालकूट म्हणजे पहाटेपूर्वीचा गडद काळोख. तो हिमालयवासी शंकरानें गिळला. शुभ्र हिमाचल नीलकंठ झाला. हळूहळू पांढुरक्या प्रकाशांत वृक्ष, अश्व, हत्ती दिसूं लागतात आणि शेवटीं क्षितिजावर येते ती दंवबिंदूंच्या मौक्तिकांत विलसणारी, सोनेरी कांतीनें खुलणारी, कमलवनांतून वर डोकें काढणारी उषादेवी! म्हणूनच ऋषींनीं तिचें वर्णन करतांना 'पद्मस्थितां हिरण्य-प्रकाशां, चंद्रप्रभासां, यशसा ज्वलन्तीम्' अशीं विशेषणें लावलीं आहेत.

क्षीरसागरांतून वर येण्यापूर्वीच प्रजापतीला ती एका कमलपत्रावर दिसली होती, असें एके ठिकाणीं वर्णन आहे; तर भृगु व ख्याति या दांपत्याची ही कन्या, असें दुसऱ्या एका पुराणांत आहे. महाविष्णूच्या भालप्रदेशांतून उमललेल्या कमळावर तिचा अवतार झाला, अशी एक आख्यायिका आहे. पराक्रमी पुरुषांच्या बुद्धींत-योजनाचातुर्यांत लक्ष्मीचा जन्म होतो, हें त्यांतून सुचविलें असेल काय?

भारतांत पुराणकथा लोकमनावर ठसविण्याचें व त्या सामान्य जनतेला पिढ्यान् पिढ्या शिकविण्याचें कार्य शिल्पकलेनें केलें आहे. इसवी सनाच्या पहिल्या शतका-

पासून देवदेवतांच्या मूर्ति कोरण्याला व घडविण्याला सुरुवात झाली. लक्ष्मीची या तऱ्हेची प्राचीनतम मूर्ति म्हणजे सांची येथील स्तूपापुढील तोरणावर कोरलेली ' गजलक्ष्मी 'ची मूर्ति. लक्ष्मी ही कमलावर उजवी मांडी घालून व डावा पाय खालीं सोडून बसलेली दाखविलेली आहे. दोन्ही बाजूंस दोन हत्ती कमलांवर कोरलेले असून त्यांच्या सोंडांत कलश आहेत. त्या कलशांतील दिव्य जलाचा अभिषेक लक्ष्मीवर ते करीत आहेत. लक्ष्मीचें दुसरें प्राचीन शिल्प भरहूत येथील होय... तेथें लक्ष्मीच्या चार प्रतिमा आहेत. कमलासनाधिष्ठित मूर्ति ती ' लक्ष्मी '. उभ्या असलेल्या मूर्तींना ' श्रद्धा ', ' आशा ' व ' ऱ्ही ' ( लज्जा ) अशीं नांवें असून तीं लक्ष्मीचींच रूपें मानलीं जातात. भरहूत येथें आणखी एक मूर्ति असून तिला ' सिरिमा ' असें नांव आहे. हें नांव मोठें मजेदार आहे. ' सिरि ' ( Ceres ) हा शब्द इटलीमधील लॅटिन वसाहतींत एका देवतेचें नांव म्हणून आढळतो. ती सौंदर्याचीच देवता आहे; तर ' मा ' हा शब्द सिंधुसंस्कृतींतील लोक व भूमध्य-सागराच्या आसपासचे लोक जगताच्या मातेला उद्देशून योजीत. तिलाच ते ' महामाया ' असें म्हणत. हाच शब्द लक्ष्मीलाहि पुढें लावला जाऊं लागला व ' मा '-पति म्हणून विष्णु ' मा–धव ' बनला.

मथुरा शिल्पांतहि लक्ष्मीची एक रमणीय मूर्ति आढळते. पूर्ण कलशांतून उमललेल्या कमलपुष्पांतून लक्ष्मी वर आल्याचें चित्र कलावंतानें रेखाटलें आहे. दक्षिणेंत महाबलिपुरम् येथेंहि भद्रासन घालून बसलेली लक्ष्मीची कोरलेली मूर्ति आढळते. गजलक्ष्मीचें महाराष्ट्रांतील अप्रतिम शिल्प म्हणजे वेरूळच्या कैलास लेण्यांतील. कलावंताच्या प्रतिभेचा विलास व शिल्पकाराच्या बोटांतील कौशल्य यांचा रमणीय संगम त्यांत आढळतो. क्षीरसागराच्या उसळत्या लहरींवर उमललेल्या सहस्रदल कमलावर श्री लक्ष्मी विराजमान झाली आहे. बाजूला दोन व अंतराळांतून दोन अशा चार हत्तींच्या सोंडांतून लक्ष्मीला अमृताचा अभिषेक सुरू आहे. कैलासलेण्याच्या प्रवेशद्वारीचें हें भव्य सुंदर शिल्प म्हणजे कैलास लेण्यांत नंतर पाहावयास मिळणाऱ्या सौंदर्याचें प्रसादचिन्हच !

लक्ष्मीवर गजद्वयानें अभिषेक करावा, ही कल्पना शिल्पांत कोठून आली, गजांचें सान्निध्य कशासाठीं, याचा उलगडा होत नाहीं, असें कांहींचें म्हणणें आहे. आपल्या भाषेंतहि ' गजान्तलक्ष्मी ' हा शब्दसमुच्चय श्रीमंतीची परमावधि

दाखविण्यासाठीं योजला जात असे. याचा उलगडा मला वाटतें पुढीलप्रमाणें करतां येईल. क्षीरसागरांतून लक्ष्मी उद्भूत होतांच अष्टदिग्गजांनीं तिच्यावर सुवर्णपात्रांतील दिव्य जलानें अभिषेक केला—

> दिग्गजाः हेमपात्रस्थमादाय विमलं जलम् ।
> स्नपयांचक्रिरे देवीं सर्वलोकमहेश्वरीम् ।

असें विष्णुपुराणांत वर्णन आहे. बहुधा शिल्पकारांनीं ही कल्पना साकार केली असावी. दुसरी गोष्ट म्हणजे, गज हें मेघांचें व जलाचें प्रतीक मानलें गेलें आहे. लक्ष्मी ही जर धनधान्याची, सुबत्तेची देवता, तर ती जलदेवतेवांचून एकटी कशी राहूं शकेल? कालान्तरानें राजेलोकांनीं हत्तींचा आपल्या चतुरंग-सेनेंत समावेश करून घेतला आणि राजवैभवाचें त्यावर शिक्कामोर्तब झालें. एक हत्ती पाळावयाचा म्हटलें तर सामान्यांचे डोळे पांढरे होतील, मग 'गजघटा'— त्यांचा प्रचंड समुदाय–पदरीं ठेवायला केवढें वैभव हवें, याची कल्पनाच केलेली बरी. तेव्हां दाराशीं हत्ती झुलणें ही कोशागारांत साक्षात् लक्ष्मी निवास करीत असल्याची खूण ठरली तर नवल नाहीं!

समुद्रगुप्त, चंद्रगुप्त इत्यादि गुप्तवंशीय राजांनीं आपल्या नाण्यांवर लक्ष्मीच्या प्रतिमा ठसविण्याची प्रथा पाडली होती. कमलासनावर आरूढ झालेली, कधीं सिंहावर, तर कधीं मयूरावर बसलेली व हातांत कमलांचा गुच्छ घेतलेली–अशा मूर्ति गुप्तांच्या नाण्यांवर आहेत.

आपण पूर्ण कुंभ हा शुभ मानतों, सर्व मंगलकार्यांत पूर्ण कुंभाचें पूजन केलें जातें. विवाहादि मंगल कार्यांत पूर्ण घडा सामोरा यावा, अशी व्यवस्था असते. तो एक शुभ शकुन मानला जातो. पूर्ण कुंभ हें समृद्धीचें व लक्ष्मीचें प्रतीक आहे. पूर्ण कुंभावर विड्याचीं पानें ठेवून त्याला कमलपुष्पांचा आकार द्यावयाचा व त्यांत नारळ बसवावयाचा, अशी आपली पद्धति आहे. नारळाला 'श्रीफल' अशी संज्ञा देण्यांत आली असून सुवासिनींची व देवींची ओटी खणा-नारळांनीं भरण्याची वहिवाट आहे.

यांतील कल्पनाहि मोठ्या गमतीदार आहेत. भारतीय शिल्पांत स्तंभाच्या मुळाशीं व माथ्यावर कलशाकृति कोरल्या जात. भारतीय कलश वा तांब्या एका विशिष्ट

कमळाच्या आकारावरून तयार झालेला आहे. 'नीम्फिअस' अथवा नीलकमलाच्या फळाचा उपयोग प्राचीन काळीं इजिप्त वगैरे देशांत सूर्यपूजेसाठीं केला जाई. नीलकमल हें सूर्याचें प्रतीक मानण्यांत येऊं लागलें, तर श्वेतकमल ज्योत्स्ना-धवलित आकाशाचें प्रतीक ठरून त्याचा चंद्राशीं संबंध जडला. या नीलकमलाच्या फळांत 'अमृतरस' असतो, ही प्राचीन कल्पना. भारतीय लोट्याचा आकार व त्या फळाचा आकार यांच्याशीं तंतोतंत जुळतो. आणि कमळ हें लक्ष्मीचें निवासस्थान असल्यानें पूर्ण कुंभाला लक्ष्मी-कुंभ मानण्यांत येऊं लागलें. गुप्तकालांतील शिल्पांत हा लक्ष्मीकलश स्तंभाच्या मुळाशीं कोरलेला आढळतो; तर वरच्या बाजूला कमलाचा उलटा आकार घेऊन त्यावर आडव्या तुळयांचा भार टेकला जातो. अशा रीतीनें मुळांत कमल व कलश हीं एकच होतीं. त्यांतूनच देवालयांचा 'कळस' निर्माण झाला. पूर्ण कलश हें सागराचें अल्प स्वरूप, पर्यायानें 'लक्ष्मीचें माहेर'—म्हणून त्याची पूजा होऊं लागली.

वास्तविक श्रीफल म्हणजे बिल्वफळ! लक्ष्मीच्या तपश्चर्येतून बिल्ववृक्षाचा जन्म झाला, असें श्रीसूक्त सांगतें.

**आदित्यवर्णे तपसोऽधिजातो वनस्पतिस्तव वृक्षोऽथ बिल्वः।'**

अशी ऋचा आहे. या बेलफळाची जागा नारळानें कशी पटकावली, हें सांगणें जरा कठीण आहे. (तिच्या माहेरचा, सागराच्या सन्निध वावरणारा हा 'शेजारी' म्हणून तो शेर झाला असावा!) पण बहुधा नीलकमलाच्या फळांशीं नारळाचें असलेलें साम्य, त्याचें 'पूर्णकुंभत्व', त्याच्या पोटांतील अमृततुल्य पाणी, या साम्यांमुळेंच त्याला ही प्रतिष्ठा लाभली असावी. ज्यांना हा पूर्ण कुंभ हस्तगत होत नाहीं, त्यांच्या हातीं करवंटी (भिक्षापात्र) येतें, हें काय सांगायला हवें!

वर आणि वधू जर परस्पर अनुरूप असतील, आकृति, सौंदर्य, गुण यांनीं परस्परांना साजेशीं असतील, तर त्यांना 'लक्ष्मीनारायणाचा जोडा' म्हणण्याची आपली पद्धति होती. त्यांतच परस्परानुरक्ति निर्माण होण्याची आशा व उभयतांच्या संसाराच्या यशस्वितेची ग्वाही ध्वनित केली जाते. लक्ष्मीनें विष्णूलाच माळ कां घातली, याचें श्रीमद्भागवतांतील वर्णन मोठें हृद्य व मार्मिक आहे. लक्ष्मी सागरांतून वर आली तेव्हां आजूबाजूला ऋषि, यक्ष, गंधर्व, देव ही सारीच मंडळी उभी होती. दुर्वासासारखे कांहीं चण्डतपोनिधि होते, पण त्यांना क्रोध

जिंकतां आला नव्हता; बृहस्पतीसारखे कांहीं ज्ञानी होते, पण त्यांना काम जिंकतां आला नव्हता; परशुरामासारखे कांहीं धर्मशील न्यायनिष्ठुर होते, पण त्यांच्या ठिकाणीं भूतदया नव्हती; शिबीसारखे त्यागी होते, पण तो त्याग मुक्तीला अपुरा होता. कुणी दीर्घायु पण ब्रह्मचर्य आचरणारे, कुणी पौरुषयुक्त पण लंपट व शीलाच्या बाबतींत कमी. भगवान् शिवासारखे शीलवान्, दीर्घायु, स्त्रीप्रेमाची कदर करणारे, पण अमंगलाचा सहवास न सोडणारे! त्या सर्व समुदायांत सर्व गुणांनीं परिपूर्ण अशी एकच व्यक्ति होती, आणि ती निरिच्छपणें, तटस्थपणें, लक्ष्मीची कामना न बाळगतां उभी होती. ती व्यक्ति म्हणजे श्रीविष्णु! लक्ष्मीनें त्याच्या वक्षःस्थलावर नजर खिळवली व जणूं तेथें आपल्याला निवास लाभावा, अशी याचना केली! श्रीविष्णूनें तिला हृदयाशीं धरलें. सावळ्या मेघःश्याम वर्णाच्या विष्णूच्या वक्षःस्थळावर सुवर्णकान्ति लक्ष्मीची मूर्ति—हें दृश्य एका सुभाषितकाराला मोठें रमणीय वाटलें. तो म्हणतो—

> **किंजल्कराजिरिव नीलसरोजलग्ना**
> **लेखेव काञ्चनमयी निकषोपलस्था ।**
> **सौदामिनी जलदमण्डलगामिनीव**
> **पायादुरःस्थलगता कमला मुरारेः ॥**

निळ्या कमळावर जसे परागकेसर खुलावे, कसोटीच्या दगडावर जशी सुवर्णाची रेषा शोभावी अथवा मेघमण्डळांत जशी विद्युल्लेखा झळकावी, तशी मुरारीच्या हृदयावर ती कमला शोभून दिसली. ती आमचें संरक्षण करो.

भगवद्गीतेंत विभूतियोगाच्या अध्यायांत श्रीकृष्णाच्या भिन्न भिन्न विभूतींचीं वास्तव्यें—रूपांचीं स्थानें सांगितलीं आहेत, तशींच विष्णुपुराणांत दिलीं आहेत. पुराणकार ऋषि म्हणतात—

"लक्ष्मी ही वाणी असून अर्थ हा विष्णु आहे. ती नीति असून, तो न्याय आहे. लक्ष्मी ही बुद्धि व विष्णु हा बोध आहे. विष्णु हा संतोष असून लक्ष्मी ही तृप्ति-तुष्टि आहे. विष्णु हा सागर असून कमला ही त्याची वेला—भरतीची मर्यादा—आहे. विष्णु हा दीप असून लक्ष्मी ही त्याची ज्योत्स्ना आहे."

थोडक्यांत—देव, पशु, पक्षी, मानव यांतील पुरुषतत्त्व हा विष्णुचा अंश असून स्त्रीतत्त्व वा स्त्रिया ह्या लक्ष्मीचींच रूपें होत.

'मी आळशी, निरुद्योगी व व्यसनी लोकांचा त्याग करते, मला पराक्रमी, उद्योगी व सद्‌गुणी पुरुषांचा सहवास आवडतो,' असे शब्द महाभारतांत व्यासमुनींनीं लक्ष्मीच्या मुखीं घातले आहेत.' म्हणूनच, 'उद्योगिनं पुरुषसिंहमुपैति लक्ष्मीः' हें वचन ध्यानीं धरलें तरच गृहलक्ष्मी व राजलक्ष्मी आपल्याला लाभतील, व मगच आपण खऱ्या अर्थानें 'श्रीयुत' बनूं.

★ ★ ★

# संस्कृत कवींच्या लक्ष्मीविषयक कल्पना

संस्कृत साहित्यांत लक्ष्मीची जेवढी निंदानालस्ती आढळते, तेवढी दुर्जनांची वा कुटाळांची पण आढळणार नाहीं. संसाराला ज्यांचें मन विटलें आहे, अशा वेदान्त्यांनीं ही निंदा केली असती, तर तें क्षम्य मानतां आलें असतें. पण राजदरबारांत प्रतिष्ठा मिळविणाऱ्या व ती मिळवण्यासाठीं धडपडणाऱ्या पंडितांनींहि ती करावी, हा जगाचा उफराटा न्यायच नव्हे काय ? लक्ष्मीच्या– विशेषतः राजलक्ष्मीच्या निंदेचा–संस्कृत साहित्यांतील अभिजात निंदेचा नमुना म्हणजे बाणभट्टाच्या 'कादंबरीं'तील अमात्य शुकनास यानें राजपुत्र चंद्रापीड याच्यापुढें वाचलेलें लक्ष्मीच्या दुर्गुणांचें महापुराण. लक्ष्मीची निंदा करतांना तिच्या दुष्ट स्वभावाचें जेवढें काळेंकुट्ट चित्र रेखाटतां येईल, तेवढें त्यानें रेखाटलें आहे. त्यानें तिला चंचल तर म्हटलेंच, पण शिवाय हिचें आचरण हिडिंबेप्रमाणें व दुष्ट पिशाचीप्रमाणें आहे, असें म्हणावयालाहि त्यानें कमी केलें नाहीं. लक्ष्मीच्या लीला जसजशा सुरू होतात, जसजशी ही विद्युच्चंचला आपलें तेज दाखविते, तसतशी दिव्याच्या ज्योतीप्रमाणें काजळीच ओकीत जाते ( यथा यथा चेयं चपला दीप्यते तथा तथा दीपशिखेव कज्जलमलिनमेव कर्म केवलमुद्‌वहति । ) असा विखारी उद्‌गार काढून हिच्या दुष्टतेला उपमा नाहीं, अशी ग्वाहीच या प्रकाण्ड पंडितानें दिली आहे.

बाणानें केलेल्या लक्ष्मीवर्णनांत शब्दश्लेष व विरोधाभास या त्याच्या आवडत्या अलंकारांची त्यानें लैरात केली आहे. उदाहरणार्थ, त्याचें पुढील विवेचन पहा :

तोयराशिसंभवाऽपि तृष्णां संवर्धयति,
ईश्वरतां दधानाप्यशिवप्रकृतित्वमतनोति,
अमृतसहोदरापि कटुविपाका ।

‘ माय तशी पूती, खाण तशी माती ’ या न्यायानें पाण्यांत निर्माण झालेली वस्तु तहान शमविणारी असली पाहिजे. पण लक्ष्मीच्या बाबतींत या अपेक्षेचा भंग होतो. तोयराशींत– सागरांत जन्म घेऊनहि ही तृष्णा ( तहान-लोभ ) वाढवीतच असते. ही ईश्वरता ( १ शंकराचें पद, २ सत्ता ) धारण करते, पण सर्वत्र पसरवते मात्र ‘ अशिवत्व ’ –अमंगलत्व ! ही अमृताची बहीण खरी, पण हिचें फळ मात्र परिणामीं कडु !

ईर्ष्या–असूयेच्या पोटीं निंदा जन्म घेते आणि निंदाप्रचुर बोलण्याला उपहास-गर्भ विनोदाची धार येते. हीच गोष्ट लक्ष्मीच्या बाबतींत घडली आहे. शूरांच्या तरवारीच्या पात्यावर आणि वैश्यशूद्रांच्या मनगटाच्या जोरावर प्रेम करणाऱ्या लक्ष्मीनें भिक्षुकांच्या पळीपंचपात्रीला वा पंडितांच्या पोपटपंचीला वाटाण्याच्या अक्षता लावाव्यात, यांत नवल काय ? आणि मग हे याचक पंडित आपल्या तीक्ष्ण जिभांचीं पातीं परजून लक्ष्मीवर आडून हल्ला करतांना आढळतात. संस्कृत साहित्यांतील उपहासगर्भ विनोदाचा आस्वाद या लक्ष्मीनिंदेच्या श्लोकांतून आपल्याला भरपूर मिळतो. त्याचे कांहीं नमुने पाहा :

एक कवि म्हणतो, जिचा पाय स्वतःच्याच घरीं स्थिर नाहीं, ती दुसऱ्याच्या घरीं स्थिर राहील, ही अपेक्षाच कशी करतां तुम्ही ? तो लिहितो :

या स्वसद्मनि पद्मेऽपि संध्यावधि विजृंभते ।
इन्दिरा मन्दिरेऽन्येषां कथं स्थास्यति निश्चला ? ॥

पद्म म्हणजे लक्ष्मीचें स्वतःचें घर; तेथें देखील ही लक्ष्मी ( शोभा ) फक्त सायंकाळपर्यंतच राहाते, इतकी ही चंचल ! मग ती दुसऱ्यांच्या मंदिरांत निश्चल कशी बरें राहील ?

पण लक्ष्मीच्या चंचल स्वभावाला कारणीभूत कोण ? तिनें चंचल न बनावें, तर काय करावें ? एका कवीला वाटतें, लक्ष्मीला हा हकनाक ठपका आहे.

त्यानें तिचा कैवार घेतला आहे. तो म्हणतो, " या तिच्या स्वभावाबद्दल तिच्या वडिलांना जबाबदार धरा. " त्याचें म्हणणें त्याच्याच शब्दांत वाचा —

यद् वदन्ति चपलेत्यपवादं नैव दूषणमिदं कमलायाः ।
दूषणं जलनिधेर्हि भवेत् तत् यत् पुराणपुरुषाय ददौ ताम् ॥

–लक्ष्मीला तुम्ही चंचल म्हणतां, पण हा तिचा दोष नव्हे; हा तिचा अपराध नव्हे. खरा दोष तिच्या वडिलांचा–सागराचा–आहे. कारण त्यानें ही रूपयौवनसंपन्न अशी आपली कन्या त्या पुराण (=जरठ) पुरुषाच्या, नारायणाच्या गळयांत बांधली !

लक्ष्मीच्या स्वभावाचें वर्णन करतांना दुसऱ्या एका कवीनें अशाच लौकिक व्यवहाराचा आश्रय घेतला आहे. लक्ष्मीचा ब्रह्मदेव हा पुत्र, आणि सरस्वती ही त्याची सहधर्मचारिणी अर्थात् दोघींचें नातें झालें सासूसुनांचें. सासूसुना जगांत एकत्र कधीं सुखानें नांदल्या आहेत ? एक कवि म्हणतो :

कुटिला लक्ष्मीर्यत्र प्रभवति न सरस्वती वसति तत्र ।
प्रायः श्वश्रूस्नुषयो न दृश्यते सौहृदं लोके ॥

—या कुटिल दुष्ट लक्ष्मीचा ज्या ठिकाणीं वरचष्मा आहे, त्या ठिकाणीं सरस्वती कधींच राहत नाहीं. आणि तें बरोबरच आहे. कारण साधारणपणें जगांत सासूसुनांचें सूत क्वचितच आढळतें.

पण सासूसुनांचें पटलें नाहीं तर त्यांत जगाला दोष दिसतो सुनांचाच. स्वतंत्र बाण्याची सून स्वैरिणी ठरते आणि तिला लोकापवाद सहन करावा लागतो. हेंच दैव बिचाऱ्या सरस्वतीच्या कपाळीं आलें आहे. तिची कींव येऊन, दुसरा एक कवि तिला समजावून सांगतो :

श्वश्रूं विना वृत्तिरिह स्वतन्त्रा प्रायः स्नुषाणामपवादहेतुः ।
यद् वाणि ! लोके रमया विहीनां सतीमपि त्वामसतीं वदन्ति ॥

—सासूला सोडून स्वतंत्रपणें राहणें हें सुनांच्या निंदेस कारणीभूत होतें, म्हणून हे वाणि सरस्वति, तूं जरी सती म्हणजे सदाचरणी असलीस, तरी लक्ष्मीला–तुझ्या सासूला सोडून तूं राहतेस. म्हणून लोक तुला असती म्हणजे दुर्वर्तनी म्हणतात !

श्रीमंत पण मूर्ख लोकांचा शब्द कसा झेलला जातो, आणि विद्वान् परंतु गरीब अशा लोकांचा शब्द कसा लाथाडला जातो, हें कवीनें या पद्यांत खुबीनें सुचविलें आहे.

लक्ष्मीच्या या चंचल, कुटिल स्वभावाची कारणमीमांसा काय? माणसांचे स्वभाव त्यांच्या आईवडिलांप्रमाणें असतात किंवा तीं भावंडांवर पडतात. याच गोष्टीचा आधार घेऊन कवि सांगतो :

**चांचल्यमुच्चैःश्रवसस्तुरंगात् कौटिल्यमिन्दोर्विषतो विमोहः ।**
**इति श्रियाशिक्षि सहोदरेभ्यो न वेद्मि कस्मात् गुणवद्-विरोधः ॥**

—उच्चैःश्रवा नांवाचा अश्व चौदा रत्नांपैकींच. या भावंडांकडून लक्ष्मीनें चंचलता, अस्थिरता शिकून घेतली. दुसरें भावंड चंद्रकोर, तिच्यापासून तिनें कुटिलता–वाकडेपणा–उचलला. दुसऱ्याला गुंग, मुग्ध करण्याचा गुण तिनें हालाहल विषापासून घेतला. कवि म्हणतो, "येथपर्यंत ठीक; पण गुणवंताशीं वैर करण्याचा गुण तिला कुणापासून लागला, हें मात्र मला कोडेंच आहे!"

पण लक्ष्मीच्या ठिकाणीं माणसाची मति मूढ बनविण्याचें जें सामर्थ्य आहे, तें तिनें हलाहल विषापासून उचललें असावें, ही गोष्ट दुसऱ्या एका कवीला मात्र मंजूर नाहीं. हलाहल हें मुळीं विषच नव्हे, विष आहे ही लक्ष्मीच, असें त्याचें मत आहे. पाहा :

**हालाहलो नैव विषं, रमा, जनः परं व्यत्ययमत्र मन्वते ।**
**निपीय जागर्ति सुखेन तं शिवः स्पृशन्निमां मुह्यति निद्रया हरिः ॥**

—हालाहल हें विष नव्हे, विष आहे लक्ष्मी. लोक मात्र उगाच उलटा समज करून घेतात. हालाहल प्राशन करून शंकर अगदीं व्यवस्थित जागे राहतात, आणि हिला स्पर्श करणारे विष्णु मात्र झोपेनें गुंगून पडतात. यावरून हें सिद्ध होत नाहीं का?

एकूण कृष्णावतारांत पूतनामावशीच्या रूपानें आलेल्या विषवल्लीला साधलें नाहीं, तें लक्ष्मीला साधलें म्हणायचें! लक्ष्मीच्या प्रसादानें लोक आंधळे कसे होतात, याचा भगवान् विष्णु हा साक्षात् पुरावाच, असें एका कवीला वाटतें. नाहीं तर आकर्णायत, कमलपत्राप्रमाणें विशाल डोळे असलेले विष्णु सर्पाची शय्या करून झोपतात, याचा अर्थ काय? कवि म्हणतो :

लक्ष्मी क्षमस्व वचनीयमदं दुरुक्तं अन्धीभवन्ति पुरुषास्त्वदुपासनेन ।
नो चेत् कथं कमलपत्रविशालनेत्रो नारायणः स्वपिति पन्नगभोगतल्पे ॥

—लक्ष्मीच्या चंचलपणामुळें एक कवि तर तिच्यावर इतका कोपला आहे कीं, तिला त्यानें वारयोषितांच्या पंक्तींत बसवलें आहे. ही तापट माणसांच्या घरीं राहायला तयार नाहीं; अपमान होईल म्हणून मृदु स्वभावाच्या माणसाकडे ही राहत नाहीं. मूर्खांचा द्वेष करते आणि विद्वानावरहि प्रेम करीत नाहीं. शूरांची हिला भीति वाटते आणि भ्याडांचा ही उंबरठा चढायलाहि तयार नाहीं.

दुसऱ्या एका कवीनें मात्र तिला सती सावित्रीपेक्षां श्रेष्ठ पतिव्रता ठरविलें आहे. लक्ष्मी बैलांच्या (मूर्खांच्या) घरींच नेहमीं कां, याचें उत्तर त्याला तिच्या पातिव्रत्यांत सांपडलें आहे. या कवीच्या विनोदबुद्धीचें खरेंच कौतुक करायला हवें. तो म्हणतो—

गोभिः क्रीडितवान् कृष्ण इति गोसमबुद्धिभिः ।
क्रीडत्यद्यापि सा लक्ष्मीरहो देवी पतिव्रता ॥

—कृष्णाला गाईबैलांशीं खेळायचा छंद होता. त्यांच्या सहवासांत तो राही, म्हणून बैलाप्रमाणेंच ज्यांची बुद्धि आहे अशांच्या घरीं लक्ष्मी अजून मुक्काम ठोकून आहे. केवढें हें लक्ष्मीदेवीचें पातिव्रत्य !

'सर्वे गुणाः काञ्चनमाश्रयन्ते'—श्रीमंतीला सारे गुण येऊन चिकटतात, हें सुभाषित सर्वांच्या परिचयाचें आहे. पण दुसऱ्या एका सुभाषितकारानें यावर कडी केली आहे. लक्ष्मीच्या कृपेनें 'दोषा अपि गुणायन्ते' असें त्यांचें म्हणणें आहे. पहा :

आलस्यं स्थिरतामुपैति भजते चापल्यमुद्योगिताम् ।
मूकत्वं मितभाषितां वितनुते मौढ्यं भवेदार्जवम् ॥
पात्रापात्रविचारणाविरहिता गच्छत्युदारात्मताम् ।
मातर्लक्ष्मि तव प्रसादवशतो दोषा अपि स्युर्गुणाः ॥

श्रीमंताच्या दोषांना गुणाचें स्वरूप कसें येतें, पहा : तो आळशी असेल, तर स्थिर वृत्तीचा समजला जातो. चंचलपणा त्याचा उद्योगीपणा ठरतो. तो अबोल

असेल तर तो मितभाषी समजला जातो. आणि त्याचा मूर्खपणा म्हणजे सरळ स्वभाव ठरतो. त्यानें जरी पात्रापात्रविचार न करतां थैलीचें तोंड मोकळें सोडलें, तरी त्याची कुबेराचा अवतार म्हणून वाहवा होते. आई लक्ष्मी, तुझी कृपादृष्टि झाली कीं दोषसुद्धां गुण ठरतील बरें !

या सर्व निंदा-टवाळीला लक्ष्मीजवळ कांहींच उत्तर नाहीं काय ? तिचें कांहींच 'समर्थन' नाहीं काय ? तिची कड घेऊन बोलणारे कवि आहेतच कीं ! निरनिराळ्या तीन कवींनीं तिच्या तोंडून तिची कैफियत सादर केली आहे. पाहा—

नाहं दुश्चरणी न चापि चपला मूर्खो न मे रोचते ।
नो शूरो न च पण्डितो न च शठो हीनाक्षरो नैव च ॥
पूर्वस्मिन्, कृतपुण्ययोगविभवो भुंक्ते स मे सत्फलम् ।
लोकानां किमसह्यतां सखि पुनर्दृष्ट्वा परां सम्पदम् ॥

लक्ष्मी आपल्या सखीला म्हणते—

'लोकांना नाहीं उद्योग, म्हणून ते मला उगाच नांवें ठेवतात. मी दुष्ट आचरणाची नाहीं नि स्वभावानें चंचलहि नाहीं. मला अमकाच मनुष्य आवडतो, हेंहि खोटें. मला मूर्ख आवडत नाहीं नि शूरहि आवडत नाहीं. मला ठकहि प्रिय नाहीं नि अक्षरशत्रूहि माझा लाडका नाहीं. अग, हा ज्याच्या-त्याच्या पूर्वजन्मींच्या सुकृताचा, पुण्याईचा योग ! दुसऱ्याचें वैभव पाहून मनांत जळणाऱ्या या लोकांना बोलायला काय लागतें !' मनुष्याच्या दुसऱ्याचा हेवा करण्याच्या प्रवृत्तीला केवढा झणझणीत टोमणा हा !

सोन्याचें बोंडलें ओठांत घेऊन जन्माला येणें, ही पूर्वजन्मींची पुण्याई तर खरीच; पण हा दैववाद कित्येकांना रुचायचा नाहीं. पण सद्व्यवहार व सदाचार जिथें असतात तिथेंच आपलें वास्तव्य असतें, हें तिचें पुढील श्लोकांतील म्हणणें अनेकांना पटण्यासारखें आहे. त्यांत उल्लेखिलेली जनरीति कदाचित् बदलली असेल. पण त्यांतला भाव, न्याय, दूरदर्शीपणा व सर्वांचीं मनें जिंकण्याचें कौशल्य, इत्यादि गुणांचा महिमा खास पटायला हवा. विष्णुपत्नी रमा आपल्या पतीला सांगते—

यत्राभ्यागतदानमानचरणप्रक्षालनं भोजनं
सत्सेवा पितृदेवतार्चनविधिः सत्यं गवां पालनम् ।
धान्यानामपि संग्रहो न कलहः चित्तानुरूपा प्रिया
हृष्टा प्राह हरिं वसामि कमला तस्मिन् गृहे निश्चला ॥

एकदां हरीनें आपली पत्नी लक्ष्मी हिला विचारलें, " तूं सारखा चंचलपणा करतेस, तर तूं स्थिरावणार तरी कोठें ? कीं कधीं स्थिरावणारच नाहींस ? " त्यावर लक्ष्मी उत्तर करते, " नाथ, जिथें अतिथि-अभ्यागतांचा सत्कार होतो, त्यांना दानमान मिळतात, भोजन लाभतें, पितरांना तर्पण होतें, देवतांचें पूजन होतें, गाईचें संगोपन होतें, सज्जनांची सेवा चालते आणि सत्याची उपासना घडते, धान्यादिकांचा संग्रह होत असतो, भांडणाला अवसरच मिळत नाहीं आणि घर-धन्याची घरधनीण त्याच्याशीं मनमिळाऊ अशी असते, अशा घरांतच मी नेहमीं आनंदित होऊन स्थिरावत असते."

लक्ष्मीवर खरा राग याचकांचा– ब्राह्मणांचा. पण आपलीं पापें आपल्याला नडतात, याचा कधीं त्यांनीं अन्तर्मुख होऊन विचार केला आहे ! ब्राह्मणांनीं लक्ष्मीचा केलेला महान् अपराध एका कवीनें मोठ्या गमतीनें वर्णन केला आहे. लक्ष्मी म्हणते—

पीतोऽगस्त्येन तातश्चरणतलहतो वल्लभोऽन्येन रोषात्
आबाल्यात् विप्रवर्यैः स्ववदनविवरे धारिता वैरिणी मे ।
गेहं मे छेदयन्ति प्रतिदिवसमुमाकान्तपूजानिमित्तं
तस्मात् खिन्ना सदाहं द्विजकुलसदनं नाथ नित्यं त्यजामि ॥

— हे ब्राह्मण माझ्या सासरमाहेरच्या दोन्ही कुळांचे वैरी. त्या अगस्त्यानें माझ्या वडिलांचाच उच्छेद केला. सारा समुद्र त्यानें प्राशन केला. त्या भृगूनें पतीच्या छातीवर लत्ताप्रहार केला. इतर कांहीं ब्राह्मणश्रेष्ठांनीं माझ्या वैरिणीला (सरस्वतीला) अगदीं बालपणापासूनच आपल्या जिव्हाग्रावर स्थान दिलें आहे. कमल वा बिल्वपत्र हें माझें निवासस्थान. तर तेंच रोज तोडतात कांहीं जण. आणि कशाकरितां ? तर त्या गिरिजेच्या भिकारड्या पतीचें पूजन करण्याकरितां ! कां नाहीं माझें मन

विट्न जाऊं? म्हणून मी या ब्राह्मणांच्या घराची पायरी कधीं चढायची नाहीं, असा ठाम निश्चय केला आहे!"

या श्लोकांतील पौराणिक आख्यायिकांचा भाग बाजूला ठेवूं; पण ब्राह्मणांनीं निष्ठापूर्वक लक्ष्मीची कधीं उपासनाच केली नाहीं (नव्हे तिच्याबद्दल अनास्थाच दाखविली आहे), ह्या तिच्या तक्रारींत अर्थ नाहीं, असें कोण म्हणेल?

★ ★ ★

# स्वाध्याय

कथांचा मूळ संदर्भ व जातां जातां निर्देशिलेल्या कथांचें उगमस्थान जिज्ञासू वाचकांना सहज उपलब्ध व्हावें, तसेंच उद्धृत श्लोकार्धांचा व श्लोकचरणांचा संपूर्ण श्लोक सहजगत्या त्यांना उपलब्ध व्हावा, या हेतूनें पुढील टीपा दिल्या आहेत. कांहीं मुद्रणदोष व संदर्भदोष जातां जातां दुरुस्त केले आहेत.

[ पहिला आंकडा पृष्ठाचा व दुसरा ओळीचा निदर्शक आहे. ]

## १. माता द्रौपदी

मूळ कथाभाग श्रीमद्भागवत स्कं. १, अ. ७ मध्यें.

९. ५. पंचकन्या—

अहल्या द्रौपदी सीता तारा मंदोदरी तथा ।
पञ्चकन्या स्मरेन्नित्यं महापातकनाशनम् ॥

९.१६. पाहा—' उर्वशी सुकुमारं प्रहरणं महेन्द्रस्य । ' कालिदास—' विक्रमोर्वशीय ', अं. १.

१०. ४. ' यज्ञासाठीं भूमी... ' मोरोपंत—' सीतागीत ', ओवी १.

१०.१४. ' नको क्षुद्र शृंगार... ' कुसुमाग्रज—' पृथ्वीचें प्रेमगीत '—किनारा.

११.१५.
शुश्रूषस्व गुरून् कुरु प्रियसखीवृत्तिं सपत्नीजने ।
भर्तुर्विप्रकृतापि रोषणतया मास्म प्रतीपं गमः ॥
भूयिष्ठं भव दक्षिणा परिजने भाग्येष्वनुत्सेकिनी ।
यान्त्येवं गृहिणीपदं युवतयो वामा कुलस्याधयः ॥
—शाकुंतल, अंक ४

११.२५. अद्वैत – सीतारामचंद्राच्या जीवनांतील अद्वैताचें वर्णन भवभूतीनें 'अद्वैतं सुखदुःखयोः' या श्लोकांत सुंदर रीतीनें वर्णिलें आहे. पाहा– 'उत्तररामचरितम्', अं. १, श्लोक ३९.

१२. ३. 'वाच्यस्त्वया...' रघुवंश १४.६१

वाच्यस्त्वया मद्वचनात् स राजा
वह्नौ विशुद्धामपि यत्समक्षम् ।
मां लोकवादश्रवणादहासीः
श्रुतस्य किं तत्सदृशं कुलस्य ॥

१२. १३. 'व्रजन्ति ते...' भारवि – किरातार्जुनीयम्, १. ३०.

व्रजन्ति ते मूढधियः पराभवं
भवन्ति मायाविषु ये न मायिनः ।
प्रविश्य हि घ्नन्ति शठास्तथाविधान्‌–
संवृताङ्गान्निशिता इवेषवः ॥

१३. ५. 'योगेश्वर कृष्ण'...–'यत्र योगेश्वरः कृष्णः'–भ. गी. १८. ७८.

१४.१३. श्रीमद्भागवत, १.७.४७– द्रौपदीचा उद्गार असा :

मा रोदीदस्य जननी गौतमी पतिदेवता ।
यथाहं मृतवत्सार्ता रोदिम्यश्रुमुखी मुहुः ॥

**टीप :** श्री. विद्याधर पुंडलीक यांच्या 'चक्र' या भव्योत्कट ललितकृतीचा शेवट सूडभावनेवर प्रेमानें मिळविलेल्या विजयांत कलात्मकतेनें चित्रित केला आहे.

★ ★

## २. महात्मा ध्रुवाची मातृभक्ति

मूळ कथा श्रीमद्भागवत स्कंध ४, अ. ८ ते ११ मध्यें. या प्रसंगावरील मराठींतील रचना कवि चिंतामणीचें 'ध्रुवाख्यान'. पूर्वींच्या पिढ्यांतील आबालवृद्धांना तें चांगलें परिचित होतें.

१७. ७. 'अहो तेजः क्षत्रियाणां...' बाल भरताला सिंहाच्या छाव्याशीं क्रीडा करतांना पाहून दुष्यन्ताच्या तोंडून निघालेल्या—

'महतस्तेजसो बीजं बालोऽयं प्रतिभाति मे।'

या उद्गाराची येथें आठवण होते.

१७.२५. 'नायं मार्गो हि साधूनाम्'–भा. ४.११.१०. मनूच्या या भाषणांत एक 'अहिंसेचें तत्त्वज्ञान' ग्रथित झालेलें आढळतें.

* *

## ३. अजामिळकथेंतील भक्तितत्त्व

मूळ कथा श्रीमद्भागवत स्कंध ६, अ. १ ते ३ मध्यें.

२०.१५. प्रल्हादाख्यानाच्या अखेरीस युधिष्ठिर-नारद-संवादांतून भागवतकारांनीं 'धर्मनिर्णय' व वर्णाश्रमधर्मवर्णन यांसाठीं पांच अध्याय (११ ते १५) घातले आहेत.

२१.१. 'न बुद्धिभेदं जनयेत्...' भ. गी. ३. २६.

२१. २२. कर्म, अकर्म, विकर्म...पाहा : भ. गी. ३. १७–१८.

२२. २२. अपि चेत् सुदुराचारो भजते मामनन्यभाक्।
साधुरेव स मन्तव्यः सम्यग्व्यवसितो हि सः॥
—भ. गी. ९. ३०-३१ पाहा.

२५.२४. व्यक्तिमत्त्वाची पुनर्रचना ...... प्रसिद्ध मानसशास्त्रज्ञ जी. डब्ल्यू. ऑलपोर्ट यानें आपल्या 'पर्सनॅलिटी' या ग्रंथांत हा विचार मांडला आहे.

* *

## ४. प्रल्हादाख्यानांतील सौंदर्यबोध

मूळ कथाभाग श्रीमद्भागवत स्कं. ७, अ. ४ ते १० मध्यें. सातव्या स्कंधांत फक्त प्रल्हादाख्यान व नृसिंहावतार एवढाच कथाभाग आहे. त्या अर्थी भागवत-कारांना ही कथा विशेष महत्त्वाची वाटत असावी. भक्तीचें तत्त्वज्ञान प्रामुख्यानें या कथेच्या द्वाराच विशद करण्यांत आलें आहे.

२८.२२. ब्रह्मसूत्र – प्रस्थानत्रयीपैकीं महत्त्वाचा ग्रंथ. द्वितीय अध्यायांत सूत्र ३४–३६ यांचा प्रपंच आहे.

२९.१६. हिरण्याक्षाचा वध – हा कथाभाग श्रीमद्भागवत स्कं. ३, अ. १७-१९ मध्यें आहे. श्रीहरीचे पार्श्वद जे जय-विजय तेच शापामुळें दैत्ययोनींत या बंधुद्वयाच्या रूपानें जन्मास आले होते.

३०.२६-३७. दैवी-असुरी संपत्तीचें वर्णन भ. गी. १६.१–२०. श्लोक ७.५.३७ प्रथमचरणाचा उत्तरार्ध पुढीलप्रमाणें हवा —

'स्वदेहजोऽप्यामयवत्सुतोऽहितः ॥'

३२.१२. 'सत्य न मरतें दळभारें'–महाराष्ट्र–राजकवि श्री. यशवन्त यांची कविता.

३२. She did not weep –ही कविता वर्डस्वर्थ याची नसून महाकवि टेनिसनची आहे. त्याच्या 'द प्रिन्सेस' या खंडकाव्यांत हें गीत आहे.

३२.१२. नवविधा भक्ति —

श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणं पादसेवनम् ।
अर्चनं वन्दनं दास्यं सख्यमात्मनिवेदनम् ॥

* *

## ५. श्रीलक्ष्मीचें स्वयंवर

मूळ कथाभाग श्रीमद्भागवत स्कं. ८, अ. ८ मध्यें.

४२.१४. 'नखाग्रांत'च्या ऐवजीं 'मस्तकीं' वाचावें.

४२.१९. श्रीसूक्त – हें अथर्ववेदांत व ऋग्वेदाच्या परिशिष्टांत आढळतें.

४५. 'नासौ न काम्यो...' रघुवंश ६. ३०.

कविवर्य मोरोपंतांनींहि 'अमृतमंथन' या स्फुट आख्यानांत 'लक्ष्मीस्वयंवर-कथा' वर्णिली आहे.

## ६. बलिकथेंतील चिरंतन संघर्ष

मूळ आख्यान श्रीमद्भागवत स्कं. ८, अ. १८-२३ मध्यें.

५३.९. ही आर्या मोरोपंतांची. पंतांनीं मराठींत 'वामनचरित्र' हें स्फुट आख्यान भागवतकथेच्या आधारें रचलेलें आहे. आर्यांचीं अवतरणें त्यांतून घेतलीं आहेत.

५६ २५. दिलीप.....‘ यशःशरीर ’—रघुवंश, स. २, श्लो. ५२.

५८.५. सुतल–वेदमहर्षि पं. श्री. दा. सातवळेकर यांनीं, ‘ बलिवामनकथा ’ ही देवासुरयुद्धकथा 'व त्यांत वामनाचें राजकारणी मुत्सद्दीपण, या दृष्टीनें उलगडून दाखविली आहे. त्यांत सुतल हा कोंकणचा भाग, असें त्यांनीं म्हटलें आहे.

* *

## ७. हतभागी कल्माषपाद

मूळ कथाभाग श्रीमद्भागवत स्कं. ९, अ. ९ मध्यें. ही कथा मराठींत ‘ श्रीगुरुचरित्रां ’त आली आहे.

* *

## ८. रासक्रीडा–स्वरूप आणि रहस्य

मूळ कथाभाग श्रीमद्भागवत स्कंध १०, अ. २९ ते ३३ मध्यें. कृष्ण-दयार्णवांच्या ‘ हरिवरदें ’तील ओव्यांचा या लेखांत उपयोग करून घेतला आहे. कृष्णदयार्णवांची टीका मात्र आध्यात्मिकतेची बैठक असूनहि अति उत्तान आहे.

६६.१६. ‘ हन्तव्यः ’ हा मुद्रणप्रमाद. तेथें ‘ हातव्यः ’ हा शब्द हवा.

६९.३. कृष्णाचें उत्तर मुळांत भक्तीचें मर्म उकलून दाखविणारें आहे. कवीला हा प्रसंग शृंगारासाठीं योजावयाचा असता, तर त्याच्या आरंभीं ही आध्यात्मिक चर्चा खासच विसंगत आहे. या गोष्टीकडेहि अनेकांचें दुर्लक्ष झालें आहे.

* *

## ९. गृहस्थ झाला भगवंत

मूळ कथाभाग श्रीमद्भागवत स्कंध १०, अ. ६९ मध्यें. या संबंध अध्यायांत श्रीकृष्णाचा उल्लेख ‘ योगेश्वर ’ या विशेषणानें केला असून त्याच्या कर्तृत्वाचा आधा‘ योगमाया ’ या शब्दानें नोंदविलेला आहे.

* *

## १०. अवधूताचे चोवीस गुरु

मूळ कथाभाग श्रीमद्भागवत स्कंध ११, अ. ७ ते ९–'उद्धवगीतें'त आहे. या लेखांत श्रीएकनाथी भागवताचा 'मागोवा' घेतला आहे.

सद्गुरुमहिमा बहुतेक संतकवींनीं वर्णिला आहे. पण श्रीसमर्थांनीं सामान्य व्यवहारांतले 'गुरु' आणि आध्यात्मिक जीवनासाठीं 'सद्गुरु' हा केलेला भेद व व्यावहारिकांचें केलेलें वर्णन मोठें मार्मिक आहे. पहा 'दासबोध', द. ५, स. २-३.

८४.२०. 'केवळ सौंदर्य...' प्रा. वसंत बापट यांच्या 'बिजली' या संग्रहांतून.

९०.१४. 'गर्दुम'—हा मुद्राराक्षस ! 'दुर्गम' हा शुद्ध शब्द.

★ ★

## ११. भागवताचें रसमाधुर्य

हा समालोचनात्मक लेख आहे. वाचकांनीं याच्या जोडीनें 'श्रीमद्भागवत: कथासार व शिकवण' या माझ्या पुस्तकांतील अखेरचें प्रकरण वाचलें, तर अधिक चांगलें होईल.

९१.१५. पुराणरचनेचें शास्त्र — स्कंध २, अ. १० मध्यें पुराणलक्षणें दिलीं आहेत.

९४.१-२. पहिल्या २ ओळी श्लोक २ चा पूर्वार्ध, तिसरी ओळ श्लोक ३ चा पूर्वार्ध आहे.

९६.२०. कृष्णाचें अतिमानवत्व — सौ. इरावती कर्वे यांच्या 'युगान्त'मधील 'कृष्ण वासुदेव' लेख पहावा.

९७.१३. 'खगांचिया साउलीच्याच......' वामन पंडितांनीं श्रीकृष्णाच्या बालजीवनावर रचलेलीं मराठी आर्यांनें अत्यंत रसाळ आहेत.

१०२. १७. श्री. राधाकमल मुकर्जींचें मूळ अवतरण पुढीलप्रमाणें आहे—

" The modern age has its own problems, its own social and philosophical outlooks. The imperative task of modern culture is to bind together man and man and people and people. The Bhagvat can provide a right spiritual impulsion for this undertaking. . . ." p. 2.

" To read the Bhagvat as the epic of love and charity is to recover the ancient scripture and confirm and restate its truths and values in the countext of modern situation. For truth and value are neither ancient nor modern, but eternal." – **The Lord of the Autumn Moons**, p. 42.

* *

## परिशिष्टें

' आद्य विवाह ' ही कथा श्रीमद्भागवत स्कं. २, अ. २२ मध्यें एका दृष्टीनें तें ' आद्य स्वयंवर ' आहे. ' श्रीलक्ष्मीच्या स्वयंवरा 'च्या अनुरोधानें एक संशोधनात्मक व एक रसास्वादक असे हे दोन लेख परिशिष्टरूपानें मुद्दाम समाविष्ट केले आहेत.

* * *

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत,
अनुक्रम ... दि: ...
२०१९
१६६२७

# संदर्भ - साहित्य


१. सार्थ श्रीमद्भागवत : दामोदर सावळाराम आणि मंडळी, मुंबई. १९२६-१९२९.

२. श्रीमद्भागवतादर्श : य. व्यं. कोल्हटकर, सांगली.

३. ‘ कल्याण ’ श्रीमद्भागवतांक : गीता प्रेस, गोरखपूर.

४. रासपंचाध्यायी : गीता प्रेस, गोरखपूर.

५. मराठी वाङ्मयांतील मधुराभक्ति : डॉ. प्र. न. जोशी, व्हीनस प्रकाशन, पुणें, १९५७.

६. श्रीरामकृष्ण चरित्र—भाग पहिला : न. र. परांजपे, श्रीरामकृष्ण आश्रम, नागपूर.

7. **Lord of the Autumn Moons :** by Radhakamal Mukerjee.


★ ★ ★

REFBK-0016627